
शनिवार । १३ जून १९८१ । एक रुपया

# माणूस



## " पोथीनिष्ठा नष्ट करा....

असे सावरकरांनी
हिंदू व मुसलमान
दोघांनाही बजावले आहे.
त्यांचे शब्द पहा :

'आमची मनापासून अशी इच्छा आहे की, हिंदी मुसलमानांनीही पोथीनिष्ठ प्रवृत्ती सोडून विज्ञाननिष्ठ बनावे, देवभोळेपणा नि धर्मवेड यांच्या खोड्यातून त्यांची बुद्धी मोकळी व्हावी आणि त्यांचा समाजही शिक्षित, प्रगत नि अभ्युन्नत व्हावा. मुसलमान जर विज्ञाननिष्ठ नि प्रगत झाले तर त्यात हिंदूंचेही कल्याणच आहे.' "

—उत्तरमीमांसा

पृष्ठ ५

## पुणे वार्ता

# परिसर : नवी कृतिशील चळवळ

शहरी आणि ग्रामीण या वादाचा मुख्य मुद्दा परिसर हा असतो. ग्रामीण भागातील निसर्गसौंदर्यावर आषक होणारे शहरी लोक आणि शहराकडे पोटासाठी धाव घेणारे ग्रामीण लोक यांच्यामध्ये परिसराबद्दल कितीसं भान असतं! शहरातल्या प्रदूषणाचा, वाढत्या रहदारीचा, झाडांच्या अभावाचा तसा परिणाम लगोलग जाणवत नाही; पण या वर्षीचा उन्हाळा पुण्यात विशेष कडक जाणवण्यामागं या परिसराबाबत गेली अनेक वर्षं झालेलं दुर्लक्ष आहे हे कळलं की त्याचं महत्त्व कळतं.

हनुमानटेकडी किंवा वेताळटेकडीवर गेलात की पुण्याचं विहंगम दृश्य दिसतं. शहर म्हणून ते विहंगम असेलही; पण झाडांची दाटी असलेले प्रदेश या टेकडीवरून फार लांबलांब आणि कमी असल्याचं दिसतं आणि म्हणूनच शहरातल्याना 'वीकएन्ड' ला लोणावळ्या-सारख्या 'निसर्गरम्य' ठिकाणी जावं लागतं.

या परिसराबाबत नागरिकामध्ये नवी जाणीव निर्माण होण्याची गरज लक्षात घेऊनच पुण्यातील काही जणांनी एकत्र येऊन 'परिसर' या संघटनेची नुकतीच स्थापना केली.

जागतिक पर्यावरण दिनाच्या दिवशी म्हणजेच दि. ६ जून रोजी या संस्थेतर्फे एक कार्यक्रमही आखण्यात आला. निसर्गप्रेमी म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. व्यंकटेश माडगूळकर अध्यक्षस्थानी होते. पुण्यातल्या महाराष्ट्र विज्ञानवर्धिनी या संस्थेतील वनस्पतिशास्त्र-विभागाचे प्रमुख डॉ. वा. द. वर्तक यांनी 'आपला परिसर' या विषयावर स्लाईडसह भाषण केलं. पुण्याभोवतालच्या परिसरातील हिरवळ दिवसेंदिवस कमी होते आहे आणि पर्यावरणाच्या दृष्टीनं त्याची गरज असून ती वाढविण्याचा शिस्तबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज डॉ. वर्तकांनी प्रतिपादन केली.

सुरुवातीला श्री. वसंत पळशीकर यांनी प्रास्ताविकात 'परिसर'ची कल्पना दिली. जेथे जेथे माणूस निसर्गापासून तोडला जातो, तेथे तेथे प्रश्न विचारणे, विचार करणे, पर्याय सुचविणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे; निसर्गापासून तुटल्यामुळं आणि माणसानं स्वतःच रचलेल्या कृत्रिम जगात रमल्यामुळं येणारी परात्मता टाळली पाहिजे. त्यासाठी प्रयत्नशील रहाणं आवश्यक आहे. हे केवळ एक 'फॅड' नसून त्याला नैसर्गिक, तांत्रिक, व्यावहारिक आणि वैचारिक बाजू आहे असे समजून काम करायला हवं. जे जे सहज स्वाभाविक आहे ते ते वाचवलं पाहिजे, त्याचं संगोपन केलं पाहिजे असा त्यांच्या म्हणण्याचा आशय.

परिसर केवळ झोपडपट्ट्यांमुळं बिघडतो असं नाही, तर अनेक मजली इमारती, रस्ते-रुंदी अशांसारख्या अनेक तथाकथित प्रगतिकर गोष्टींमुळंही परिसर बिघडत असतो. यासाठी सामूहिक पातळीवर निकोप परिसरासाठी चळवळ उभारण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

श्री. विजय परांजपे यांनी भारतातील धरणे व वीजनिर्मिती–प्रकल्प इत्यादींमुळे निसर्गसंपत्तीवर होणारं आक्रमण आणि त्यातून उत्पन्न होणारे दूरगामी भयावह प्रश्न कसे असतील यांचं विवेचन केलं.

'परिसर' सारख्या चळवळीची आज गरज आहे असं नुसतं म्हणून भागणार नाही. परिसर ही प्रत्येक नागरिकाची चळवळ आहे. आपले प्रश्न दारिद्र्याशी दिल्या जाणाऱ्या झगड्यातून, विकासाच्या अपरिहार्य प्रक्रियेतून तयार होताहेत. विकासासाठी धरणे बांधणे, खाणी खोदणे, कीटकनाशकांचा शेतीसाठी उपयोग करणे, रस्ते रुंद करणे, मोकळ्या जमिनी वेगवेगळ्या उपयोगासाठी वापरणे, कारखाने बांधणे, वसाहती वाढवणे इत्यादी उपायांची गरज नाकारता येणार नाही; पण हे सर्व उपाय योजताना काही दिशा असू शकते, क्रम असू शकतो, पर्याय असू शकतात याचं भान आपण सर्वांनी ठेवणं महत्त्वाचं आहे. जिथून माघारी येता येणार नाही आणि फक्त कडेलोटच होईल अशा बिंदूपाशी आपण येतो आहोत की काय याचं भान आपण राखलंच पाहिजे!

कधीही न सुधारता येणाऱ्या चुका तर आपण करीत नाही ना याचा विचार करायला हवा. खरं तर माणसाच्या विकासाच्या अनेक गोष्टी किंवा माणसानं केलेले वेडेवाकडे चाळेही सामावून घेण्याची ताकद निसर्गात आहे; पण या ताकदीनाही काही मर्यादा आहेत. निसर्गधनाचा प्रमाणापलीकडे वापर करून आपण आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतो आहोत. इथं निसर्गसमतोलाची रेखा ओलांडली जाते, इतकंच नाही तर निसर्गाच्या व्याजावर सहजपणे जगता येणं शक्य असताना आपण मुद्दलालाच हात घालतो आणि गंभीर प्रश्न निर्माण करतो. आपल्या विकासासाठी निसर्गावर मात करण्यापेक्षा त्यात निसर्गाला सहभागी करून घेणं जास्त योग्य होईल.

याच दृष्टीनं 'परिसर'नं आपल्या कार्याची दिशा आखली आहे. या विषयावरील साहित्य व इतर साधनांचा संग्रह करणे, चळवळीचा प्रसार करणे, शहरात अशी कोणतीही घटना घडली तरी तिला कृतिशील प्रतिसाद वा विरोध करणे ही त्याच्या कार्याची दिशा आहे. त्या दृष्टीनं एक बुलेटिन प्रकाशित करण्याचा 'परिसर' चा मानस आहे. प्रदर्शने, चित्रपट, स्लाईड शो आयोजित करून चळवळीचा प्रसार करण्यात येणार आहे.

'परिसर' म्हणजे केवळ झाडे वाढवा, झोपडपट्टी सुधारा किंवा शहरे सुधारा अशा प्रकारची मोहीम नाही. प्रतीकात्मक कार्यापेक्षा कृतिशील कार्याकडे सुजाणतेनं लक्ष देणारी ही संघटना आहे. बघा, तुम्हालाही 'परिसर' मध्ये सहभागी होता येईल.

संपर्काचा पत्ता – 'यमुना', आय. सी. एस. कॉलनी, गणेशखिंडरस्ता, पुणे – ४११००७. □


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : दुसरा

१३ जून १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

मुंबई वार्ता । हमीद दलवाईंचा स्मृतीदिन

# ....त्यामुळे इस्लामी देशात नेहमी लष्करी उठाव होतात

## अ. भि. शहा

दिनांक ३ मे १९८१. मुस्लिमाची सुधारणा करण्यासाठी झटणारे झुजार नेते, मुस्लिम सत्यशोधक समाजाचे अध्वर्यु श्री. हमीद दलवाई याचा चौथा स्मृतिदिन, त्यानिमित्त या दिवशी मुस्लिम सत्यशोधक समाजातर्फे मुबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सभागृहात सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. अ. भि. शहा याचे 'इस्लामी संस्कृति' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

संध्याकाळी साडेपाच वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रा. मे. पु. रेगे अध्यक्षस्थानी होते. सुरुवातीला कै. हमीद दलवाई याच्या पत्नी मेहरुन्निसा दलवाई यानी आपले भाषण वाचून दाखविले. त्यामध्ये त्यानी हमीद दलवाई यांच्या कार्याची ओळख करून दिली. नंतर अध्यक्ष प्रा रेगे यांनी छोटेसे प्रास्ताविक भाषण केले. ते म्हणाले, प्रा. शहा इस्लामी संस्कृतीचे उत्तम अभ्यासक आहेत हमीद दलवाईंच्या कार्यात ते क्रियाशील सहाय्यक होते. दलवाईंच्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात या दोघाची अतिशय मैत्री होती. ते दोघे एकाच कार्यासाठी झटत होते.

यानंतर प्रा. शहा यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. त्यानी आपले भाषण बसून केले. त्यानी सुरुवातीलाच सागितले, 'मी मुद्दाम बसून बोलतो आहे. बसून बोलले म्हणजे भाषणबाजीचा आव येत नाही. भाषणानंतर तुम्ही प्रश्न विचारावेत. मला प्रश्नोत्तराचा कार्यक्रम जास्त आवडतो." त्यानी आपल्या भाषणात हमीद दलवाईंची थोडी माहिती दिली आणि इस्लामी सस्कृतीची ठळक वैशिष्ट्ये सागितली. सुरुवातीला इस्लामच्या अभ्यासाला आपण कसे लागलो, हमीदची ओळख कशी झाली. ती घटना त्यानी सागितली. ते म्हणाले, "सुरुवातीलाच एक गोष्ट स्पष्ट सागतो. पूर्वी मला इस्लाममध्ये रस नव्हता. हिंदु संस्कृतीतच रस होता. हमीदच्या भेटीनंतर मी इस्लाममध्ये रस घेऊ लागलो. हमीदची आणि माझी ओळख अगदी नाट्यमय प्रसंगी झाली. १९६७ मध्ये पुण्यातल्या लता काळे नावाच्या मुलीने शेख नावाच्या मुलाशी विवाह केला. त्या वेळी त्याच्या सत्कारप्रसंगी मी उपस्थित होतो. तेथे हमीदशी प्रत्यक्ष ओळख झाली. त्याआधी तो कथालेखक म्हणून माहीत होता. त्या सत्कारप्रसंगी मुस्लिमानी लता काळेच्या नावाने शिवीगाळ केली. तो एकंदर प्रकार पाहून सरकार या बाबतीत काही करू शकणार नाही, असे मला वाटले आणि हमीद स्वतःच्या समाजाचे दोष समजू शकतो, स्वतःच्या समाजाकडे चिकित्सक बुद्धीने पाहू शकतो हे कळले. इतर ठिकाणी हमीदला दगडानी ठेचून मारला असता, कारण इस्लामची आज्ञा आहे, जो धर्माविरुद्ध वागेल त्याला दगडानी ठेचून मारा. पण भारत Secular राष्ट्र असल्यामुळे, हिन्दूच्या परधर्मसहिष्णुतेमुळे येथे तसे घडू शकले नाही.' नंतर इस्लामविषयी बोलताना प्रा शहा म्हणाले, "व्यक्ती म्हणून इस्लाममध्ये माणसाला स्थान नाही. इस्लाम आणि लोकशाही, इस्लाम आणि राजकीय, सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्य या कल्पना विसंगत आहेत.

'कोणत्याही धर्मात काही गोष्टी समान असतात. हिंदू, ख्रिश्चन व मुसलमान या तीन धर्मांतही काही गोष्टी समान आहेत. ईश्वराबद्दलचे ज्ञान ते मुख्य ज्ञान आणि ऐहिक जीवनाचे ज्ञान ते दुय्यम ज्ञान, असेच तिन्ही धर्म म्हणतात. तिन्ही धर्मात स्त्री आणि पुरुष याचे स्थान समान नाही. हिंदूमध्ये स्त्री पापयोनी मानली गेली. ख्रिस्ती धर्मातही स्त्रीमुळे अधःपात होतो अशी कल्पना आहे. मुसलमानात स्त्री सर्व दृष्टीनी कमी दर्जाची समजली जाते. काही गोष्टी अशा समान दिसल्या तरी पुढे अनेक फरक पडत गेले. युरोपमध्ये प्रबोधनाची चळवळ झाली. त्यांनी धर्माचा काही भाग सोडून दिला. नवे विचार आत्मसात केले. हिंदूमध्येही १८३२ मधे बाळशास्त्री जांभेकरांपासून प्रबोधनाला प्रारंभ झाला. या प्रबोधनामुळे हिंदूची धर्मकल्पना काळाप्रमाणे बदलत गेली. पण प्रबोधन, प्रबोधनाची चळवळ इस्लाम जगतात झालीच नाही. इस्लामधर्मियांना स्वतःच्या धर्माच्या अभ्यासाची, मूलगामी तपासणीची भीतीच वाटते. यामुळे नवे विचार त्या समाजात रुजणे फार कठीण होते. 'शासनसंस्था' ही एक कल्पना पहा. कोणताही समाज शासनसंस्थेशिवाय जगू शकत नाही. हिंदूची शासनसंस्थेबद्दलची कल्पना राजा. 'राजधर्म' म्हणजे राजाने सत्तेचा उपयोग धर्माने घालून दिलेल्या मर्यादेत करावा अशी आपली धारणा होती. हिंदूमधे राजाविरुद्ध बंडाचा अधिकार जनतेला होता. 'इस्लाम'मध्ये शासनसंस्था कशासाठी ? 'इस्लाम'साठी. 'इस्लाम'च्या तत्त्वाप्रमाणे समाज अस्तित्वात रहावा एवढ्याचसाठी त्यांची शासनसंस्था. हिंदूमधे आज भा. ज. प. जरी सत्तेवर आला तरी समाजाच्या दडपणाने तो पुरोगामीच राहील. इस्लाममध्ये समाजाचे असे दडपण नाही. आज आपल्या घटनेत देवाचे नाव नाही. धर्माचे नाव नाही. येथे राष्ट्रपतिला कोर्टात बोलविता येऊ शकते इस्लामची घटना पारंपारिक आहे इस्लामचा संस्कार, आज्ञा अशी आहे. खलिफा कसाही असला तरी बंड करू नका! त्यामुळे त्यांच्या देशात लष्करी क्रांती होते. जनता क्रांती करीत नाही. जर कोणी लोकशाहीवादी निघाला तर त्याला निर्घृणपणे मारून टाकले जाते. वेगळे तत्त्वज्ञान माडणाऱ्या चार्वाकाचा आपल्याकडे छळ झाला;

परंतु अशी उदाहरणे अपवादानेच; Why I am not Christian ? असे सांगून रसेल त्याच समाजात सन्मानाने जगू शकतो. तसे इस्लाममध्ये घडत नाही. भारतात महंमद कासीमपासून चारशे वर्षे मुसलमान हे 'मुसलमान सुलतान' म्हणून जगले. एखाद्या साम्राज्याचे उदार सम्राट पालनकर्ते म्हणून जगले नाहीत. हिंदूकडे त्यांनी नेहमी 'काफिर' म्हणून पाहिले. अकबराच्या राज्यात सत्तर टक्के जागा गॅझेटेड पोस्ट बाहेरच्या शुद्ध रक्त मुसलमानांच्या होत्या. पंधरा टक्के बाटग्या सुलतानांना दिल्या होत्या आणि पंधरा टक्के हिंदूना दिल्या होत्या. त्या वेळी हिंदूंच्या लोकसंख्येचे प्रमाण पचाण्णव टक्के होते. अकबर किंवा कोणत्याही नबाबाने आपली मुलगी हिंदूंना दिली नाही. त्यानी हिंदु राजकन्याशी विवाह केले. याचा अर्थ सर्वधर्मसमभाव असा करता येणार नाही. इस्लाम धर्माप्रमाणे मुसलमान पुरुष ख्रिती, यहुदी, हिंदू स्त्रीशी विवाह करू शकतो, परंतु मुस्लिम स्त्री इतर पुरुषाशी विवाह करू शकत नाही.

## आझादांचा रुसवा

'मुस्लिम समाजाचे अस्तित्व 'समूह-अस्तित्व' आहे. त्यात जिनांसारखी धूर्त, राजकारणी, मुस्लिमांच्या धर्मात तुम्ही ढवळाढवळ करू नका वगैरे गोष्टी बोलून स्वार्थ साधणारी माणसे यशस्वी झाली. मौलाना अबुल कलम आझाद यांच्यासारखी उदार माणसे अयशस्वी झाली. मौलाना आझाद यांनी १९४७ मधे दिल्लीत परिषद घेऊन मुस्लिमांना सांगितले होते, वेगळघा जातीचा पक्ष करू नका. इतर कोणत्याही पक्षामधे तुम्ही सामील व्हा पण अबूल कलम आझादना यश आले नाही.

'जनता पक्ष सत्तेवर आला तेव्हा मुस्लिमांच्या सुधारणेची आशा वाटली. निदान मुस्लिम स्त्रियांवरचा अन्याय दूर होऊ शकेल असे वाटले; परंतु काहीच झाले नाही. मोठमोठघा स्थानांवरची माणसे काही करीत नाहीत. ती स्थान टिकवण्याच्याच धडपडीत असतात. ज्यांना या स्थानाच्या वाटेने जायचे नाही तेच या समाजासाठी काही करू शकतील. secular म्हणजे नास्तिकता असे नसून धर्म ही ज्याची त्याची खाजगी बाब आहे असा याचा अर्थ होतो. हमीदची insight कोणामध्ये दिसत नाही. कितीही विरोध झाला तरी हमीद खचला नाही. हमीदची दृष्टी इस्लामला आवश्यक आहे.'

डॉ. शहांच्या भाषणानंतर प्रा. रेगे यांनी हमीद दलवाई याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. नंतर डॉ. शहानी श्रोत्यांना प्रश्न विचारण्याची विनंती केली. परंतु श्रोत्याकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. दोन-तीन जुजबी प्रश्न विचारले गेले.

प्रश्न : धर्म ही खाजगी बाब आहे असे आपण म्हणता. गणेशोत्सव, होळी अशा वेळी ती सार्वजनिकच बाब होते. धर्म ही गोष्ट खाजगी कशी राहू शकेल ?

उत्तर : मी माझे बोलणे अधिकच स्पष्ट करायला हवे होते. धर्म 'खाजगी' म्हणजे धर्मात शासनाचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप नसावा असे मला अभिप्रेत आहे.

प्रश्न : इस्लाममध्ये प्रबोधनाची चळवळ झाली नाही असे आपण म्हणालात; पण तुर्कस्थानमध्ये केमाल पाशाने असा प्रयत्न केला होता ना ?

उत्तर : केमाल पाशाने प्रबोधनाचा प्रयत्न केला असे म्हणता येणार नाही. त्याने सुधारणा लादल्या. त्यामुळे विरोधी प्रतिक्रियाही तीव्र झाली.

डॉ. शहा हिंदू की मुसलमान, असा एक प्रश्न विचारला गेला, तेव्हा प्रा. रेगे यानी ते जैन असल्याचे सांगितले.'

समारंभानंतर 'Islam and Humanism या शीर्षकाखाली, डॉ. शहा यांच्या 'Religion and society in India' या आगामी पुस्तकातील एक भाग वाचावयास मिळाला. शहा यांचे विचार त्यात थोडे अधिक स्पष्ट होतात. ते येथे सारांशाने देत आहे-

भारतामध्ये आधुनिक, लोकशाहीवादी, सेक्युलर समाज निर्माण होण्याच्या मार्गात भारतातील मुस्लिम समाज हा मोठाच अडथळा आहे. भारतातील मुस्लिम नागरिकांना स्वत चे प्रश्न नाहीत असे यात म्हणावयाचे नाही, मागास जाती आणि मागास जमाती यांच्या खालोखाल अनेक प्रकारचा संघर्ष सोसावा लागणारा समाज मुसलमान समाज आहे. परंतु या दोन्हीमध्ये फरक आहे. मागास जाती-जमाती हिंदू परंपरेच्या बळी आहेत या परंपरेमुळे त्या ज्ञानाला वंचित आहेत आणि आर्थिकदृष्टया फारच दुर्बल आहेत. म्हणून लोकसत्ताक राज्याचे नागरिकत्वाचे हक्क उपभोगण्यास असमर्थ आहेत. राजकीय संघटना उभारणे आणि न्याय मिळविण्यासाठी सतत संघर्ष करणे एवढाच पर्याय त्याच्यापुढे आहे. मुस्लिमाचे असे नाही. ते मुख्यत्वे आपल्या स्वतःच्याच इतिहासाचे आणि परंपरेचे बळी आहेत. आर्थिकदृष्टया तेही दुर्बल असले तरी त्याचे कारण हिंदू नसून स्वतःच्याच बाधवाना-नोकरदाराना वाईट तऱ्हेने वागविणारे मुस्लिमच आहेत. शिवाय, मागास जाती-जमाती मूळ राष्ट्रीय प्रवाहात पूर्णपणे समाविष्ट होण्यास उत्सुक आहेत. सवर्ण हिंदूच त्यांना दोन हात दूर ठेऊ इच्छितात. मुस्लिम समाज मात्र स्वत चे अलग अस्तित्व टिकविण्यासाठी जागरूक आहे. सांस्कृतिकदृष्टया वेगळेपण बहुरंगी समाजात स्वागतार्हच आहे; परतु मुस्लिमांना स्वतःच्या धर्माची तत्त्वे आणि परंपरा यावर अधिष्ठित असे स्वत.च्या समाजाचे अस्तित्व आहे. मुस्लिमाचे प्रश्न समजावून घेण्यासाठी इस्लाम संस्कृती (culture) काय आहे ते समजावून घेणे आवश्यक आहे.

संस्कृति म्हणजे काय ? Ortegay Gasset यानी संस्कृतीची जी कल्पना माडली आहे त्यानुसार येथे संस्कृतीचा विचार केला आहे. प्रत्येक समाज काही मूल्याच्या आधारे उभा असतो. या मूल्यांमध्ये मनुष्याचा स्वत बद्दलचा विचार येतो आणि भोवतालच्या विश्वाबद्दलचा विचार येतो. मनुष्याचे ज्ञान आणि निर्मितिक्षमता, उत्तम जीवनाविषयीचा दृष्टिकोन सारे या मूल्यातच येते. या मूल्याच्या आधाराने समाजाची होणारी वाटचाल म्हणजे संस्कृती. काही समाज ही संस्कृतिमूल्ये 'धर्मा'च्या भाषेत मांडतात. काही समाज त्याविषयी 'आदर्शां'च्या भाषेत बोलतात. तर इतर काही समाज 'मनुष्याचा मनुष्याशी संबंध' या कल्पनेलाच प्राधान्य देऊन संस्कृतीविषयी बोलतात. हा ह्युमॅनिझम. या ह्यूमॅनिझमच्या दृष्टिकोणातून मी इस्लामी संस्कृती तपासणार आहे.

मनुष्याचा दृष्टिकोन आणि जीवन जगण्याचा मार्ग या दोन्ही गोष्टी ह्युमॅनिझममध्ये समाविष्ट आहेत. ह्युमॅनिस्ट व्यक्तिचा मनु-

ष्याच्या कृतीवर विश्वास पाहिजे आणि मनुष्याच्या प्रगतीसाठी त्याने सतत प्रयत्न केले पाहिजेत. ह्यूमॅनिझममध्ये धार्मिक किंवा सेक्यूलर कोणत्याच प्रकारची हुकुमशाही चालणार नाही हे अभिप्रेत आहे. ह्यूमॅनिस्टचा मनुष्याच्या शिक्षणक्षमतेवर विश्वास असावा. तो लोकशाहीवादी असावा. त्याचा धर्माकडे कल असला तरी बुद्धिवरही त्याचा विश्वास असेल तर तो म. गांधी किंवा श्वाइट्झर याचा जसा देवावर विश्वास होता त्या प्रकारचा विश्वास असावा. गेल्या चौदाशे वर्षांचा मुसलमानांचा पारंपारिक दृष्टिकोन मुळातच ह्यूमॅनिस्ट-विरोधी आहे. इस्लाममध्ये परमेश्वराचा नोकर किंवा मुस्लिम समाजाचा एक अवयव यापलीकडे व्यक्तीला स्थानच नाही. हिंदू किंवा ख्रिस्ती धर्मही व्यक्तीचा धर्मनिरपेक्ष विचार पूर्णपणे करतात असे म्हणता येत नाही. इस्लामच्या अल्लाचे 'सार्वभौमत्व' आणि हिंदूची 'धर्मा'ची कल्पना फारच जवळ आहे. बायबलसुद्धा या प्रकारचा विचार मांडतेच. तरी इस्लाम आणि या दोन्ही धर्मांत फरक आहे.

## हिंदू धर्माची वैशिष्ट्ये

हिंदूधर्म फार महत्त्वाच्या बाबतीत इस्लामपेक्षा वेगळा आहे हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाची प्रवर्तक कोणीएक व्यक्ती मानली गेली नाही. बुद्ध आणि महावीर याच्या अनुयायानी श्रुती (वेद आणि उपनिषद ) आपल्या म्हणून स्वीकारलेल्या नाहीत. तरीही वेद आणि उपनिषद याना आपल्या धार्मिक प्ररणेचा उगम समजणाऱ्या हिंदूप्रमाणेच बुद्ध आणि महावीराचे अनुयायी सांस्कृतिकदृष्ट्या हिंदू समजले जातात. विश्वाचा कोणी एक अद्भुत निर्माता असतो आणि तो विश्वाचा आधारही असतो, अशी हिंदूची कल्पना आहे असे लोकात रूढ आहे, तेही चुकीचे आहे. हिंदू धर्मात अशा प्रकारचा विश्वास नाही. हिंदू धर्मात एकाच व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या वर्गाला ऐहिक जीवनाचे आणि धार्मिक जीवनाचे असे दोन्ही अधिकार दिले जात नाहीत. याउलट इस्लामधर्माचे आहे त्यात राष्ट्र आणि चर्च यात फरक नाही. एहिक नागर जीवन आणि धार्मिक जीवन यात फरक केला जात नाही. युद्धाचा नेता हाच प्रार्थनेचाही प्रमुख असतो. यामुळे खलिफा हा राज्याचा हुकुमशहा असतो आणि धार्मिक बाबीतही तोच सर्वश्रेष्ठ असतो.

ख्रिस्ती धर्म असाच काही दृष्टीनी वेगळा आहे. बायबलमध्येही ईश्वराच्या सार्वभौमत्वाचा विचार आहे; परंतु त्यात राष्ट्र आणि धर्म यात निश्चित रेषेने फरक केला आहे. ग्रीकांच्या परंपरेचा प्रभावही ख्रिस्ती धर्म बदलण्यास कारणीभूत आहे. ग्रीकांमध्ये धर्मगुरू (Prophet) ही कल्पना नव्हती किंवा हिंदूप्रमाणे 'अवतार' ही कल्पनाही नव्हती. त्यामुळे त्याना वस्तूचे स्वरूप समजावून घेण्यासाठी निरीक्षण आणि तर्क यावरच अवलंबून रहावे लागे. ते अनेक देव मानणारे होते. त्याचे देव मनुष्यापासून वेगळे करता येत नसत. त्यांच्या देवामध्ये अद्भुत, दैवी शक्ती होती. परंतु त्याचे हेतु, साध्य (interests) सर्वसामान्य असत. त्यात अद्भुतता नव्हती. ग्रीकांच्या परंपरेचा परिणाम इस्लामवरही होऊ शकला असता. अलमामुनच्या काळात ('१३–३३) इस्लामचा ग्रीक संस्कृतीशी संबंध आला तेव्हा हे शक्य होते; परंतु तेव्हा ग्रीक संस्कृतीबाहेर थोडा कमी झाला होता आणि इस्लामही इतर संस्कार, वळण घेण्याच्या अवस्थेतून बाहेर पडून तसा ताठर झाला होता. इस्लामची प्रगती न होण्यास आणखी काही कारणे आहेत. आपसात सदैव झगडे करणाऱ्या टोळीवजा जमातीच्या समाजात इस्लामचा उदय झाला. स्वतःशी सहमत नसणाऱ्यांना क्रूर शिक्षा करण्यास हा समाज मागे-पुढे पहात नसे. त्यामुळे उदार टीका–प्रतिटीका इस्लाममध्ये संभवतच नसे. त्याचे पर्यवसान त्याची प्रगती थांबण्यात व्हावे हे स्वाभाविकच आहे. शिवाय धर्मगुरूच्या मृत्यूनंतर शंभर वर्षे, गतीहीन (stagnant) समाजात इस्लामची डाळघात भरण्यासारखी वाढ झाली. सतत मिळालेल्या विजयामुळे आपला धर्म अगदी पूर्ण बरोबर, त्याची तत्त्वे निर्दोष आणि तो इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे ही मुसलमानांची कल्पना बळावली. विरोध निर्दयपणे दाबून टाकला जाऊ लागला. त्यामुळ मुसलमानांतील उत्तम आणि धैर्यशील विद्वानदेखील धर्माच्या मूलतत्त्वासंबंधी प्रश्न उपस्थित होईल असे काहीही लिहिणे, बोलणे टाळण्याची खबरदारी घेत. मुटाझीलाइटस, इबन सीना, इबन खलदन ही या प्रकारच्या विद्वानाची उदाहरणे आहेत. इस्लामच केवळ असहिष्णू आहे असे नाही. पूर्वी ख्रिस्ती धर्माने असहिष्णुतेची परमावधी केली आहे; परंतु दोष हा आहे की, इस्लाम आजही विरोध आणि मनमोकळी चर्चा याबाबत असहिष्णु आहे. मुटाझिलाइटस आणि त्यांचे विरोधक यांच्या काळात आणि सुफी पंथाची वाढ झाली तेव्हा मुसलमानामधील कडवेपणा कमी होण्याची शक्यता होती; पण अल गझालीने (१०५८–११११) ती पूर्णपणे नष्ट केली. त्याने सुफी पंथाचा इस्लामशी मेळ घातला; परंतु सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल यासारखा तत्त्वज्ञाना आणि त्यांच्या, इस्लाममधील अनुयायाना ( इबन सीना, अल फराबी) पाखंडी ( unbelievers ) म्हणून ओरड केली. मुस्लिम समाजात तुर्कस्थानप्रमाणे मुद्दाम लादल्याशिवाय सुधारणा होणार नाही असेच यावरून वाटते. सर सय्यद अहमद खान (१८१७–१८९८), इजिप्तमधील मुहम्मद अबदुल्ला (१८४९–१९०५), मौलाना अबुल कलम आझाद (१८८८–१९५७) यानी इस्लामच्या तत्त्वाचा पुन्हा अर्थ लावून इस्लामचा कडवेपणा कमी करण्याचा प्रयत्न केला. तरीसुद्धा देवाने निर्माण केलेला कायदा 'शरीहा' किंवा इस्लामी परंपरेचे आधुनिक परिस्थितीशी नाते यासंबंधी उघड प्रश्न विचारण्यास शिक्षित मुसलमान धजावत नाही. हमीद दलवाई किंवा श्री. एम. आर. ए. बेग यांच्यासारख्या या बाबतीतील अपवादाना इस्लामने शत्रू म्हटले, एका सेक्यूलर राष्ट्राचे नागरिक असल्यामुळेच त्यांना वगळाने ठेवून मारण्यात आले नाही.


# व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद
अनुवादिका : माधुरी पुरंदरे
प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

SIEMENS

## सामाजिक कार्यकर्त्यांना आवाहन

आमचे कामगार जिथे राहतात त्या वस्तीत जाऊन त्यांच्या आणि कुटुंबियांच्या विविध समस्या सोडविण्यास सहाय्य करणारे सामाजिक कार्यकर्ते आम्हाला हवे आहेत.

मुलाला अभ्यासात मदत हवीय, पण त्याची आई त्याला मदत करण्यास असमर्थ असते. घरात पैशाची चणचण भासते आणि कर्ता पुरुष भरमसाठ व्याजाचे कर्ज काढतो. वास्तविक योग्य मार्गदर्शन लाभलं तर मान्यताप्राप्त संस्थांकडून त्याला ते मिळविता येईल. मुलांना खेळण्या-बागडण्याची संधी मिळत नाही, घरात पाण्याचा थेंब नाही, आजारपणाचाही त्रास आहे आणि आशेनं कुणाकडे पहावं या चिंतेत सारे आहेत. पोरगा चांगला हुशार आहे, पण घरात शिक्षण घेण्याचीच प्रथा नसल्यामुळे त्याची हुशारी वाया जातेय.

आता, हे सारेच प्रश्न चुटकीसरसे सुटतील असं आम्हाला म्हणायचं नाही; पण निदान हे प्रश्न समजावून घ्यावेत आणि ते सोडविण्यासाठी काही खास प्रयत्न करता यावेत अशी आमची धडपड आहे.

ज्या व्यक्तींना—विशेषतः महिलांना समाजकार्याची आवड आहे, ज्यांच्यापाशी समाजकल्याणाची पदवी किंवा पदविका आहे, कामगार वस्तीत समाजकार्य करण्याचा ४/५ वर्षांचा अनुभव आहे अशा व्यक्ती या कामासाठी लायक ठरतील. खऱ्या सहानुभूतीचा दृष्टिकोन आणि हरहुन्नरी स्वभाव या आवश्यक गोष्टी आहेत. मराठी लिहिता-बोलता येणंही आवश्यक.

सामाजिक कार्यकर्त्याला या कार्यक्षेत्रात वाटणारा रस आणि श्रद्धा या दोन गोष्टींवरच त्याचं या कार्यातलं यश अवलंबून आहे असं आम्हाला वाटतं. अशा व्यक्तीला उदारहस्ते मानधन देण्यात येईल.

**संपूर्ण तपशिलासह आपले अर्ज १० दिवसाच्या आत पुढील पत्त्यावर पाठवा. पाकिटावर डाव्या कोपऱ्यात "सामाजिक कार्यकर्ता" असा उल्लेख करा.**

**दि परसोनेल प्लॅनिंग मॅनेजर**
**सीमेन्स इंडिया लि.**
**पो. बॉ. ८५ ठाणे-बेलापूर रोड**
**कळवे, ठाणे-४०० ६०१**

**सीमेन्स इंडिया लि.**

6669

अशा या समाजात व्यक्तिगत स्वातंत्र्य, समानता वगैरे संभवतच नाही. कुराण गुलामगिरीला परवानगी देते. स्त्रियांना कमी लेखते. कुराण म्हणते, करारासाठी दोन पुरुष साक्षीदार हवेत. दोन पुरुष उपस्थित रहाणे शक्य नसेल तर एक पुरुष व दोन साक्षीदार स्त्रिया असाव्यात. एखाद्या माणसाला दोन मुले आणि तीन मुली असतील तर तो मृत्यू पावल्यावर संपत्तीचे सात समान भाग केले जातील. त्यातले दोनदोन भाग मुलांना दिले जातील आणि प्रत्येकी एक भाग मुलीला दिला जाईल. केवळ 'तलाक' एवढा शब्द बोलून मुस्लिम पुरुष घटस्फोट घेऊ शकतो; पण स्त्रीला घटस्फोट घेण्यास पतीची परवानगी लागते.

### इस्लाममधील समता

इस्लाममध्ये समानता आहे असा जो लोकप्रिय समज आहे त्यात दोन दृष्टींनी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. पहिले म्हणजे इस्लाममधील समानता फक्त इस्लामिक बांधवांपुरती मर्यादित आहे. ते 'एकाच परमेश्वराची लेकरे' या कल्पनेने अखिल मानवजातीकडे पहात नाहीत. त्यांच्या दृष्टीने मुस्लिमेतर लोक 'धिमिस' (Protected People) असतात किंवा 'काफिर' असतात काफिरांना कुराण किंवा तलवार यापैकी एकाची निवड करावी लागते. दुसरे म्हणजे समानतेचा हा संकुचित दृष्टिकोनही प्रार्थनेच्या वेळेपुरता मर्यादित आहे. संपत्ति वगैरे इतर संदर्भात ही समानता नाहीच. मुसलमान वांशिक श्रेष्ठत्व मानत नाही हे तसे खरे आहे. कारण धर्मगुरुने असे सांगितल्याचे दिसते की, 'अधिकारी व्यक्ती अबिसीनियन गुलाम असली तरी तिचे ऐकले पाहिजे. मात्र याशी विसंगत इतर कोठे तरी असेही उल्लेख आहेत की, 'कुरेश वंशात जन्माला आलेले बार खलिफा तुमच्यावर राज्य करतात' किंवा 'लोकांनी कुरेश वंशाचा आदर करावा.'

या सगळ्याचा अर्थ मुस्लिम जगतात ह्युमॅनिझम येऊच शकणार नाही असा घ्यायचा का ? मला तसे वाटत नाही. उत्क्रांतीची ही प्रक्रिया कठिण आहे, पण अशक्य नाही. 'इस्लाम'च्या संदेशात आधुनिक बुद्धिवादाला स्थान देणारे अंश दिसतात. उदा. मुसलमानांमधील बहुपत्नीकत्वाची चाल. इस्लामची बहुपत्नीकत्वाला परवानगी आहे; परंतु एखाद्या पुरुषाच्या मृत्यूमुळे त्याच्या विधवा होणाऱ्या स्त्रिया आणि पोरकी मुले यांची धर्मगुरूला दया येते. त्यामुळे त्याने म्हटले आहे एक पत्नी असताना जेव्हा दुसरे लग्न करायचे असेल तेव्हा ते विधवेशी करावे. त्यातही शक्य तितके अपत्य असलेल्या विधवेशी करावे. यावरून असे लक्षात येते, महंमदाने बहुपत्नीकत्वाला दिलेल्या परवानगीचे स्वरूप आणि हेतू आजचे मुसलमान लोक जे बहुपत्नीकत्व आपला धार्मिक हक्क म्हणून दाखवतात त्यापेक्षा खूपच वेगळे होते. महंमदाने एके ठिकाणी असेही म्हटले की, या जगाच्या

मलपृष्ठ २ पहा

उत्तरमीमांसा : १ :

स. शि. भावे

# आदर्श सेक्युलर हिंदूसमाज प्रबोधक स्वातंत्र्यवीर सावरकर

दोन आठवड्यांपूर्वी देशी प्रबोधनासंबंधी लिहिले. ते लिहिताना एका ज्वलज्जहाल परंतु दुर्दैवी क्रांतिकारकाची सतत आठवण होत होती. तो सदाप्रदीप्त क्रांतिकारक म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर.

सावरकर खरेच दुर्दैवी! त्यांच्या विरोधकांनी त्यांच्यावर सतत आकस धरला. त्यांचा छळ करण्याची संधी ते सतत शोधत राहिले. त्यांचे मित्र त्यांना पूर्णपणे कधी समजू शकले नाहीत. त्यांचे अनुयायी भक्त फक्त त्यांची पूजा बांधीत राहिले. त्यांनी सांगितलेला मार्ग भक्तांना कधी नीट उमजला नाही, उमजला तेव्हा पेलला नाही. गेली दहा-वीस वर्षे शत्रू-मित्र दोघेही त्यांना विसरून चालले आहेत.

पण सावरकरांना विसरता येणार नाही. त्यांचे वक्तृत्व विसरणे अशक्य, त्यांची कविता विसरणे अशक्य, त्यांचे धगधगत्या विचारांचे दाहक गद्य विसरणे अशक्य, त्यांचे अतुलनीय धैर्य विसरणे अशक्य, त्यांच्या अवघ्या व्यक्तिमत्त्वातील लवलवती आक्रमता विसरणे अशक्य.

पण सावरकर हल्ली विसरले जाऊ लागले आहेत. त्यांचा 'अवतार' किंवा 'देव' होऊन राहिला आहे. त्यांच्या जीवनातील प्रसंगांचे रसरसते माणूसपण लोपून अद्भुतरम्य देवत्व उरू पाहते आहे.

सावरकर म्हणजे त्रिखंडात गाजलेली मार्सेलसची उडी. सावरकर म्हणजे अंदमानच्या कोठडीतील भिंतीवर कोरलेल्या आणि मनोमन रचून पाठ केलेल्या 'कमला' खंडकाव्याच्या डौलदार ओळी. सावरकर म्हणजे कडव्या निष्ठेचा : हिंदुहृदयसम्राट!'— एखाद्या मोठ्या देवालयात कोरलेल्या शिल्पांसारखे सावरकरांचे हे विशेष भारतीयांच्या तीन पिढ्यांच्या अंत:करणात कायमचे कोरले गेलेले आहेत; पण या शिल्पाकृतींना आता पूज्यत्व आणि दूरत्व प्राप्त होत आहे. एक मार्गदर्शक, उत्तुंग व्यक्तित्व म्हणून न उरता, एक ऐतिहासिक-पौराणिक आख्यायिका अद्भुत गुण असलेल्या अवतारी पुरुषाची आख्यायिका–असे सावरकरांचे होऊ लागले आहे. आजच्या राजकीय प्रवाहात मार्क्सवादी आहेत, नव-गांधीवादी आहेत; पण सावरकरवादी कुणी नाही.

या साऱ्या विस्मरणात सावरकरांचा आणखी एक विशेष आणि त्यांची समृद्ध वैचारिक कामगिरी, याचा विसर पडला तर मोठे नवल वाटायचे कारण नाही.

नवल नाही; पण खेद वाटतो. आज आधुनिकता, प्रबोधन, इहवाद यांचा पुकारा जागृत मंडळीकडून होत आहे. महाराष्ट्रातला पहिला इहवादी, क्रांतिकारक, सामाजिक विचारवंत असा जो विनायक दामोदर सावरकर, त्यांचे इतरांस झाले तरी, या क्रांतिकारी मंडळीस विस्मरण व्हावे याचा खेद होतो.

भारतीय प्रबोधकांच्या परंपरेत खऱ्या अर्थाने इहवादी, बुद्धिवादी, शास्त्रवादी, आधुनिक आणि भविष्यवेधी असे आगरकरांनंतर फक्त सावरकरच दिसतात. लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, लोकसेवक गोखले, म. गांधी, गुरुदेव टागोर यांनी सर्वांनीच सर्वमंगल विश्वशक्तीचे/परमेश्वराचे अस्तित्व आणि अधिष्ठान मानले होते. सावरकरांनी परमेश्वर तर मानलेला नाहीच; पण विश्वशक्तीचे सर्वमंगलत्वही मान्य केलेले नाही. मानवातीत सर्वमंगल शक्तीसंबंधीची त्यांची ही सर्वव्यापक नास्तिकताच बहुधा त्यांना 'हिंदुहृदयसम्राट' मानणाऱ्यांनाही पचली किंवा रुचली नसावी.

पण आज जे सर्वधर्मसमभावाची किंवा त्याहीपुढे जाऊन खऱ्या सेक्युलॅरिझमची म्हणजे इहवादाची धुरा आपल्या खांद्यावर वाहत आहेत, त्यांनी सावरकरांचा विशुद्ध इहलोकवादी विचार आवर्जून समजून घ्यायला हवा असा आहे.

सावरकरांच्या हिंदुत्ववादी राजकारणामुळे त्यांच्यावर एकान्तिकतेचा आणि प्रतिगामित्वाचा शिक्का इतक्या पक्केपणाने बसविला गेला आहे की, समाजधारणेचे इहवादी, सुसंगत तत्त्वज्ञान त्यांच्या व्यक्त विचारातून सिद्ध होते ही वस्तुस्थिती बहुसंख्यांच्या नजरेआडच राहिलेली दिसते. 'राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे त्यांच्या विचारातील आशयाला आणि अभिव्यक्तीला मर्यादा पडल्या... त्यांच्या विचारांना सहसा कधी तत्त्वरूप येत नाही वा वस्तुनिष्ठ विचारवंतांची शुद्ध शास्त्रीय बैठकही लाभत नाही,' असे त्यांच्या विचारसृष्टीचे मूल्यमापन, त्यांच्याविषयी अतीव आदरभावना असणाऱ्या मीमांसकानाही करावेसे वाटले, हे दुर्दैव आहे.

सावरकरांच्या लेखनातील दुर्दम्य आवेशाने त्यांच्या लेखनातील खोलगंभीर, क्वचित नर्मकोमल, तत्त्वविचार कसा झाकला जातो ते यावरून दिसते. त्यांच्या व्यक्तित्वातील इतर प्रखर आणि झळझळीत पैलूंनी विचारवंत हा पैलू मागे पडतो. क्रांतिकारक, बेडर योद्धा, झंझावाती वक्ता, धूर्त नेता, उदात्त महाकवी हे त्यांचे पैलू वेगवेगळेही इतके आकर्षक, इतके परिणामकारक आहेत की ते एकत्र आल्यावर त्यांच्या तेजाने सामाजिक विचारवंत हा पैलू झाकोळावा यात नवल नाही. तथापि, या त्यांच्या पैलूचे पुनरुज्जीवन आणि पुनराकलन होणे अत्यंत आवश्यक आहे यातही शंका नाही.

¤

सावरकरांच्या विचारांचे पुनराकलन करताना, त्यांच्या विचारावरील दोन प्रमुख आक्षेपांचा विचार करू. मुसलमानांच्या कडवेपणाला तोंड देण्यासाठी सावरकरांनी हिन्दूंनीही कट्टर राहावे असा विचार मांडला

व हा विचार प्रतिगामी आहे, हा पहिला आक्षेप आहे. सावरकरांच्या विचाराला व्यापक जीवनदृष्टीचा पाया नाही, हा दुसरा आक्षेप आहे. या दोन्ही आक्षेपाचा क्रमाने विचार करू.

'पोथीनिष्ठा नष्ट करा!' असे सावरकरांनी हिंदू व मुसलमान दोघानाही बजावले आहे. त्याचे शब्द पाहा :

'पोथीनिष्ठपणामुळेच मुसलमानी समाज एकवटलेला, प्रबळ नि प्रगत होत आहे आणि यास्तव आपण त्याच्याहीपेक्षा अधिक पोथीनिष्ठ झाले म्हणजे अधिक प्रबळ नि प्रगत होऊ अशी समज आमच्या अनेक कळकळीच्या हिंदुसंघटकांमध्ये जी वावरत आहे ती मुळातच चुकलेली आहे ... मुसलमानांसारखे पोथीनिष्ठ होणे ही तोडीस तोड नसून युरोपियनाप्रमाणे विज्ञाननिष्ठ, प्रत्यक्षनिष्ठ, भौतिक उपयुक्ततानिष्ठ होणे ही खरी तोड आहे!'

मुसलमानांनाही त्यांनी दोन शब्द सांगितले आहेत. पहा: 'आमची मनापासून अशी इच्छा आहे की, हिंदी मुसलमानांनीही पोथीनिष्ठ प्रवृत्ती सोडून विज्ञाननिष्ठ बनावे, देवभोळेपणा नि धर्मवेड यांच्या खोड्यातून त्यांची बुद्धी मोकळी व्हावी आणि त्यांचा समाजही शिक्षित, प्रगत नि अभ्युन्नत व्हावा. मुसलमान जर विज्ञाननिष्ठ नि प्रगत झाले तर त्यात हिंदूचेही कल्याणच आहे.'

सांगितले नसते तर हा उतारा निर्धास्तपणे हमीद दलवाईंचा वाटू शकला असता. (हमीद दलवाईंनी सावरकरांच्या विचारातल्या या व्यापक लखलखीतपणाचा अनेक वेळा मनापासून गौरव केला होता.)

'हिंदू आणि मुसलमान–दोघानीही विज्ञाननिष्ठ व्हावे,' आणि 'मुसलमानांनी आधुनिक होण्यात हिंदूचेही कल्याण आहे'– हा विचार व्यापक आहे, समंजस आहे, एकांगी नाही– असेच म्हणावे लागेल ना? हा विचार प्रतिगामी तर नाहीच, पण कोणत्याही काळी तो आधुनिक आहे, असेच म्हणावे लागेल.

सावरकरांच्या विचाराला व्यापक जीवनदृष्टीचा पाया नाही, हा आक्षेपही सावरकरांच्या लेखनापुढे टिकणारा नाही. विश्वोत्पत्ती, विश्वविकास, विश्ववैचित्र्य या समष्टी विचारापासून सुरुवात करून मानवसापेक्ष सुखदुःख या व्याष्टिविचाराचा समावेश सावरकर त्यातच कसा करतात हे पाहणे हे बुद्धीला उत्तेजन देणारे आहे.

मनुष्याच्या जाणिवेमुळेच सर्व विश्वाची विभागणी 'सुखदायक' व 'दुःखदायक' अशी आत्मकेंद्रिततेमुळे तो करतो हे नोंदून, तीच पहिली व मुख्य चूक आहे असा पायाभूत निष्कर्ष सावरकर काढतात. ते म्हणतात– 'देवाने हे सारे विश्व, मनुष्यास त्याचा मध्यबिंदू कल्पून केवळ मनुष्याच्या सुखसोयीसाठीच निर्मिले ही भावना अगदी भाबडी, खुळी आणि खोटी आहे ... ज्या कोणत्या हेतूने वा हेतूवाचून ही विश्वाची प्रचंड, जगडव्याळ उलाढाल चालू आहे तीत एक अत्यंत तात्पुरता नि अत्यंत तुच्छ परिणाम म्हणून का होईना, पण मनुष्याला, त्याच्या लांबीरुन्दीच्या गजाने मापता यावे असे, त्याच्या संख्येत मोजता यावे असे, इतके सुख उपभोगिता येते हा मात्र आणि एवढाच काय तो ह्या विश्वाच्या देवाचा मनुष्यावर झालेला उपकार होय!'

निसर्ग, विश्व आणि त्यातील मानवसमाज यांचे व यांच्या परस्परसंबंधाचे हे आकलन मूलविचाराला शोभेल इतके व्यापक आहे. अशा विषम संबंधात आणि मानवी मर्यादेत नीतिधर्म कोणता–हेही सावरकरांनी निःसंदिग्धपणे सांगितले आहे–

'विश्वाची आद्य शक्ती ज्या काही ठराविक नियमांनी वर्तते आहे ते तिचे नियम समजतील ते समजून घेऊन त्यातल्या त्यात आपल्या मनुष्यजातीच्या हिताला नि सुखाला पोषक होतील तसा त्यांचा साधेल तसा उपयोग करून घेणे इतकेच मनुष्याच्या हातात आहे. मनुष्यजातीच्या सुखाला अनुकूल ते चागले, प्रतिकूल ते वाईट, अशी नीती–अनीतीची स्पष्ट मानवी व्याख्या केली पाहिजे देवास आवडते ते चांगले आणि मनुष्यास जे सुखदायी ते देवास आवडते ह्या दोन्ही समजुती खुळचट आहेत. कारण त्या असत्य आहेत. विश्वात आपण आहोत; पण विश्व आपले नाही. फार फार थोड्या अंशी ते आपणास अनुकूल आहे, फार फार मोठ्या अंशी ते आपणास प्रतिकूल आहे–असे जे आहे ते नीटपणे, धीटपणे समजून घेऊन त्याला बेधडक तोड देणे हीच खरी माणुसकी आहे! आणि विश्वाच्या देवाची खरी खरी तीच पूजा!!'

हे विवेचन वास्तववादी आहे आणि तरीही पूर्णपणे आशावादी आहे. मानवी अस्तित्वाची खरी मर्यादा सावरकरांनी ध्यानात घेतली आहे आणि तरी त्याची 'बेधडक' आक्रमकता कायम आहे. प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा सुरेख मेळ ह्या प्रतिपादनात साधला आहे. याचे मूळ कारण म्हणजे सावरकरांच्या व्यक्तित्वातील निर्लेप धीटपणा! या धीटपणामुळे आणि विशेष म्हणजे निर्लेपपणामुळे त्यांची दृष्टी अतिरंजित, स्वप्नाळू, श्रद्धाळू अशीही नाही आणि एकांगी, निराशावादी, पराभूत, भयग्रस्त अशीही नाही. ती संतुलित, व्यापक, वास्तव पण आत्मश्रद्ध अशी आहे; खरी खरी मानवतावादी दृष्टी आहे.

या विवेचनाला हिंदू, मुसलमानी किंवा भारतीय, युरपीय अशा मर्यादा पडलेल्या नाहीत हे विशेष लक्षात घेतले पाहिजे सावरकर येथे फक्त 'मनुष्यजाती' चा विचार करीत आहेत. हिंदू–मुसलमान असा भेदनिष्ठ विचार करीत नाहीत. विज्ञाननिष्ठा ही हिंदूप्रमाणे मुसलमानांनीही बाणवावी असा जो त्यांचा विचार वर पाहिला त्याशी हा 'मनुष्यजाती' चा व्यापक विचार अत्यंत सुसंगत आहे, हे कोणाच्याही ध्यानात येईल.

मनुष्यजातीचे सुख कोणते? कोणते असावे? या प्रश्नाचा विचार सावरकर येथे करीत नाहीत हे खरे. याचे कारण मनुष्यजातीने डोळसपणे इहवादी व्हावे, कोणतीही पोथी (doxy) असो, ती सोडावी, हे त्यांचे उद्दिष्ट आहे. ते जोपर्यंत साध्य होत नाही तोपर्यंत मनुष्यसुखाचा विचार कोणत्या ना कोणत्या पोथीच्या आधारेच होणार हे उघड आहे आज पन्नास वर्षांनंतरही सावरकरांना अभिप्रेत असा विज्ञाननिष्ठ इहवाद आपल्याला कोठे रुचला आहे? पचणे तर दूरच!

¤

सावरकर खरे विज्ञाननिष्ठ इहवादी असल्याने ते खरे वास्तवदृष्टीचे होते. विश्वशक्तीशी स्वतःचे असे एक नाते प्रस्थापित व्हावे ही व्यक्तीची भावनात्मक गरज असते हे त्यांनी ओळखले आहे आणि मान्यही केले आहे. त्यांनी लिहिले आहे–

'ज्या व्रतसाधनाविषयी किंवा त्यांच्या आध्यात्मिक वा पारलौकिक परिणामांविषयी ज्यास जसा आदर नि निष्ठा असेल तसे त्यांनी त्यास सुखेनैव आचरावे. त्यापासून लाभणारा आत्मप्रसाद हा भौतिक अशा

कोणत्याही आनंदाहून निरुपम आंतरिक जोड ज्यास देऊ शकतो त्यांनी त्यास सुखेनैव आस्वादावे.'

हे ते केवळ हिंदूंना सांगत आहेत असे नव्हे तर हिंदू, मुसलमान, ईसाई, यहुदी—ज्याना ज्याना म्हणून आत्मानंद अनुभवायचा असेल, त्याना तो स्वतःच्या वेगळ्या आणि खास पद्धतीने अनुभवण्याचा पूर्ण अधिकार आहे,असाच त्यांचा स्वच्छपणे 'धर्मनिरपेक्ष', आणि म्हणूनच 'सर्वधर्मसमभावी' असा अभिप्राय आहे.

मात्र, 'अशा अर्थाच्या ईश्वरी अधिष्ठानावर भौतिक, ऐहिक यश मुळीच अवलंबून नसते' अशी सावध सूचना त्यानी लगेच दिली आहे. याचा अर्थ, व्यक्तिसाक्षेप धर्माचरण वेगळे आणि समाजधारणचा विचार व नीती वेगळी असा सावरकरांचा विवेकी, मानवतावादी, इहवाद होता; असाच करावा लागेल. आगरकरानंतर असा लखलखीत आणि केवळ मानवी बुद्धीचा आधार घेणारा इहवाद फक्त सावरकरानीच मांडला आहे!

या स्वच्छ भूमिकेमुळे हिंदूंच्या आणि इतरही समाजांच्या अधःपाताचे विश्लेषण सावरकरांना अचूक केले आहे.

वर ज्या दोन वेगळ्या पातळ्या सांगितल्या त्या आत्मिक आणि ऐहिक पातळ्या मिश्र झाल्या की धर्मभोळेपणा सुरू होऊन समाजाचा अधःपात सुरू होतो, असे सावरकरांचे शास्त्रशुद्ध निदान आहे.

या अधःपातापासून ज्या विकृती आणि अपप्रवृत्ती निर्माण होतात त्यांची कठोर निर्भत्सना सावरकराना केली आहे. केवळ हिंदूंच्याच नव्हे तर इतर पंथातील अपप्रवृत्तावरही त्यांनी पुनःपुन्हा हल्ले चढविले आहेत.

हिंदूतील अपप्रवृत्तीवर ते विशेष त्वेषाने तुटून पडतात. कारण, आपले म्हणून, हिंदू सुधारावे याची त्याना अत्याग्रहाने तळमळ आहे. तेहतीस कोट देव गायीच्या मुखापासून पुच्छापर्यंत कोंबण्याची त्यानी निंदा केली आहे. ताव्याची पूजा करणे हा सत्यनारायण नसून असत्यनारायण आहे असे बजावले आहे. गायीची जर पूजा करायची तर देवाने वराहावतार घेतलेला असल्याने वराहाची का नको, असा कडू प्रश्न विचारला आहे.

हे ताडन करताना सावरकरांना सर्व समान आहेत. त्यांच्या ताडनातून कोणीही सुटलेले नाही. 'डॉ. आंबेडकर महार म्हणून जर त्यांना ढोर ओढण्याचेच काम करणे भाग पाडले असते तर आपले राष्ट्र एका उत्कृष्ट निर्बंधपंडिताला नि राजकारणधुरंधराला आचवले असते,' असे समकालीन उदाहरण देऊन, 'वेदोक्ताचा अधिकार इतरांना नाही म्हणणारी भटवाजी यापुढे चालता कामा नये.' असे त्यांनी बजावले

आहे. त्याचबरोबर, 'ब्राह्मण मराठ्यांचे ब्राह्मण बनू पाहतात, मराठे महारांचे ब्राह्मण बनू पाहतात, महार मांगांचे ब्राह्मण बनू पहातात,' अशा जातिभेदाचे हे विष दर एक जातीत मुरून 'समाजदेह क्षयाच्या भावनेने जीर्णशीर्ण झालेला आहे,' असा स्पष्ट अभिप्राय नोंदला आहे.

हिंदू समाजाच्या या भ्रष्टतेमुळे काय होईल याचे भविष्य—दर्शनही सावरकरानी केले आहे.

'जे हिंदुराष्ट्राचे स्वातंत्र्य आपणास मिळवायचे आहे ते जातिभेदाने जर्जर झालेल्या आपल्या राष्ट्रपुरुषास जरी एक वेळ मिळविता आले तरी या रोगाचे जोवर निर्मूलन झाले नाही तावर ते मिळविताच गमावण्याचाही पाया भरत जाणार आहे.'

गेली तीस वर्षे हाच विघटनाचा पाया आपण भरत आहोत काय? नामांतरविरोधी आंदोलन, राखीव जागाविरोधी आंदोलन ही कशाची लक्षणे आहेत? आणि आंदोलनांना विरोध करणाऱ्या पुरोगामी नेतृत्वाला सावरकर आठवू नयेत हे देखील कशाचे लक्षण आहे?

वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, लोकहितवादी, महात्मा ज्योतिबा फुले यांचेपासूनचे सर्व समाजप्रबोधक आणि सावरकर याचा ध्यास एकच आहे. सावरकरांच्या शब्दात तो पाहू :—

'बुद्धिवादी पक्षाचे प्रयत्न काही प्रमाणात सफळ होत आहेत ह्याची पुरातनांची हळहळ एक अखंडनीय साक्ष होय. यास्तव बुद्धिवादाचा भांडमार दुप्पट उत्साहाने चालवून धर्मभोळेपणाची मुसंडी मारू पाहणारी उचल पुन्हापुन्हा दाबून टाकली पाहिजे.'

यातली त्यांची प्रेमळ समाजशिक्षकाची भूमिका पाहावी:—

'हे काम करावयाचे ते हेटाळणीने नव्हे, रागाने नव्हे, गमत म्हणून नव्हे, द्वेषाने तर नव्हेच नव्हे; पण आपल्या राष्ट्राला धार्मिक अज्ञानाच्या तमोयुगातून आजच्या पुढारलेल्या विज्ञानयुगात आणून सोडणे हे आपले अत्यंत पवित्र असे कर्तव्य आहे. हाच एक खरा धर्म आहे.'

'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने
बुद्धयाच वाण धरिले, करि हे सतीचे'

अशा निष्ठेचा सावरकरांचा हा धर्म त्यांनी सांगितलाच नाही, तर आचरलाही! आमरणच नव्हे तर मरणोत्तरही! कोणताही पोथीभ्रष्ट विधी आपल्या देहावर होता कामा नये, असे त्यांनी कटाक्षाने सांगून ठेवले होते.

अशा एकाकी आचरणासाठी मोठे धैर्य लागते. गेल्या दीडशे वर्षांतील भल्याभल्या प्रबोधकांत आचरणाचे हे धैर्य नव्हते असे दिसते. या पार्श्वभूमीवर सावरकरांचा आदर्श विशेष उजळून दिसतो. विचार व आचार यांचे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेले एकजीव मिश्रण प्रबोधनाच्या चळवळींना अखंड प्रेरक ठरणारे आहे. □




अवतीभवती । शरद कृष्णन

## □ खासदार राजीव गांधी

ऑगस्ट ८० मध्ये म्हणजे केवळ नऊ महिन्यापूर्वी राजीव गांधी यांनी 'इंडिया टुडे' या पाक्षिकाला असे सांगितले होते की, मी काही या निवडणुकीच्या धामधुमीत पडणार नाही आणि अमेथी अथवा अलाहाबाद येथून निवडणुकीलाही उभा रहाणार नाही. कारण माझ्या मते, मी असे करणे हे कदाचित राजकीयदृष्ट्या सोयीचे असले तरी सयुक्तिक मुळीच नाही! राजीवसाहेब राजकारणात नसले तरी राजकीय प्रश्नाबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करत होते. आज ना उद्या राजीव राजकारणात येणार, ते निवडणूक लढवणार हे स्पष्ट झाल्यावरही एका फ्रेंच पत्रिकेला दिलेल्या मुलाखतीमध्ये ते म्हणतात–सत्ताधारी पक्षामधील कोणत्या तरी मोक्याच्या जागी ढकलले जाणे मला आवडणार नाही. त्यापेक्षा तळातून प्रारंभ करून स्वतःचा उदय करून घेणे मला जास्त आवडेल! सर्वसाधारण लोकांना रुचणारे–पटणारे असे विचार मुलगा व्यक्त करत असताना मातोश्री श्रीमती इंदिरा गांधी यांनी ११ ऑक्टोबर १९८० रोजी राजीव राजकारणात प्रवेश करणार असल्याच्या बातमीचा सुस्पष्ट इन्कार केला. अगदी अलीकडे इंदिराजी गल्फमध्ये गेल्या असता त्यांनी दुबईच्या 'खळीज टाइम्स' या वृत्तपत्राला मुलाखत दिली होती. त्या वेळी राजीवबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना त्या म्हणाल्या, आमची राज्यपद्धती अशी आहे की, ठरवून कोणी कोणाला सत्तास्थानी नेऊन बसवू शकत नाही. आम्ही राजकारणात आहो खरे; परंतु हा सारा प्रवास विलक्षण त्रासदायक आहे. कोणत्याही आईला, आपल्या मुलाने या वाटेने जावे असे वाटणार नाही. राजीव आणि इंदिराजी अशा पद्धतीने बोलत असले तरी राजीव राजकारणात येणार हे सगळ्यांनाच कळून चुकले होते. इंदिराजी आणि राजीव, एवढ्या नकारात्मक पद्धतीने बोलत होते याचाच अर्थ राजीव येणार असाच होता आणि हा मजकूर प्रसिद्ध होईल त्याच्या आगे–मागे राजीव गांधींची स्वारी खासदारकीची झूल चढवून अमेथीमार्गे नवी दिल्लीपर्यंत येऊन पोचलेली असेल!

अमेथी हा तसा कॉंग्रेसचा हुकमी मतदारसंघ. त्यात विरोधी पक्षाच्या आपापसात साठमाऱ्या चालू असल्याने इंदिरा कॉंग्रेसचे काम जास्त सोपे झाले आहे. या मतदार संघामध्ये भारतीय जनता पक्षाची तशी बरी ताकद आहे; पण आपला उमेदवार उभा न करण्याचा निर्णय भाजपने घेतला. दि. १४ जून रोजी जी निवडणूक होत आहे त्या निवडणुकीत राजीव गांधी हे सगळ्यात प्रबळ उमेदवार असून त्यांचा मात्र विजय अपेक्षित आहे. त्यांच्या विरोधामधील सगळ्यात प्रबळ उमेदवार आहेत लोकदलाचे शरद यादव. शरद यादव पूर्वी मध्यप्रदेश मधून लोकसभेवर निवडून गेले होते. या मतदारसंघात त्यांचा फारसा प्रभाव नसला तरी मागासलेल्या जातीची जी ऐंशी हजार मते आहेत त्यापैकी पुष्कळ मते आपल्याला पडतील असे त्यांना वाटते. लोकदलाला भाजपचा पाठिंबा मिळाला असता तर यादवांची परिस्थिती थोडी बरी झाली असती इतकेच. अरस कॉंग्रेस इतकी बदनाम झालेली आहे की, लोक या पक्षाच्या उमेदवाराचा फारसा विचारही करणार नाहीत. प्रतिशिवाजी अशा शब्दात ज्याचा त्यांच्या चाहत्याकडून गौरव करण्यात आला असे अरस कॉंग्रेसचे थोर नेते लवकरच दादाजी कोंडदेव बनून राजीव गांधींना मार्गदर्शन करताना दिसतील! मातब्बर मंडळी जागची हलल्यामुळे अनुयायी अस्वस्थ आहेत आणि सर्वसाधारण मतदाराच्या दृष्टीने तर अरस कॉंग्रेस हा एक विनोदाचाच विषय झाला आहे! असे असले तरी हा मजकूर मी लिहीत असेपर्यंत तरी अरस कॉंग्रेसचे उमेदवार भीमसिंग या मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. स्वतःच्या पक्षापेक्षाही त्यांची नजर भाजपकडे जास्त लागलेली आहे. या पक्षाने अधिकृतरीत्या काहीही घोषणा केलेली नसली तरी भाजपचा आपल्यालाच पाठिंबा आहे, असा दावा भीमसिंग करतात. मुस्लिम मजलिसचे उमेदवार आहेत फझलूर बारी. या मतदारसंघाशी त्यांचाही फारसा संबंध नाही; पण तरीही अन्यथा कॉंग्रेस आयच्या पदरात पडणारी बरीचशी मुस्लिम मते ते खातील. तथापि त्याचा निकालावर परिणाम होईल असे वाटत नाही. याखेरीज अपक्ष मंडळीचा मोठा फौजफाटाही निवडणुका लढवत आहे. त्यामध्ये रायबरेली आणि चिकमंगळूर येथून इंदिराजीविरुद्ध निवडणूक लढवणाऱ्या भारती दीक्षित यांचाही समावेश आहे. निवडणूक-प्रचारामध्ये विरोधी पक्ष वाढती महागाई व उ प्रदेशामधील कमालीचे असुरक्षिततेचे वातावरण याचे भांडवल करत आहे. खेरीज इंदिरा कॉंग्रेसतर्फे राजीव गांधी निवडणूक लढवत असल्याने एकाधिकारशाही, घराण्याचे राजकारण यासारख्या गोष्टींचेही भांडवल केले जात आहे. या निवडणुकीमध्ये तशी चुरस नसली तरी इंदिरा कॉंग्रेसतर्फे राजीव गांधी निवडणूक लढवत असल्याने लोकांना निकालाबद्दल उत्सुकता आहे. सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाच्या दृष्टीने ही जागा प्रतिष्ठेची असून स्वतः राजीव गांधी प्रचार मोहिमेमध्ये जातीने लक्ष घालत आहेत.

१९७७ चा अपवाद वगळता या मतदारसंघातून सातत्याने कॉंग्रेसचा उमेदवार विजयी झाला आहे. १९७७ मध्ये जनता पक्षातर्फे रवींद्रप्रताप सिंग ७५ हजार ८५६ मतांनी संजय गांधी यांचा पराभव करून निवडून आले होते. अर्थात त्या वेळी कॉंग्रेसविरोधी लाट उसळली होती आणि या लाटेवर स्वार होऊनच रवींद्र प्रतापसिंग लोकसभेपर्यंत जाऊन पोचले. विजयाचे सुख त्यांना फार काळ लाभू शकले नाही. केंद्रामध्ये जनता-शासन सत्तारूढ असतानाच उत्तर प्रदेशात ज्या विधानसभा निवडणुका झाल्या त्याच वेळी बदलत्या वाऱ्याची झुळुक जाणवली आणि त्यानंतर झालेल्या लोकसभा – निवडणुकीमध्ये संजय गांधींना निवडून देऊन अमेथीच्या मतदारांनी पुन्हा कॉंग्रेसशी जवळीक साधली. कै. संजय गांधी यांनी आपल्या नजिकच्या उमेदवाराचा एक लाख सतरा हजार मतांहून जास्त मतांनी पराभव केला होता. तथापि त्यांचे अपघाती निधन झाले आणि आता त्यांची रिकामी जागा त्यांचे बंधू राजीव गांधी

भरून काढत आहेत. राजीव गांधी यांनी ११ मे रोजी आपल्या उमेदवारीचा अर्ज दाखल केला आणि तेव्हापासून लगोलग प्रचारालाही प्रारंभ केला. सत्ताधारी पक्षाचे उमेदवार असल्याने त्यांना अनेक सुविधा उपलब्ध आहेत आणि या सुविधांचा पुरेपूर फायदा घेऊन राजीवने पद्धतशीरपणे आपली प्रचार मोहीम आखली. १० जूनपर्यंत त्याने जवळजवळ २४० सभातून भाषणे केली. लोक त्याचे ऐकण्यापेक्षा त्याला पाहण्यासाठी जमत होते आणि राजीवही काही नवीन विचार देण्यापेक्षा संजयचे अधुरे काम आपण पुरे करू, असे सांगत असे. राजीव हा काही वक्ता नव्हे. त्यामुळे जे काही थोडे-फार श्रोते जमत असत ते पूर्ण वेळ थांबत नसत. राजीवला पाहून ते निघून जात. इंदिराजींचा पुत्र आणि संजयचा भाऊ असल्याने आपण जर त्याला निवडून दिला तर हा मागासलेल्या अमेथीसाठी निश्चितपणे काही तरी करील, असा विश्वास लोकांना वाटू लागला आणि राजीवनेही लोक स्थानिक प्रश्नामध्ये जास्त लक्ष घालत आहेत हे लक्षात घेऊन आपल्या प्रचार मोहिमेमधील भाषणाची आखणी केली. लोकसभा निवडणुकीची प्रचार मोहीम व्यवस्थित चालवायची तर उमेदवाराला भरपूर वाहाने सहजी उपलब्ध झाली पाहिजेत आणि राजीवच्या निवडणूक प्रचार मोहिमेचे मुख्य सूत्रधार आहेत उत्तर प्रदेशचे वाहतूकमंत्री वीर बहादूर सिंग. याच वीर बहादूर सिंग यांनी कै. संजय गांधींची निवडणूक-मोहीम संभाळली होती.

राजीव गांधी निवडणूक जिंकणार याबाबत विरोधी पक्षियांनाही संदेह वाटत नाही. मात्र संजय गांधी एवढ्या प्रचंड बहुमतांनी त्यांचे हे बंधुराज लोकसभेत जाणार नाहीत, असा विरोधी पक्षांचा दावा आहे. याउलट राजीवचे प्रचारक आपण किमान दीड लाख मताचे आधिक्य मिळवू असा दावा करत आहेत. मते थोडी-फार इकडे तिकडे झाली तरी—राजीव गांधींच्या रूपाने क्षितिजावर 'नवा तारा' उगवला आहे याबाबत मात्र कोणतीही शंका नाही !

## □ अरस काँग्रेस : केरळमध्ये काय होणार ?

'अवती-भवती' या सदरामध्ये 'इंदिराभिमुखी अरस काँग्रेस' अशा मथळ्याखाली मी सुमारे महिन्याभरापूर्वीच विस्ताराने लिहिले होते. त्यानंतर यशवंतरावांनी या पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजिनामा दिला, त्या वेळी प्रामुख्याने त्यांच्याबद्दल लिहिले होते आणि त्या मजकुरात म्हटल्याप्रमाणे बहुतेक सर्व मंडळी अरस काँग्रेसला रामराम ठोकत असल्याने बघता बघता हा हा पक्ष नामशेष होईल. मधुकरराव चौधरी काही वेगळी भूमिका घेतील असे बंडाचा झेंडा फडकावणाऱ्या काही तरुण मंडळींना वाटत होते; पण मधुकररावांनी शरदरावांचे विमान साताऱ्याला उतरण्यापूर्वीच अरस काँग्रेसला रामराम ठोकला ! शरदराव काय करतील ? या प्रश्नाचे अखेरचे उत्तर हाती नसले तरी अंदाज असा की, उन्नीकृष्णन, अंबिका सोनी अथवा प्रियरंजनदास यांच्या गराड्यातून अलगद बाहेर पडून ते बहुमताच्या निर्णयाची ढाल पुढे करून साहेबांच्या मागे जाऊन बसलेले असतील. यापेक्षा त्यांचा निर्णय काही वेगळा असेल तर तो चमत्कार मानावा लागेल. महाराष्ट्रामध्ये अरस काँग्रेस सत्तेवर नसली तरी तो एक शक्तिशाली पक्ष होता. आणि कोणी काहीही म्हटले तरी शरदरावांमागे मोठे मनुष्यबळ होते यात शंका नाही. पुलोदचे सरकार सत्तेवर असताना जर अशी काही हालचाल झाली असती तर ती जास्त तापदायक ठरली असती, परंतु इंदिराजींनी एका फतव्याने त्या सरकारला, त्या वेळच्या विधानसभेला मूठमाती दिल्याने तशी अडचण उद्भवली नाही.

अरस काँग्रेस केरळमधील आघाडी सरकारमध्ये भागीदार आहे आणि हे सरकार बुडवण्यासाठी इंदिरा काँग्रेसने आटापिटा चालवला आहे. सी. एम. स्टीफन व योगेंद्र मकवाना या केंद्रीय मंत्र्यांनी डाव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या आघाडी सरकारविरुद्ध जोरदार टीका केली असून हे सरकार कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत अपयशी ठरल्याचा दावा केला आहे. अरस काँग्रेसच्या राष्ट्रीय पातळीवरील नेत्यांनी माना टाकल्या असल्या तरी अँन्थनी यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या अरस काँग्रेसने केरळमध्ये एकजूट चांगली टिकवून धरली आहे तथापि राष्ट्रीय पातळीवरील घटनांचा परिणाम होऊन केरळमधील आघाडी सरकार कोसळले तर ते केंद्र शासनाला हवे आहे. मात्र दिल्लीमधील पडझडीचा कोणताही परिणाम अद्याप तरी केरळमधील अरस काँग्रेसवर झालेला नाही. तेथील काँग्रेसवर अँथनी यांची घट्ट पकड आहे. आणि केरळमधील आघाडी सरकार चालावे अशी अँन्थनी यांची इच्छा आहे. याचा अर्थ सर्व सुरळीत आहे असा नाही. केरळमधील काँग्रेसचे अनेक आमदार आघाडी–सरकारच्या कामगिरीवर नाखूष आहेत आणि पक्षीय व्यासपीठावरून तेथील विद्यमान सरकारवर केल्या जाणाऱ्या टीकेची तीव्रता चांगलीच वाढली आहे. त्यातही पक्षामधील तरुण कार्यकर्त्यांना डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये आपल्या पक्षाने सामील व्हावे ही कल्पना रुचलेली नाही. जवळीक करायची असेल तर इंदिरा काँग्रेसबरोबर करावी, अशी या मंडळींची इच्छा आहे आणि नेमक्या याच मंडळींना सी. एम स्टीफन यांनी 'मी तुमच्याकडे मोठ्या आशेने पहात आहे,' असे सांगितले असून, काही तरुण नेत्यांच्या गाठी-भेटीही घेतल्या आहेत. अरस काँग्रेसचे केरळ विधानसभेमध्ये बावीस आमदार आहेत. अजून सर्व आमदार पक्षशिस्तीच्या मर्यादेमध्ये काम करत असले तरी नऊ आमदारांच्या एका गटाने इंदिरा काँग्रेसबरोबर सहकार्य करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या आमदारांची अशीही मागणी आहे की, आपल्या पक्षाने आघाडीमधून बाहेर पडण्याची वेळ आली असून अप्रिय होत असलेल्या राज्य शासनामधील पक्षाच्या मंत्र्यांनी तातडीने राजिनामे देणे जरूर आहे. अँथनी यांना हा विचार पटत नाही. स्थानिक परिस्थिती वेगळी असून येथे अरस काँग्रेसने डाव्या कम्युनिस्टांबरोबर सहकार्य चालू ठेवावे असे त्यांना वाटते. तथापि आपण याबाबत कोणतीही आक्रमक आणि आग्रही भूमिका घेणार नाही, असे त्यांनी पक्षामधील विरोधकांना सांगितले असून जुलैपर्यंत कोणीही कृती करू नये अशी विनंती केली आहे. जुलैमध्ये केंद्रीय पातळीवरील जे कोणी नेते उरले असतील त्यांच्याबरोबर चर्चा करून आपण आघाडी सरकारबाबत निर्णय घेऊ, असे श्री. अँन्थनी

यानी आपल्या सहकाऱ्यांना सांगितले आहे इंदिरा काँग्रेसला मात्र असे वाटते की, पक्षामधील वाढत्या दडपणामुळे श्री. अँन्थनी याना तेथील आघाडी सरकारमधून बाहेर दडण्याचा निर्णय घ्यावाच लागेल! आणि तसे झाले तर ते सरकार आपोआप कोसळणार आहे. आणि म्हणूनच अँन्थनी याची काँग्रेस कोणता निर्णय घेते याकडे इंदिरा काँग्रेस डोळे लावून बसली आहे.

## □ उ. प्रदेशातील अशांतता

उ. प्रदेश आणि बिहार या दोन राज्यांमधील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती चिंताजनक असल्याचा निष्कर्ष 'धर्मयुग' या पाक्षिकामधील एका लेखामध्ये काढण्यात आला आहे. या दोन्ही राज्यांचा दौरा केलेल्या एका मुंबईच्या प्राध्यापकाने हा लेख लिहिला आहे. उ. प्रदेशमधील २८ खेड्यांना भेटी देऊन आणि तेथील लोकांच्या मुलाखती घेऊन त्यानी आपले निष्कर्ष काढले आहेत. उ. प्रदेशामधील खेडयापाडयामधून दरोडेखोरांनी प्रचंड दहशत निर्माण केली असून तेथील पोलीस खाते या दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यात पूर्णपणे अयशस्वी झाले आहे केवळ एका महिन्यात दरोडेखोरानी ४२ मुडदे पाडल्याची माहिती देऊन या लेखात दरोडेखोराच्या गोळयांना बळी पडलेल्या या सर्व मंडळीची नावे देण्यात आली आहेत. तसेच त्यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबियांवर कोणता दारुण प्रसंग ओढावला आहे याचीही माहिती देण्यात आली आहे. फुलनदेवीच्या टोळीने कानपूर जिल्ह्यामधील बहामी नावाच्या खेड्यावर जोरदार हल्ला करून लूटमार केली आणि वीस लोकांना गोळ्या घालून ठार मारल्याने, बाजूच्या पाच पन्नास खेड्यांमध्ये मोठी घबराट निर्माण झाली. या बातमीपाठोपाठ डाकू छबीराम याच्या टोळीने मणीपुरी जिल्ह्यामध्ये सहा पोलिस व एक सबइंन्स्पेक्टर यांचा खून करून त्यांच्याजवळील हत्यारे पळवली. राज्य सरकारलाही या बातम्यांची दखल घ्यावीच लागली. बदामी येथील हत्याकांडाचे सचित्र वृत्तात प्रसिद्ध झाल्यावर राज्यपोलिसप्रमुख श्री. महेंद्र सिंग यांना निवृत्ती स्वीकारण्यास सांगितले गेले. तसेच पोलीस खात्याची पुनर्रचना करण्यात येऊन, दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग उघडण्यात येऊन भरपूर मनुष्यबळ व हत्यारे या विभागाला उपलब्ध करून देण्यात आली असून उपपोलीसप्रमुखाचा दर्जा असलेल्या अधिकाऱ्याच्या हाती या विभागाची सूत्रे देण्यात आली आहेत. असे होऊनही परिस्थिती सुधारली नसल्याने ग्रामीण भागामधील जनता हवालदिल झाली आहे. पोलीस खात्यातही घबराट उडाली असून पाच-सात हत्यारी-पोलीस आणि एखादा अधिकारी याची दरोडेखोराकडून सहजगत्या कत्तल केली जात असल्याने, किमान पंचवीस पोलीस आणि दोन अधिकारी असतील तरच धोकादायक भागामध्ये आपण काम करू, असे पोलिसामार्फत सांगण्यात आले आहे. दरोडेखोराचा बंदोबस्त करण्यासाठी जो विभाग उघडण्यात आला आहे, त्याची कचेरी आतापर्यंत आग्रा येथे होती; पण तेथून काम करणे म्हणजे उंटावरून शळघा हाकण्याप्रमाणे असल्यामुळे ही कचेरी आता जालून जिल्ह्यामधील कलापी येथे हलवण्यात आली आहे. पोलिसांबाबत जनतेला जराही विश्वास व आपुलकी वाटत नाही आणि दरोडेखोराबद्दल मात्र विलक्षण दहशत वाटत असल्याने जनतेकडून दरोडेखोराचा तपास लावण्याबाबत कोणतेही सहकार्य मिळत नाही, त्यामुळे काम करणे जास्त अवघड होऊन बसले आहे,असे मत गेली दहा वर्षे या विभागाचे इन्स्पेक्टर म्हणून काम करणाऱ्या श्री. सुरेंद्र शर्मा यांनी बोलून दाखवले. दरोडेखोरांच्या पाच मोठ्या टोळ्या उ. प्रदेशामधील खेड्यापाड्यात सध्या धुमाकूळ घालत आहेत महाविरा आणि पोथी या दरोडेखोरांच्या टोळीने शहाजानपूर आणि फरूकाबाद यांच्यामधील खेड्यांमध्ये एका सप्ताहात दोन दरोडे घालून सुमारे तेरा हजार रुपयांचा ऐवज पळवला आणि नऊ लोकांची हत्या केली. पोलिसाचा आळस तर इतका पराकोटीचा की, रस्त्यावर गोळी लागून मरून पडलेल्या जनार्दन डुबे नावाच्या शेतकऱ्याच्या मृत्यूचे कारण 'अपघाती मृत्यू' असे नोंदण्यात आले होते; परंतु प्रेत ताब्यात घेणाऱ्या त्याच्या मुलाने ओरड केल्यावर ही नोद रद्द करण्यात आली आणि दरोडेखोरांनी केलेल्या गोळीबारामध्ये जनार्दन मारला गेला अशी नोद केली आणि हा बदल करून घेण्यासाठी जनार्दनच्या मुलाला आठ दिवस धावपळ करावी लागली आणि जिल्हापातळीवरील पोलिसप्रमुखाशी संपर्क साधावा लागला. जनार्दनचा मुलगा एक धडपड्या निघाला; परंतु अन्यथा या प्रकरणांची कशी वाट लावण्यात येत असेल याची झलक या निमित्ताने जरूर पहावयास मिळाली. जनार्दनच्या मुलाचे छायाचित्र या लेखात प्रसिद्ध करण्यात आले असून आपल्या वडिलांच्या मृत्यूचे खरे कारण नोदले जाण्यासाठी त्याला किती धावपळ करावी लागली याचा तपशील देण्यात आला आहे. पाच माणसांच्या कुटुंबाचे महिन्याचे उत्पन्न जेमतेम १५० रु. असूनही आपण—पाचपन्नास रुपये खर्च करून आणि रोजची कामे आठवडाभर बंद ठेवून आपल्या वडिलांच्या मृत्यूचे खरे कारण नोदवून घेतले खरे, परंतु ही बातमी पोलिसांकरवी संबंधित दरोडेखोराच्या टोळीला समजली तर आपली खैर नाही असे त्याला वाटते. जनतेचा पोलिसावर किती विश्वास आहे हेही त्याच्या या विधानावरून स्पष्ट होते.

राजकीय कारणासाठीही दरोडेखोराच्या टोळीचा उपयोग करून घेण्यात येतो. आमदार लर्घुसिंग याच्या सांगण्यावरून डाकू महावीरा याच्या टोळीने माजी आमदार सतीश शर्मा यांचा खून केला. या प्रकरणी हरिजन जमातीकडून पोलिसांना खबर दिली गेल्याने महावीराने संबंधित खेड्यामधील हरिजनांची कत्तल केली आणि एकाच वेळी आठ हरिजनाना यमसदनास पाठवले. तरीही अजून पोलीस या महावीर डाकूला काही पकडू शकलेले नाहीत! डाकूची जात कोणती ही बाबही अतिशय महत्त्वाची असून डाकूच्या जातीचे पोलीस आणि जनता दोघेही त्या डाकूला सहकार्य करत असल्याचा अजब प्रकार पहावयास मिळतो अशी नोदही यासंबंधीच्या लेखात केली आहे. स्वतःच्या जातिच्या लोकांना हे डाकू हात लावत नाहीत. आणि त्याच्या बदल्यात ज्ञातिबांधवाकडून या डाकूना अडचणीच्या वेळी आश्रय मिळतो. अर्थात तसे करण्यात धोका असल्याने आश्रय देणारा भरपूर रकमेची मागणी करतो आणि डाकूही ती मागणी पूर्ण करतात. जनतेचाच आश्रय घेऊन हे मस्तवाल डाकू आपले हत्याकांडाचे आणि दरोडेखोरीचे सत्र पुढे चालू ठेवतात, तिताभी आणि

तारकेसेवा या खेड्यांवर दरोडा पडून अकरा माणसांचे मुडदे पाडल्याचे वृत्त पोलिसापर्यंत पोचल्यावर या खेड्यामोवतीचा परिसर तरी निदान आवळला जावा की नाही ? पण या हत्याकांडाने पोलिसांचा खासा विभागही इतका हादरून जातो की नेमके काय करावे हे त्यांना उमगत नाही. वर उल्लेख केलेल्या हत्याकांडाच्या दुसऱ्याच दिवशी दरोडेखोराच्या त्याच टोळीने लगतच्याच कन्वरपूर या खेड्यावर दरोडा घालून आणखी ११ लोकांची हत्या केली. आता या भयावह बातम्या जवळपासच्या खेड्यात पसरल्यावर भीतीचे वातावरण किती झपाट्याने पसरत असले पाहिजे याची कल्पना येते. राजकीय रणधुमाळीमध्ये मश्गुल झालेल्या नेत्याचे या चिंताजनक प्रकाराकडे जराही लक्ष नाही याबाबत लेखाच्या अखेरीस चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

याच लेखामध्ये बिहारमधील विद्यार्थ्यांमध्ये जो वाढता असंतोष पसरत चालला आहे त्याची दखल घेण्यात आली आहे. पाटणा येथील विद्यार्थी वसतिगृहात घुसून पोलिसानी विद्यार्थ्यांना मारहाण केली. त्याआधी एका चित्रगृहावर विद्यार्थ्यांनी दगडाचा मारा केला होता. कारण पोलिसाच्या मदतीने चित्रपटगृहाचे सचालकच काळ्या बाजारात तिकिटे विकतात असा विद्यार्थ्यांचा आरोप होता. या प्रकरणाचा थेट पोलिसाच्या हृदयाशी सबध असल्याने ते बिथरले व त्यानी वसतिगृहात घुसून विद्यार्थ्याना बडवले. याच मारपिटीमध्ये एका १९ वर्षाच्या विद्यार्थ्याचा बळी पडला! विद्यार्थ्यांचे म्हणणे असे की, पोलिसानी त्याला चक्क वरच्या मजल्यावरून खाली ढकलून दिला ! तर विद्यार्थ्यांचे हे म्हणणे निखालस असत्य असल्याचा दावा पोलीस करतात. त्याचे म्हणणे पोलीस लाठीमार करत असल्याचे पाहून घाबरून गेलेल्या या विद्यार्थ्याने पहिल्या मजल्यावरून खाली उडी मारली. ते खरे मानले तरी विद्यार्थी पोलिसाना किती टरकत असले पाहिजेत हेच त्यावरून स्पष्ट होते. बिहारमधील विद्यार्थ्यांमध्ये एकदर परिस्थितीबाबत कमालीची नाराजी आहे. आपले अतिशय साधेसाधे प्रश्नही शासन सोडवत नाही अशी विद्यार्थ्यांची तक्रार असून विद्यार्थीजगतामधील एकंदरं वातावरण कमालीचे निराशजनक आहे. रांची व भागलपूर ही दोन विद्यापीठे सोडली तर उरलेल्या मिथिला, बिहार आणि मगध विद्यापीठामधील कामकाज पूर्ण थडावले आहे. या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाने राज्यामधील सर्व विद्यापीठाचे कुलपती असलेल्या राज्यपालांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या मागण्या अतिशय साध्या होत्या. त्याचे म्हणणे एवढच की- १) विद्यापीठामधील वातावरण अभ्यासाला अनुकूल असे असावे. विद्यापीठाच्या आवारातून राजकारण खेळवले जाऊ नये. २) परीक्षाच्या वेळी होणारे गैरप्रकार थाबवण्यात यावेत. या प्रकरणी दोषी असणाऱ्याना शिक्षा व्हावी. ३) प्रयोगशाळामध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध व्हाव्यात. ४) वर्गामधून सपूर्ण अभ्यासक्रम शिकवला जाईल अशी दक्षता घेण्यात यावी. ५) प्रत्येक विद्यापीठाचे समृद्ध वाचनालय असावे. ६) निवासी विद्यार्थ्यांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळावे.

विद्यार्थ्यांना इतक्या साध्या आणि अत्यावश्यक गोष्टीसाठी मागण्या करण्याची वेळ यावी यावरूनच विद्यापीठाचा एकंदर दर्जा काय असेल याची कल्पना यावी. आणि अशा मागण्या घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांना कुलगुरु भेटले असते तर असे काय मोठे आकाश कोसळणार होते ? पण राज्यपाल ए. आर. किडवाई यानी विद्यार्थ्यांची भेट घेण्यास साफ नकार दिला ! त्यामुळे विद्यार्थी जास्तच बिथरले. पाटणा येथील ज्या प्रकरणाचा उल्लेख वर केला आहे त्या प्रकरणी दगावलेल्या विद्यार्थ्याला मृत्यू कशा प्रकारे आला त्याची चौकशी व्हावी अशी मागणी पुढे करून पाटण्यामधील सर्व विद्यार्थ्यांनी एक दिवसाचा लाक्षणिक संप केला व मृत विद्यार्थ्याच्या पालकाना दोन लाख रुपये नुकसानभरपायी देण्यात यावी अशी मागणी केली आहे. इतके झाल्यावर राज्य सरकार जागे झाले असून या प्रकरणी योग्य कारवाई करण्याचे आश्वासन राज्याच्या गृहमंत्र्यानी दिले आहे. तथापि आश्वासनावरही विद्यार्थ्यांचा विश्वास नसल्याने त्यांनी चक्री उपोषण सुरू केले आणि राज्यसरकारने मृत विद्यार्थ्याच्या पालकाना पंचवीस हजार रुपये देऊन लगोलग चौकशीचे काम सुरू केल्यावरच हे चक्री उपोषण थांबले आहे. या प्रकरणामुळे पोलीस विद्यार्थ्यांवर नाराज असून संधी मिळेल तिथे विद्यार्थ्यांची अडवणूक करण्याचे धोरण अवलंबिले जात आहे. पाटण्याच्या पोलीसप्रमुखाच्या बदलीची मागणी मान्य व्हावी यासाठीच विद्यार्थ्यांनी पाटण्यामध्ये एक दिवसाचा लाक्षणिक हरताळ यशस्वी करून दाखला. त्यानंतर या अधिकाऱ्याची बदली झाली असून विद्यार्थ्यांच्या मागण्यांची पूर्ती होण्याच्या दृष्टीने आपण योग्य त्या सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यानी सागितले आहे. वातावरणामधील तणाव त्यामुळें कमी झाला असला तरी अशांत परिस्थिती कायम आहे.

# शेतकरी संघटनेची महत्त्वाकांक्षा ... या देशातील दारिद्रय नाहीसं करावं



लेखक : विजय परुळकर । लेखांक : सहावा

पुण्याला परतल्यावर मी शरद जोशींची गाठ घेतली. निपाणीच्या तंबाखू शेतकऱ्यांच्या आणि कामगार-स्त्रियांच्या व्यथा त्यांच्या कानावर घातल्या. निपाणीत घेतलेल्या मुलाखतीच्या काही टेप्स त्यांना ऐकवल्या आणि सुभाष जोशी आणि गोपीनाथ धारियांचा आमंत्रणाचा निरोप पोहचता केला. शरद जोशींनी ह्या समस्येत लक्ष घालण्याचा निर्णय घेतला आणि ३० जानेवारी १९८१ रोजी आम्ही निपाणीत दाखल झालो.

तत्पूर्वी बी. बी. सी. टेलिव्हिजनच्या टीमनं पुण्यात माझ्याशी संपर्क साधला होता. त्यांना शरद जोशींची मुलाखत हवी होती आणि शेतकरी संघटनेबद्दल माहितीपट करायचा होता. ह्या संदर्भात बी. बी. सी. च्या लोकांनी माझ्याशी संपर्क साधावा ह्याचं मला थोडं आश्चर्य वाटलं; पण शरद जोशींनीच माझा फोन नंबर त्यांच्याकडे दिला होता, असं नंतर कळलं.

शरद जोशी निपाणीला जाणार आहेत असं कळताच बी. बी. सी. वाले खूष झाले. कारण नंतर, त्यांना गोव्याला जायचं होतं. निपाणी वाटवर म्हणजे एका ट्रिपमध्येच त्यांच्या दोन फिल्मस तयार होणार! मंडळी दिल्लीला राजीव गांधींची मुलाखत घेऊन पुण्यात आली होती.

आम्ही निपाणीला पोहचलो आणि आमच्यापाठोपाठ काही तासांतच एका मॅटॅडोरमधून बी. बी. सी चे चार-पाच बिनरंगी इंग्रज निपाणीच्या डाक बंगल्यात दाखल झाले. शरद जोशींच्या-पाठोपाठ 'परदेशी' टेलिव्हिजनवाल्यांचा ताफा आलेला पाहून निपाणीतील व्यापारी-दलालांचे चमचे अवाक झाले! वास्तविक हा एक निव्वळ योगायोग होता. निपाणीऐवजी शरद जोशींचा दौरा मराठवाडा किंवा विदर्भात असता तर बी. बी. सी. वाले तिथं गेले असते.

आम्ही सुभाष जोशींच्या घरी पोहचलो तेव्हा शरद जोशींच्या स्वागतासाठी तिथं शेतकरी कार्यकर्त्यांनी प्रचंड गर्दी केली होती. धारिया, बग, गनी पटेल, महंमद नाईक, डॉ. पाटील, सातापा शेटके, जक्कापा, एस. टी. चौगुले, दत्ता पांगम वगैरे आघाडीचे कार्यकर्ते तर हजर होतेच; पण व्यापारी-दलालांचे चमचेदेखील आले होते. सुभाष जोशींच्या घराला एखाद्या लग्नसमारंभाचं स्वरूप आलं होतं. सुनीताअक्काची प्रचंड धावपळ चालू होती. शंभर-सव्वाशे माणसांचं चहा-पाणी, जेवणखाण हे सगळं सुनीता-अक्का एकटी संभाळत होती! ही अक्का खरोखरीच अन्नपूर्णा आहे ह्याची साक्ष पटत होती!

पोटमाळावजा माडीवरच्या खोलीत माणसं दाटीवाटीनं बसली आणि बघता बघता चर्चेतून आंदोलनाच्या आखणीची सुरुवात झाली. गुडघ्याला मिठी मारून बसलेले 'सर' सांगत होते.

'निपाणीतील तंबाखू व्यापाऱ्यांच्याकडे नेहमी एक वर्षाचा तंबाखूचा स्टॉक शिल्लक असतो अशी समजूत आहे. असा 'रिझर्व स्टॉक' जरी त्यांच्याकडे असला तरी फेब्रुवारीच्या सुमारास जेव्हा विडी-कारखानदार मोठ्या प्रमाणात विडी–जर्दाची खरेदी सुरू करतात तेव्हा हा स्टॉक भराभर संपत जातो. तंबाखू व्यापाऱ्यांना पावसाळा सुरू होण्याअगोदरच म्हणजे फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे ह्या चार महिन्यांतच खरेदी आटोपावी लागते. पावसाळ्यात तंबाखूची खरेदी होत नाही आणि तंबाखूवर प्रक्रियादेखील करता येत नाही. दिवाळीपर्यंत म्हणजे ऑक्टोबर–नोव्हेंबरपर्यंत वाट पाहवी लागते. म्हणजे ऑक्टोबर ते मे ह्या आठ महिन्यात त्यांना प्रोसेसिंगची बहुतेक सर्व कामं संपवून, तंबाखूची 'चाकी' बनवून जर्दा विडी कारखानदाराकडे पाठवावाच लागतो.

'मागच्या वर्षी तंबाखूचं उत्पादन कमी होतं, त्यामुळं व्यापाऱ्यांकडे फार मोठा रिझर्व स्टॉक असण्याची शक्यता कमी आहे. निपाणीतील दोन बडे व्यापारी परवाच म्हणत होते—'तंबाखूची खरेदी लवकर उरकली पाहिजे. आंदोलनाची हवा आहे. ह्या बग आणि मंडळींनी आंदोलन वगैरे करायचं ठरवलं तर भलतीच अडचण होईल!' वरकरणी इकडचे व्यापारी तंबाखू खरेदीची घाई नसल्यासारखं जरी दाखवत असले तरी प्रत्यक्षात त्यांना लवकरात लवकर खरेदी सुरू करायची आहे. ह्या व्यापारी दलालांचे एजंट आतापासूनच गावोगाव घिरट्या घालू लागले आहेत. चालू वर्षीचा माल पुरविल्याखेरीज व्यापाऱ्यांना विडी कारखानदाराकडून मागील वर्षाचा उधारी वसूल होत नाही.

'विडी कारखानदार तंबाखूच्या साठवणीकरता प्रत्यक्ष भांडवल गुंतवत नाहीत व्यापाऱ्याकडून तयार जर्दा आल्यानंतर त्यापासून विडी तयार होऊन ती विकल्यानंतर म्हणजे जवळजवळ वर्षानं ते व्यापाऱ्यांना पेमेंट करतात. बहुतेक मोठे विडी-कारखानदार जवळ जवळ बिनरभांडवली विडी तयार करतात असं म्हटलं तरी हरकत नाही. त्यामुळेच मागील वर्षाची बाकी मिळविण्यासाठी निपाणीच्या व्यापाऱ्यांना नवा माल पुरविण्याची घाई झालेली असते आणि त्यासाठी तंबाखू खरेदी करण्याचीदेखील फेब्रुवारी ते मे ह्या चार महिन्यात घाई असते. त्यापैकी मार्च आणि एप्रिल हे दोन महिने खरेदीच्या दृष्टीनं महत्त्वाचे एकदा बजेट जाहीर झालं की खरेदीला जोर येतो. त्यानंतर मग उरलेल्या तंबाखूची खरेदी एकदम पावसाळ्यानंतर म्हणजे ऑक्टोबरनंतर!'

सुभाष जोशींचं बोलणं लक्षपूर्वक ऐकणारे शरद जोशी काहीशा गंभीरपणे म्हणाले-'हे असं जर असेल तर तंबाखू शेतकऱ्याला कमीत कमी दोन महिने तबाखू न विकता दम धरणं जरुरीचं आहे. समजा, व्यापाऱ्याच्याकडे भरपूर स्टॉक असल्यामुळं त्यांना खरो-खरीच तंबाखू खरेदीची घाई नसेल तर मात्र तंबाखू शेतकऱ्याला मार्च ते ऑक्टोबर असे आठ महिने तंबाखू न विकता दम धरण्याची ताकद पाहिजे. दोन महिन्यासाठी आंदोलन करायचं असल्यास त्याचं तंत्र वेगळं आणि आठ-नऊ महिने आंदोलन करण्याची जरूर भासली तर त्याचं तंत्र वेगळं असणार! हे सर्व ठरविण्यासाठी व्यापाऱ्यांच्या परिस्थितीबद्दल, त्यांच्याजवळील 'रिझर्व स्टॉक'बद्दल आपल्याकडील माहिती अचूक असणं अत्यंत महत्त्वाचं आहे. विडी कारखानदाराला यंदा मार्च महिन्यात पाहिजे तेवढा जर्दा उपलब्ध झाला नाही तर तो व्यापाऱ्यांचे मागील वर्षाचे पैसे देणार का?'

गनी पटेल म्हणाले-'विडी कारखानदार मागील बाकी चुकती करायला अळंटळमच करणार! तंबाखू व्यापाऱ्याची तो अडवणूक करणारच! त्याला माल मिळाला नाही तर तो गुजराथ, आंध्र इथून मिळेल तेवढा जर्दा जरूर पडल्यास रोखीनदेखील खरेदी करणार! ह्या वर्षापासून विडी कारखानदारांना विडीचं पानदेखील रोखीनं खरेदी करावं लागतंय. जरूर पडल्यास ते इतर प्रांतातून तंबाखू रोखीनं घेतील!'

आय. एन बेग ह्या अक्कोळ युवक संघाच्या तरुण कार्यकर्त्याला गनी पटेलाचं म्हणणं विशेष पटलं नसाव. काहीसं नाराजीनं बेग म्हणाला-'अहो, मुख्य मुद्दा तो नाही. आपण एकदा आंदोलन करायचा निर्णय घेतल्यावर किती काळ आपण खरेदी म्हणजेच आपल्या तंबाखूची विक्री रोखून धरू शकतो हे महत्त्वाचं आहे.'

गनी पटेल उत्तरादाखल काही बोलणार इतक्यात त्याना आवरत सुभाष जोशी समजुतीच्या स्वरात म्हणाले-'विडी कारखानदाराना सध्या विडीचं पान रोख घ्यावं लागत हा मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यांचा सर्व धंदा जो उधारीवर चालायचा त्यापैकी एक महत्त्वाचा कच्चा माल-विडीची पानं, त्याना आता रोखीनं खरेदी करावी लागतात आणि तीदेखील वाढीव दरात, म्हणजे विडी कारखानदाराकडे जो काही पैसा असेल त्यापैकी निम्मा त्याना रोख खरेदी-साठी वापरावाच लागतोय. ह्याचाच अर्थ असा की, तंबाखूच्या रोख खरेदीसाठी त्यांच्यापाशी आवश्यक तितका पैसा असण्याची शक्यता कमी त्यांना निपाणीमधील व्यापारी-दलालाकडून मिळणाऱ्या उधार मालावरच अवलंबून रहावं लागणार आणि इकडच्या व्यापाऱ्यांना मागील बाकी वसूल करण्यासाठी ह्या वर्षी जर्दा पाठवणं आवश्यक ठरणारच. तशात इकडच्या व्यापारी-दलालाचे आणि विडी कारखानदाराचे संबंध जुने आणि पूर्वापार चालत आलेले. त्या संबंधात ते कुठल्याही परिस्थितीत बिघाड येऊ देणार नाहीत.

'आपण जर ह्या पावसाळ्यापर्यंत तंबाखू विकायचा नाही असं म्हटलं तर व्यापारी अडचणीत येणार पावसाळ्यानंतर म्हणजे एकदम दिवाळीच्या सुमारास व्यापारी पुन्हा खरेदीचा प्रयत्न करणार. ह्याचाच अर्थ मार्चपासून तंबाखू विकायचा नसेल तर शेतकऱ्याची ऑक्टोबरपर्यंत दम धरण्याची तयारी पाहिजे. तेव्हढी त्याची ताकद आहे का - हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न!'

सरानी, गनी पटेल आणि बेग ह्या दोघानी उपस्थित केलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांची सुरेख सांगड घालून मुद्दा स्पष्ट केला तेव्हा शरद जोशींनी प्रश्न केला, 'समजा, निपाणीतील व्यापाऱ्यानी गुजराथचा तंबाखू जास्त खरेदी करून त्यात हजर स्टॉकमधील निपाणीचा-अक्कोळचा तंबाखू मिसळून विडी कारखानदारांना जरूर तितका जर्दा पुरविण्याची व्यवस्था केली तर?'

सुपारी कातरत जक्काप्पा शांतपणे म्हणाला, 'हे करणं थोडे दिवस शक्य आहे- जास्त दिवस हा प्रकार चालणार नाही. प्रत्येक नामांकित विडीमध्ये निपाणी आणि गुजराथ तबाखूचं एक विशिष्ट प्रमाणातलं 'मिक्शर' असतं. त्यावरून त्या विडीचा स्वाद ठरतो. गिऱ्हाईक त्या विशिष्ट स्वादासाठी ती विडी खरेदी करतं. ह्या 'मिक्शर' मध्ये जो निपाणीचा तबाखू मिसळला जातो तो कमीत कमी वर्षभर साठवून जुना केलेला असावा लागतो. इकडच्या व्यापाऱ्यांनी गुजराथचा जादा तंबाखू मिसळून जर्दा बनवला तर विडीची 'टेस्ट' खराब होईल गिऱ्हाईक ही विडी ओढणारच नाही. विडी कारखानदाराचा धंदा मार खाईल आणि तो बोंब मारेल!'

जमलेली मंडळी जक्काप्पाच्या म्हणण्याला जोरजोरात मान हलवून दुजोरा देत होती. पण एस. टी. चौगुलेंना कसला तरी इशारा द्यावा अस वाटत होतं. ते म्हणाले, 'गिऱ्हाइकाच्या चवीची आज-काल काही ग्यॅरंटी देता येत नाही. आपण गावरान ज्वारी खाणारी माणसं पण आता मुकाट्यानं हायब्रीड जोंधळा खातोच की नाही? निपाणीचा दर्जेदार तवाखू मिळाला नाही म्हणून गुजराथच्या तंबाखूची विडी जर बाजारात आली तर थोडे दिवस गिऱ्हाईक कुरकुर करेल; पण हळूहळू त्याला विडीच्या कमअस्सल स्वादाचीही सवय होईल आणि काही दिवसात विडीच्या जर्द्यामध्ये निपाणी-अक्कोळच्या दर्जेदार तंबाखूची गरजच उरणार नाही आणि आपलीच व्यापारपेठ बंद होईल, ही शक्यता आपल्याला दुर्लक्षून चालणार नाही. आपण ह्याचा गभीरपणे विचार केला पाहिजे!'

एस. टी. चौगुलेंनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर बरीच वादावादी झाली. कुणी गावरान खेदार तूर आणि डालडाचं उदाहरण दिलं, तर कुणी आईचं दूध विरुद्ध दुधाची भुकटी हा प्रश्न काढला. मुख्य विषय बाजूला पडू लागला तेव्हा बेग उठून उभा राहिला. हातानं

सर्वांना शांत रहाण्याचा इशारा करत आवाज चढवून म्हणाला,

'हे बघा, गिऱ्हाइकाला उत्तम विडी मिळावी आणि दर्जेदार तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्याचं देखील कल्याण व्हावं असं काही इकडच्या व्यापारी-दलालांचं ध्येय नाही. ते फक्त स्वत.चा धंदा आणि स्वत.चा फायदा बघणार. कमी किंमतीचा भेसळ माल जास्त किमतीला विकून भरमसाठ नफा मिळणार असेल तर त्यात व्यापाऱ्याना आनदच वाटणार. आपल्या दर्जेदार तंबाखूला त्याचा उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव जर पाहिजे असेल तर तो व्यापारीमंडळी सहजासहजी देणार नाहीत, हे ध्यानात घेऊन आपल्या तंबाखूला रास्त भाव मिळण्यासाठी आदोलन करायचं का नाही, करायचं झाल्यास कुठच्या मार्गानं,- ह्याबद्दल आपण चर्चा करणं महत्त्वाचं; गिऱ्हाईक विडी ओढणार की नाही, विडी कारखानदाराचा धंदा चालणार की नाही ह्याच्याशी आपल्याला सध्या कर्तव्य नाही.'

आय. एन. बेगच्या रोकठोक बोलण्यानं मंडळी थोडी-फार सावरली. बेग खाली बसला तेव्हा त्याच्यापाठोपाठ महमद नाईक उठून उभे राहिले आणि सागू लागले–

'आपण जे भलतेच मुद्दे उपस्थित करून उगाचच भीती वाटून घेतोय ती अवास्तव आहे. गुजराथमध्ये कितीही तंबाखू पिको, इकडचे व्यापारी गुजराथचा तंबाखू कितीही खरेदी करोत, निपाणीच्या मातीत तंबाखू पिकविणाऱ्यानी त्याबद्दल चिंता करण्याचं काहीच कारण नाही. निपाणीच्या दर्जेदार तंबाखूला कर्नाटकच्या समुद्रकिनाऱ्याच्या भागात, कोकणात, केरळ, मध्यप्रदेश, मद्रास, पजाब ह्या प्रांतात भरपूर मागणी आहे. आपला निपाणीचा तंबाखू जितके दिवस ठेवावा तितका त्याचा दर्जा वाढतो, स्वाद वाढतो.

'गुजरातचा तंबाखू हा फक्त 'टेंपररी किक' देणारा. एकदा ओढला की ठसका आणि नाका-तोंडातून पाणी. गुजरातचा तंबाखू जर साठवला तर पावसाळ्यात तो भोपळ्याच्या पाल्यासारखा होतो. त्यामुळे गुजरातमध्ये कितीही तंबाखू पिकला, इकडच्या व्यापाऱ्यानी गुजरातचा तंबाखू कितीही खरेदी केला तरी त्या भोपळ्याच्या पाल्यात निपाणीचा तंबाखू मिसळल्याशिवाय विडी तयारच होणार नाही. तेव्हा आपण उगाचच कशाचा तरी बाऊ करून स्वतःलाच भीती घालून घेण्याची जरूर नाही.

'आपला माल दर्जेदार आहे इतकेच नव्हे, तर त्याशिवाय विडी कारखानदाराचं चालणारच नाही इतका तो अत्यावश्यक आहे. इकडच्या व्यापाऱ्याना आपल्या तंबाखूची खरेदी केल्याशिवाय विडी-जर्दा विकण्याचा धदा करताच येणार नाही, अशी सत्य परिस्थिती आहे. नुसत्या तेंडूच्या पानाचा कुणी धूर काढत बसणार नाही.

'गुजरातचा तंबाखू शेतकरी तर निपाणीचा शेतकरी आदोलन कधी सुरू करतोय ह्याची वाटच बघत असणार. आपल्याला भाव मिळाला तर गुजरातच्या शेतकऱ्याच्या पदरात देखील चार पैसे जास्त पडणार. १९७८ साली मोहन धारिया केन्द्रीय मंत्री असताना ही गोष्ट घडलीच आहे.

'गुजरातच्या शेतकऱ्याना तेव्हा चार आणे किलो भाव मिळत होता. आपण आदोलन केलं, आपल्याला काहीच मिळालं नाही, गुजरातच्या शेतकऱ्याला मात्र एक रुपया भाव मिळाला.

'गुजरातचा तंबाखू तेव्हा चार आणे किलो होता आणि धारियांनी दिलेला एक रुपया भाव त्यांना भलताच किफायतशीर ठरला ह्याचं कारण आपल्या इकडच्यासारखं काडीसूट, मातीसूट, गाडीसूट, हवासूट, शेकडासूट, बारदानसूट असले गैरप्रकार तिथं नाहीत. ते तंबाखूचा ढीग घालून विकतात. तंबाखूचं वजन खोडासकट असतं. आपल्यासारखं नुसत पान नाही. तंबाखूचा दर्जादेखील अगदी हलका. चार आण्याच्या जागी त्याना रुपया भाव मिळाला म्हणजे फायदाच फायदा ! आपण तेव्हा पाच आणि आठ रुपयांत तंबाखू विकत होतो, पण मोहन धारियाच्या दरानं आपला गळा कापला!

'त्या आंदोलनाच्या वेळी वाटाघाटी करण्यासाठी मी आणि सुभाष जोशी असे दोघंजण दिल्लीला गेलो होतो. गुजरातमधून मात्र प्रत्येक सोसायटीतर्फे एक असे वीस-पंचवीसजण स्वखर्चानं आले होते. तेव्हा मनुभाई पटेल हे एम्. पी. सागत होते की, गुजराथचा तंबाखू साठवता येत नसल्यामुळं मिळेल त्या किंमतीला विकावाच लागतो. साठवला तर तंबाखू खराब होतो, त्याला बुरा चढतो, त्यात किडे पडतात. गुजरातचा तंबाखू हा फक्त एप्रिल आणि मे ह्या कडक उन्हाळ्याच्या दोन महिन्यांतच वापरता येतो. जून, जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर ह्या महिन्यात निपाणीचाच तंबाखू बिडी बनविण्यासाठी वापरावा लागतो. समुद्रकिनाऱ्याच्या भागात तर गुजरात तंबाखूची विडी अजिबात खपत नाही. समुद्रकिनाऱ्याला गुजरातचा तंबाखू खाण्यासाठीदेखील कुणी तोंडात धरत नाही, समुद्राच्या हवेला फक्त निपाणीची विडी टिकते. हे असं असताना आपण गुजरातच्या तंबाखूबद्दल काळजी करण्याचं कारण आहे असं मला वाटत नाही. त्याबद्दल काल्पनिक भीती निर्माण करण्यात काही अर्थ नाही.

'दुसरी काल्पनिक भीती आपण निर्माण करतोय ती म्हणजे व्यापारी आणि कारखानदार आपल्याला वर्ष–नऊ महिने तगवू शकतील ही ! त्याच्याजवळ भरपूर स्टॉक असतो अस आपल्याला वाटतं; पण हे चूक आहे. दहा वर्षांपूर्वी व्यापाऱ्याकडे असा स्टॉक असायचा; आता त्याच्याकडे चार-पाच महिन्याच्यावर स्टॉक असत नाही आणि तोदेखील फक्त मोठ्या व्यापाऱ्याकडे. अनेक छोटे बिडी कारखानदार दहा-पंधरा पोती जर्दा खरेदी करून ताबडतोब विडी करून विकणारे आहेत.

'गणेश विडीवाल्याकडे थोडा-फार रिझर्व स्टॉक असेल; पण वर्षाचा नाही. जास्तीत जास्त चार महिन्याचा. ही विडी सपूर्ण हिंदुस्थानभर खपणारी आहे. त्याचा शिल्लक स्टॉक सपणार असेल तर त्याची तरतूद त्याना उन्हाळ्यातच करावी लागते आणि म्हणून असा बडा विडी कारखानदार इकडच्या दलालाना सांगतो की, मिळेल त्या भावानं तंबाखू खरेदी करा आणि प्रोसेसिंग करून जर्दा तयार ठेवा ! मे महिन्यापर्यंत निपाणीच्या सर्व तंबाखूची खरेदी झाली पाहिजे आणि स्टॉकमधील जुन्या तंबाखूचं प्रोसेसिंग पार पडलं पाहिजे अशी इकडची पद्धत आहे.

'मार्चपासून आपण तंबाखू विकायचा नाही असं ठरवलं तर त्याचा परिणाम इकडच्या व्यापारी-दलालाच्या सपूर्ण वर्षाच्या व्यवहारावर होईल, विडी कारखानदाराच्या विक्रीवर होईल हे निश्चित. त्यामुळं आता काल्पनिक मुद्दे उपस्थित करण्यात आपण वेळ घालवू नये असं मला वाटतं.'

महंमद नाइकांनी आपलं छोटसं भाषण आवरतं घेतलं तेव्हा विचारमग्न बसलेले शरद जोशी म्हणाले–'काल्पनिक असोत, खरे किंवा खोटे असोत, धोक्याचे आणि भीतीचे सर्व मुद्दे आत्ताच मांडावे हे महत्त्वाचं. आपण जर आंदोलनाची तयारी करणार असलो तर वाईटात वाईट कुठल्या परिस्थितीला तोंड द्यावं लागेल ह्याची काल्पनिक का होईना, जाणीव असली तर त्यात काहीच बिघडत नाही.

'नाइकांनी मांडलेले महत्त्वाचे दोन मुद्दे असे : निपाणीचा तंबाखू विडी व्यापारासाठी कुणालाच टाळता येणार नाही ह्या त्यांच्या पहिल्या मुद्द्याबद्दल माझं मत सांगतो; हा धोका अजिबात नाही असं कृपया कुणीही गृहीत धरू नये. ज्यूट कारखानदारांनी ज्यूटचा भाव आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाढविण्याचा एकदा प्रयत्न केला' त्याना भाव तर मिळाला नाहीच, उलट परिणाम म्हणून कृत्रिम धाग्याची स्वस्त बारदानं बाजारपेठेत आली. विडी ओढणाऱ्याना पहिल्यांदा झटका बसेल, चव आवडणार नाही; पण दुसरी चांगली विडी मिळतच नाही म्हटल्यावर मिळणाऱ्या विडीची सवय होईल.

नाइकांनी मांडलेल्या दुसऱ्या मुद्याबद्दल मला असं वाटतं की, जर ह्या खेपेला निपाणी आणि गुजरात ह्या दोन्ही ठिकाणी एकाच वेळी लढा उभा करता आला तर तो जास्त परिणामकारक होईल '

इतका वेळ शांतपणे बसून असलेला आय एन. बेग पुन्हा उठून उभा राहिला आणि म्हणाला, 'इथं एक गोष्ट आपण लक्षात घ्यायला पाहिजे. १९७३ साली ह्या भागात दुष्काळ पडला. इकडचा सगळा तंबाखू जिरायती आणि पावसावर पिकणारा. दुष्काळात तंबाखू पिकालाच नाही. तेव्हा विडी कारखानदाराचा धंदा बुडाला काय ? नाही ! त्या दुष्काळापासून इकडचे दलाल गुजरातचा तंबाखू खरेदी करू लागले. तेव्हापासूनच विडी ओढणाऱ्याला गुजरातच्या तंबाखूची सवय झाली आहे टेस्ट बसत गेली आहे. दुष्काळात निपाणी अक्कोळचा दर्जेदार तंबाखू उपलब्ध नव्हता तेव्हा विडी कारखानदारांनी गुजरातचा तंबाखू वापरलाच आणि आपली नामांकित विडी खपवलीच, हे ध्यानात घेतलं पाहिजे. त्यानी तेव्हा जाहिरातबाजीसाठी पैसे खर्चले असतील; पण विडीचा खप कमी होऊ दिला नाही!

'निपाणीच्या तंबाखूशिवाय विडी होतच नाही हा मुद्दा आपण सध्या गौण मानू. त्याऐवजी ह्या भागातील तंबाखू खरेदी न करता हे व्यापारी-दलाल शेतकऱ्याला किती काळ तंगवू शकतील ह्यावर जास्त विचार केल्यास आपल्याला आंदोलनाच्या मर्यादा ठरवता येतील. चळवळीचं तंत्र कुठलं वापरायचं हे ठरवता येईल.'

अक्कोळच्या युवक संघाचा हा कार्यकर्ता आय. एन. बेग दिसायला लहानखुराच असला तरी त्याचं बोलणं अतिशय मुद्देसूद आणि रोखठोक. बऱ्याच जणाना बेगचं म्हणणं पटलं असावं, असं त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतं. एक मध्यमवयीन गृहस्थ मात्र जरा जागच्याजागीच चुळबुळ करत होता. कुणीच बोलत नाही, असं पाहून तो म्हणाला–

'१९७३ साली दुष्काळ पडला तेव्हापासून इथं गुजरातचा तंबाखू आला असं तुम्ही जे म्हणता ते तितकसं बरोबर नाही. १९६० साली मी स्वतः व्हाया जयसिंगपूर सांगली–गुजरातचा तंबाखू आणून, मिक्सिंग करून, त्यावर 'प्युअर अक्कोळ' असा छाप मारून जर्दा विकला आहे. १९६० सालापासून गुजरातच्या तंबाखूचं मिक्सिंग करून त्यावर निपाणीचं लेबल लावून विडी कारखानदाराना जर्दा विकण्यात येतोय घरोघरी तेव्हा असं मिक्सिंग केलं जायचं. काही वेळेला गुजरातचा 'प्युअर' तंबाखू आम्ही 'प्युअर अक्कोळ' म्हणून विकला आहे. गुजरातचा तंबाखू इथं पूर्वीपासून आणला जातो, दुष्काळाशी त्याचा काही संबंध नाही.

'एके वर्षी इथं पंचरंगी तंबाखू पिकला. पिवळं, हिरवं, राखाडी, तांबडं, काळं–दर्जा नाहीच. शेतकऱ्याला तंबाखू विकायलादेखील बरं वाटेना. त्या वर्षी सगळ्या व्यापाऱ्यानी गुजरातचा तंबाखू खरेदी केला. सांगायचा मुद्दा काय, तर निपाणीच्या तंबाखूशिवाय विडी होत नाही हे साफ चुकीचं आहे ! विडी ओढणाऱ्या गिऱ्हाइकाला काय वाटेल ते वाटो, पण आपण तंबाखू पिकविणाऱ्यांनी असला गैरसमज करून घेता कामा नये.'

बराच वेळ चाललेली चर्चा पुन्हा मूळ मुद्द्यावरच येणार अशी लक्षणं दिसत होती इतक्यात दोन-तीन तंबाखू कामगार-स्त्रिया परातीमध्ये पंचवीस-तीस कपबशा आणि ॲल्युमिनियमच्या भल्या मोठ्या किटलीत चहा घेऊन खोलीत प्रवेश करत्या झाल्या. देवचंद शेठजीच्या दुकानाभोवती, वखारीभोवती संपावर बसलेल्या अर्धपोटी कामगारस्त्रियांकडून शेतकऱ्यांचा नेता शरद जोशी आणि इतर तंबाखू शेतकऱ्याना हा चहा भेट म्हणून आला होता. संपावर बसलेल्या कामगार-स्त्रियाची शरद जोशींनी भेट घ्यावी अशी त्यांना विनंती करण्यात आली. त्यांनी ती मान्य केली. चहा पिऊन मंडळी हातपाय मोकळे करण्यासाठी बाहेर पडू लागली तेव्हा सुभाष जोशीनं सांगितलं–

' आपल्या दर्जेदार तंबाखूसाठी आंदोलन करायचं असेल तर जरूर पडल्यास आठ-नऊ महिने दम धरण्याची आपल्यात ताकद आहे की नाही हेच आपल्याला प्रथम ठरवायला पाहिजे. त्याबद्दल विचार करा म्हणजे आंदोलन करायचं की नाही ह्याबद्दल निर्णय घेता येईल. '

खोली जवळजवळ रिकामी झाली होती. गोपीनाथ धाग्गिया, बेग आणि नाईक एका कोपऱ्यात बसून कसली तरी आकडेमोड करीत होते. एस. टी. चौगुले अधून-मधून त्यांना सूचना देत होते चर्चेच्या दुसऱ्या टप्प्यात तंबाखूचा उत्पादनखर्च काढायचा होता, त्याची बहुधा ते पूर्वतयारी करीत असावेत. मी आळस झटकून उठलो आणि सिगरेट पेटवली. सुभाष जोशी शरद जोशींना सांगत होते–

'आम्ही घर–दार सोडून ह्या आंदोलनात उडी घेण्यास तयार आहोत. तंबाखू उत्पादक शेतकऱ्याच्या बरोबरीनं इकडच्या तंबाखू आणि विडी–कामगार–स्त्रियादेखील आंदोलनात उतरतील. कारण त्यांच्याही पोटाचा प्रश्न आहे. आंदोलनात शेतकऱ्याला दम धरण्यामध्ये काही आर्थिक अडचणी असतील तर कामगार संघटनेतर्फे आम्ही

त्यांच्या चुली चालवायची जबाबदारी घेतो सर्व शेतकऱ्यांनी मात्र एकजुटीनं उभं राहिलं पाहिजे ! एकमेकांची भाकरी वाटून घेण्याची त्यांनी तयारी दाखवली पाहिजे. वेळ पडल्यास शेतकरी तशी तयारी दाखवणार, कृती करणार ह्याबद्दल मला स्वत ला विश्वास आहे!

'ह्या वर्षी आंदोलनाला पूरक अशी परिस्थिती आहे. अवेळी पावसामुळे काही तंबाखू भिजला आहे, पण त्याबद्दल व्यापाऱ्यांनी अवाजवी हूल उठवली आहे. शेतकऱ्यांना ह्या वेळी दर द्यायचा नाही असाच त्यांचा कट आहे. आपल्याला आंदोलन उभं करावं लागणार अशी लक्षणं दिसत आहेत.

सुरुवातीलाच सरकारकडे आपण काहीही मागण्याची गरज नाही. आपला लढा जर यशस्वीपणे उभा राहिला तर सरकार आपोआप पुढाकार घेईल. आपण मागायची जरूर नाही. आपण तंबाखूला जो दर मागणार तो उत्पादनखर्चावर आधारित असणार, तेव्हा सरकारकडे लाचारीनं हात पसरण्यात अर्थच नाही, तशी जरूर नाही!'

शरद जोशी शांतपणे डोळे मिटून विचार करत होते. तंबाखूचं प्रकरण भलतंच विलष्ट – हा लढा वाटतो तितका सोपा नाही हे निश्चित ! कोपऱ्यातील एका खुर्चीत पाय ताणून बसत, सिगरेट फुकत मी पुढं काय घडणार त्याची वाट पाहू लागलो.

□

देवचंद शेठजीच्या वखारीसमोर धरणं धरून बसलेल्या तंबाखू कामगार-स्त्रियांनी पाठवलेला चहा पिऊन ताजेतवाने झालेले तंबाखू शेतकरी आणि कार्यकर्ते पुन्हा खोलीत जमले. तंबाखूच्या उत्पादनखर्चाविषयी चर्चा सुरू होण्याअगोदर सर्वांनी एकमुखी निर्णय जाहीर केला– आंदोलन करायचं तारीख ठरली नव्हती पण आंदोलनाचा निर्णय पक्का होता. आंदोलनाची निश्चित तारीख ठरविण्यापूर्वी शरद जोशींनी ११, १२, १३ फेब्रुवारी रोजी कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात येथील तंबाखू उत्पादक शेतकऱ्यांचा मेळावा घ्यायचा, असंही सर्वानुमते ठरलं.

तंबाखूच्या उत्पादनखर्चाबद्दलची प्राथमिक आकडेवारी गोपीनाथ धारियांनी शरद जोशींनी सादर केली. त्यातील काही मुद्द्यावर बारीकसारीक चर्चा झाल्यावर शरद जोशी म्हणाले–

'जमिनीच्या भांडवली गुंतवणुकीवरील व्याज, घसारा, व्यवस्थापन, खर्च, भांडवली खर्च, बियाणं, औषधं वगैरे मोठेमोठे खर्च आपण हिशेबात धरले. आता मी जे सांगणार आहे ते सगळेजण कृपया काळजीपूर्वक ऐका !

'समजा, आपली जमीन दहा हजार रुपये एकर किंमतीची आहे. ह्या जमिनीत आपण तीन वेळा नागरट करणार, तीन वेळा कुळवणी करणार. त्यात चांगल्या प्रतीचं, शंभर रुपयाला पाच हजार अशा प्रकारचं रोप लावणार. लागवडीला कमी पडू नये म्हणून थोड्या जास्त रोपाची तरतूद आपण करणार. दहा गाड्या शेणखत आणि बकरीच्या खताचा खर्च आपण हिशेबात धरलाय – तो जवळजवळ बाराशे रुपये इतका असेल. पिकाच्या एकूण कालामध्ये आठ फवारण्या म्हणजे तीनशेवीस रुपयाची औषधं आपण वापरणार. सल्फेट ऑफ पोटॅश दोनशे दोन पोती, युरिया एक पोतं, सुपर फॉस्फेट एक पोतं ही वरखतं आपण वापरणार. तंबाखूची शेती कोरडवाहू. त्यामुळे आपण शेणखत जास्ती आणि रासायनिक खतं कमी धरली आहेत. सहा वेळा कोळपणी किंवा पट्टी मारणं, तीन खुरपण्या अशा तऱ्हेनं शेती केल्यानंतर सर्वसाधारण वर्षामध्ये फार चांगल्या जमिनीत नव्हे, एकरी पीक किती येईल ?'

एक कार्यकर्ता पटकन म्हणाला, 'उत्तम हवामान असेल तर एकरी साडेतीनशे किलो इतका तंबाखू पिकेल; नसेल तर पावणेदोनशे-दोनशेच्या आसपास..' त्याला मध्येच थांबवत महमद नाईक काहीसं उसळून म्हणाले, 'अहो, तुम्ही जर इतकी शेणखतं, रासायनिक खतं, औषधं वगैरेसाठी एकरी साडेतीन हजार रुपये खर्च केला असेल तर तुम्हाला सहाशे किलो तरी तंबाखू आला पाहिजे!' कार्यकर्ता कुरकुरत म्हणाला, 'अहो, पण हे कोरडवाहू पीक आहे. पाण्याची सोय नसेल तर एकरी सहाशे किलो तंबाखू कधीच पिकणार नाही!'

दुसरा एक कार्यकर्ता चिडून म्हणाला– 'मग दरवर्षी तंबाखू कशाला झक मारायला लावता ?' तिसऱ्याच कुणी तरी शांतपणे उत्तर दिलं – 'तंबाखूत नुकसान कमी– ज्वारीपेक्षा कमी नुकसान म्हणून तंबाखूच लावतो.' शरद जोशींनी प्रश्न केला– 'आजपर्यंत एकरी 'रेकॉर्ड', अगदी जास्तीत जास्त असं अपवादात्मक पीक किती निघालंय ?' बेग म्हणाला– 'बाराशे किलो ! पण आपण जी कोरडवाहू दहा हजार रुपये किमतीची जमीन धरली त्यात अगदी ताग पेरून, शेणखतं घालून, बकऱ्या बसवून, रासायनिक खतं आणि औषधं वापरून तीन-साडेतीनशे किलोपेक्षा जास्त तंबाखू पिकणं अशक्य!'–

शरद जोशी म्हणाले– 'माझ्याकडे जी अधिकृत आकडेवारी भाई धारियांनी दिली आहे त्यावरून कर्नाटकात एकरी २३० ते २३७ किलो सरासरी तंबाखूचं उत्पादन निघतं; पण आपण जर खताचा औषधाचा, खुरपणीचा, कोळपणीचा खर्च धरणार असू तर दहा हजार रुपये किमतीच्या जमिनीतून एकरी सरासरी तीनशेवीस किलो उत्पादन का धरू नये ?'

ह्या मुद्द्यावर बरीच जोरदार चर्चा झाली. कुणाचं म्हणणं तीनशे पेक्षा कमी, तर काहींचं म्हणणं कमीत कमी साडेतीनशे तरी उत्पादन निघणारच ! मंडळींच्यात सरासरी उत्पादनाबद्दल एकमत होईना, तेव्हा शरद जोशी गंभीर चेहऱ्यानं म्हणाले,

'मी तीनशेवीस हा आकडा का धरला ते सांगतो. दोनशेचाळीस ही जर सरासरी धरली आणि संख्याशास्त्रामध्ये ती 'नॉर्मल पॉप्युलेशन' आहे असं जर धरलं, तर 'स्टॅंडर्ड डेव्हिएशन' किंवा 'थ्री स्टॅन्डर्ड डेव्हिएशन' हे 'पॉप्युलेशन' च्या 'वन्थर्ड' असत ! त्याप्रमाणे 'नाइंटीफाइव्ह परसेंट पॉप्युलेशन' आहे तेव्हा ही 'स्टॅन्डर्ड डेव्हिएशन लिमिट्' मध्ये येते असं धरून मी तीनशेवीस धरावं असं म्हणतो.'

खोलीतील मंडळी एकमेकांच्या नजरा चुकवत 'बरोबर–अगदी बरोबर !' असं पुटपुटत होती. भाई धारिया तांब्या तोंडाला लावून घटाघटा पाणी पीत होते. मला चार मिनारच्या धुराचा वाईट ठसका लागला होता. बायको कोपऱ्यात उभी राहून फोटो काढण्यात गुग. शरद जोशी पुढं सांगत होते–

'मी तीनशेवीस हा आकडा कसा काढला त्याला संख्याशास्त्राचा आधार आहे. आपण मात्र गृहीत धरून चालणार नाही की ही 'नॉर्मल पॉप्युलेशन' आहे ! –म्हणून मी तुम्हाला विचारतो की एकरी तीनशेवीस किलो तंबाखू हा आकडा तुम्हाला कसा वाटतो ?'

सगळेजण एकदम म्हणाले 'हो–हो–तीनशेवीस हा आकडा बरोबर वाटतो;' पण गनी पटेल मात्र कुरकुरले–'आकडा बरोबर वाटत नाही.' शरद जोशींनी हसत त्याना विचारलं–'मग तीनशेपन्नास धरायचा का ?'

'नको–नको, तीनशेपन्नास जास्त आहे'–जमलेली मंडळी अस्वस्थपणे एकमुखी बोलली एक शेतकरी मात्र उसळून म्हणाला–'अहो, दहा हजार रुपयाच्या जमिनीत इतकी खतं, औषधं घालून व्यवस्थित काळजीपूर्वक खुरपणी, कोळपणी करून जर साडेतीनशे किलो तंबाखू चांगल्या हवामानात काढता आली नाही तर शेती करायची कशाला ?'

शरद जोशी एका कागदावर आकडेमोड करीत होते. सुभाष जोशी गुडघ्याला मिठी मारून थंड. नाईक, बेग, चौगुले काहीसे अस्वस्थ. भाई धारियाचं घटाघटा पाणी पिणं चालूच. पाणी पिताना इतरांशी खाणाखुणा करून धारियाचा जोरदार संवाद इतर मंडळी श्वास रोखून. शरद जोशीचं गणित संपलं तेव्हा ते म्हणाले–

' एक किलो तंबाखूला अकरा रुपये चाळीस पैसे इतका उत्पादन-खर्च येतो. ह्यामध्ये आपल्याला साडेबारा टक्के नफा धरण्याचा अधिकार आहे–म्हणजे चार हजार एकशेचाळीस रुपये आपल्याला धरता येतात ह्यात काही आश्चर्य वाटून घेण्याचं कारण नाही. या देशामध्ये शेतकऱ्याला त्याच्या कोणत्याही पिकाला खऱ्या उत्पादन-खर्चापेक्षा निम्मी रक्कमदेखील कधी मिळत नाही. उसाचा उत्पादन-खर्च आम्ही दोनशेअठ्ठयाऐंशी रुपये दहा पैसे काढला. त्याअगोदर महाराष्ट्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्याला गेल्या वर्षीपर्यंत सरासरी एकशेचाळीस रुपये टन भाव मिळत असे. महाराष्ट्रात साखर–साम्राज्ये निर्माण झाली; पण शेतकऱ्याला निम्मा भाव मिळत गेला !

'मुईमुगाच्या पाढऱ्या उपटया जातीला तीन महिन्यांचा उत्पादन खर्च चार रुपये तीस पैसे इतका येतो शेतकऱ्याला मात्र दोन रुपये पन्नास पैशाच्यावर कधीही भाव मिळाला नाही. इतर शेतमालाची जी स्थिती तीच तुमच्या तंबाखूची; मूळ उत्पादन खर्चापेक्षा निम्मी रक्कमच आजपर्यंत तुमच्या पदरात पडत राहिली.

तबाखूचा उत्पादनखर्च काढताना मी जमिनीची किंमत दहा हजार रुपये धरली. हे पैसे आपण बँकेत ठेवले असते तर आपल्याला वर्षाला हजार रुपये व्याज मिळालं असतं. तो खर्च मी सर्वप्रथम धरला आहे. जमिनीची बांधबदिस्ती, खारावलेल्या जमिनीची सुधारणा वगैरे जे खर्च येतात ते आपण कधीच हिशेबात धरत नाही. जेव्हा हे खर्च करण्याची वेळ येते तेव्हा आपण बँकेकडून कर्ज काढतो आणि ते कधी तरी फेडता येईल अशी अपेक्षा करतो; पण हे कर्ज कधीच फिटत नाही. ह्याचं कारण आपण उत्पादन-खर्चात जमिनीच्या किंमतीवरील व्याज धरत नाही.

'तंबाखूचा उत्पादनखर्च काढताना मी मजुरी फक्त पाच रुपये धरली आहे आणि शेतकऱ्याला एकरी चारशेसाठ रुपये फायदा धरलाय. त्याची घरची माणसं जी काम करतात आणि त्याचे जे पैसे वाचतात आणि हाती येतात तोच शेतकऱ्याचा नफा !

'आपण जो भाव मागतोय तो जर मिळाला आणि शेतकऱ्यांनी हा नफा इकडे तिकडे खर्च करून उधळला नाही तर त्याची भाडवली खर्चाची काम त्यातून पार पडतील, त्याला शेतीची नवीन अवजारं घेता येतील, बैल घेता येतील, घरच्या माणसाचे खर्च भागवता येतील, अर्थात हे सर्व एक एकर शेतीमधून होईल अशी कुणाचीच अपेक्षा नाही. तेव्हा हे सगळे घटक लक्षात घेऊन आपण जो उत्पादनखर्च काढला तो किलोमागे अकरा रुपये चाळीस पैसे आणि साडेबारा टक्के नफा धरून तेरा रुपये इतका येतो. म्हणजेच आपण प्रतवारीनं जो दहा, बारा आणि पंधरा असा दर मागतोय तो योग्य आहे असाच त्याचा अर्थ निघतो.

उत्पादक खर्चाबद्दलची चर्चा आवरत आली तेव्हा भाई धारिया म्हणाले–'अहो, ही किंमत मागताना आम्हाला उगाचच अवघडल्या–सारखं वाटतं–आणि समजा, आम्ही मागितली तरी देणार कोण ?' त्याच्याकडे आरपार पहात शरद जोशी म्हणाले, ' अशी लाज बाळगलीत तर शेतकरी कधीच वर येणार नाही. आम्ही जेव्हा उसाला तीनशे रुपये भाव मागितला तेव्हा सगळे हसले. हे भलतेच काही तरी मागून राहिलेत असंच सगळ्याना वाटलं. आज तीच मडळी तीनशे रुपये भाव मोजून घेताहेत !

बैठक संपली. जाताजाता भाई धारिया म्हणाले, 'आम्ही जो किंमत किंवा भाव मागतोय ती आधारभूत किंमत–सपोर्ट प्राइस् मागतोय ! एकाधिकार खरेदीची किंमत !' त्याना इशारा देत शरद जोशी म्हणाले–' भाईसाहेब, एकाधिकार खरेदीविषयी भलतीच *गुलाबी स्वप्न उराशी बाळगू नका–त्यात फारसा अर्थ असत* नाही !'

¤

१ फेब्रुवारी १९८१. निपाणीमधील नेहरू चौक गच्च भरला होता. व्यासपीठासमोर आठ-दहा हजार तंबाखू आणि विडी कामगार-स्त्रिया, त्याच्यामागे दोन-तीन हजार शेतकरी. दुतर्फा जागा मिळेल तिथे निपाणीमधील नागरिक. मंत्रमुग्ध झालेल्या सभेला शरद जोशी सांगत होते–

'शेतकरी आंदोलनाचं किंवा तुमच्या येथील तबाखू उत्पादक शेतकऱ्याचं नेतृत्व करावं असा माझा अट्टाहास मुळीच नाही. माझंच नेतृत्व शेतकऱ्यानं मानावं असा आग्रह तर अजिबात नाही. ह्याउलट मी तुम्हाला असं सागू इच्छितो की, कुणी जर अशा प्रकारे नेतृत्व करतो म्हणू लागला तर सर्वप्रथम त्याला नीट तपासून खात्री पटल्यावरच त्याच्यावर विश्वास ठेवा!

' आजपर्यंत वर्षानुवर्षं ह्याच गावात, ह्याच ठिकाणी निवडणुकाच्या अनेक सभा झाल्या असणार. नेते-मंडळींनी येऊन अनेक आश्वासनं दिली असणार. आपण त्याची आश्वासनं ऐकून निश्वासानं तेव्हा त्यांच्या खाद्यावरती मान टाकली; पण ह्या सगळ्या पुढाऱ्यानी विश्वासघात करून आपली मान अत्यंत सफाईनं कापली. त्यामुळं ह्यापुढं कोणताही नेता, कोणताही पुढारी–मग तो कोणत्याही पक्षाचा असो, जेव्हा इथं येईल आणि तुमच्यासमोर उभा राहून आश्वासनं देऊ लागेल, शेतकऱ्यांचं मी भल करणार आहे, माझ्या पक्षाचं तसं धोरण आहे वगैरे सागू लागेल–त्यामध्ये मीसुद्धा आलो, तर त्याला शेतकऱ्यानी सागितलं पाहिजे की, असल्या भूलथापा ऐकून आम्ही पुरेपूर पोळलो आहोत. अनेकांनी आम्हाला असंच फसवलं आहे त्यामुळं आता विश्वास ठेवण्याअगोदर आम्ही दहा

देहा वेळा तुमची परीक्षा घेणार आहोत. जो विचार आमच्यापुढं माडला जाईल तो तपासून घेणार आहोत आणि त्यानंतरच विश्वास ठेवायचा की नाही हे ठरवणार आहोत !

'मी सध्या तुमच्याकडं गोष्ट मागणार आहे. तुम्ही निवडणुकीच्या प्रचाराची भाषणं जशी ऐकता तसं हे भाषण ऐकू नका! मी जे सांगणार आहे ते शातपणे ऐका, त्यानंर विचार करा आणि मगच आपल्याला पुढं काय करायचं आहे ह्याचा निर्णय आपणा सर्वांना मिळून घेता येईल. आजची ही सभा नेहमीच्या राजकीय पक्षाच्या सभेपेक्षा वेगळी आहे; पण त्याचबरोबर शेतकरी मेळावा म्हणजे काही तरी भयानक प्रकार घडतो आहे ही कल्पनादेखील डोक्यातून पूर्णपणे काढून टाका !

'मी कुठही जाणार आहे आणि शेतकऱ्याना एकत्र करणार आहे असं समजलं की लगेच पोलीस-खात्याची मंडळी येऊन कार्यकर्त्यांना विचारू लागतात-जोशी केव्हा येणार? त्याचा कार्यक्रम काय? आतासुद्धा ह्या सभेच्या ठिकाणी आजुबाजूला पाच-पन्नास पोलीस उभे आहेत. सीआयडीची माणसं फिरताहेत. वायरलेस जीप उभी आहे. ह्या सर्वांमुळे शेतकऱ्याच्या मनामध्ये भीती निर्माण होण्याची शक्यता आहे. शेतकरी संघटनेची ही माणसं काही तरी भयानक कृत्य करणारी असावीत, असा काही शेतकऱ्यांचा समज होण्याची त्यामुळं शक्यता आहे. मी इथं एक गोष्ट अगदी स्पष्ट करू इच्छितो की, शेतकरी मेळाव्यामध्ये असं भयानक वाटण्यासारखं काहीही नाही !

'या देशामधला प्रत्येक धंदा किंवा व्यवसाय करणारी मंडळी अनेक वेळा एकत्र येतात. आपला धंदा कशा तऱ्हेनं व्यवस्थित चालवता येईल ह्याचा विचार करतात. आपल्या धंद्यामध्ये काय अडचणी आहेत किंवा येणार आहेत ह्याचा विचार करतात. त्या अडचणी सोडविण्याकरिता काय केलं पाहिजे ते एकत्रितपणे ठरवतात. आपल्या धंद्यातील नफा जास्तीत जास्त कसा वाढेल हे सगळेजण एकत्रितपणे ठरवतात. आपल्या देशातील सगळ्या व्यापाऱ्यांची आणि कारखानदारांची एक मोठी संघटना आहे. दरवर्षी त्या संघटनेचं अध्यक्षपद स्वतः पंतप्रधान भूषवितात. व्यापाऱ्यांच्या आणि कारखानदारांच्या संघटनेचं अधिवेशन दरवर्षी दिल्ली किंवा दुसऱ्या एखाद्या मोठ्या शहरात मोठ्या थाटामाटात भरतं. अशा अधिवेशनाचं अध्यक्षपद स्वतः पंतप्रधानांनी भूषवावे अशी कित्येक वर्षांची प्रथा आहेच.

'म्हणजेच व्यापारी आणि कारखानदार ह्यांनी एकत्र येऊन आपल्या व्यवसायातील नफ्या-तोट्याचा विचार करायचं ठरवलं तर त्यासाठी स्वतः पंतप्रधान हजर असतात, पण शेतकरी मंडळी जर एकत्र येऊन आपल्या धंद्यामध्ये काय अडचणी आहेत, त्या कशा दूर केल्या पाहिजेत, नफा कसा मिळवला पाहिजे ह्याचा विचार करू लागली तर त्यासाठी लाठ्या घेतलेले पोलीस पाठवले जातात ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. हे असं का घडतं ह्याचं कारण आपण समजून घेतलं पाहिजे.

'आपण आज इथं जी सर्व शेतकरी मंडळी जमलो आहोत ती कशासाठी? वर्षानुवर्षं शेतीचा अनुभव घेतल्यानंतर, दरवर्षी दर पिकात बुडत गल्यानंतर आता करायचं तरी काय, ह्या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी आपण इथं जमलो आहोत. इथून पुढं जगणंदेखील अशक्य झालं आहे अशा निकराच्या परिस्थितीला येऊन ठेपल्यानंतर आज इथं एकत्र जमलो आहोत !

'मी जेव्हा शेती ह्या विषयाचा अभ्यास सुरू केला तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की, ह्या देशातील दारिद्र्य दूर करायचं असेल तर सर्वप्रथम शेतकऱ्याचं दारिद्र्य दूर झालं पाहिजे ! ह्या देशातील दारिद्र्य म्हणजेच शेतकऱ्याचं दारिद्र्य, हा एक साधा विचार मला सुचला.

'शेतकऱ्याचं हे दारिद्र्य येतं कुठून? हा शेतकरी दरिद्री का?–मी एक सोपं उदाहरण देतो. समजा, तुमच्या गावात एक वाणी आहे. दर महिन्याला तो हजार रुपयांचा माल बाहेरून विकत आणतो आणि दर महिन्याला तोच माल पाचशे रुपयाला गिऱ्हाईकाला विकून टाकतो हजाराचा माल आणून पाचशेला विकतो. अशा रीतीनं त्यानं धंदा केला तर काही महिन्यातच त्याचं दिवाळं निघणार हे उघड आहे. हा वाणी दर महिन्याला जास्त जास्त दरिद्री होत जाणार. अशा वाण्याला आपण वेडा म्हणू !'

'–त्याला वेडा म्हणणं सोपं आहे; पण आपण सगळे शेतकरी त्या वाण्यापेक्षा शंभर पटीनी जास्त मूर्ख आहोत ! हजाराचे पाचशे करण्याचा असा वेड्यासारखा धंदा आपण आज कित्येक वर्षं मुकाट्यानं करतो आहोत–आणि म्हणूनच आपण सगळे असे गरिबीनं गांजलेले, दारिद्र्यानं पिचलेले आणि कर्जबाजारी झालो आहोत !

'काल दुपारी मी तुमच्या भागातील कार्यकर्त्यांशी चर्चा करून तंबाखूचा हिशेब काढत होतो. आपण एक एकर तंबाखू करायचा ठरवला तर त्यातून उत्पादन किती होतं? त्याला खर्च किती येतो? उत्पन्न किती मिळतं? ह्या सगळ्याचा मी अभ्यास केला. एक किलो तंबाखू पिकविण्यासाठी शेतकऱ्याला काय खर्च येतो ह्याचं मी गणित मांडलं तेव्हा उत्तर आलं की, एका किलोला अकरा रुपये पंचवीस पैसे खर्च येतो. तुम्ही म्हणाल हा आकडा जास्त आहे ! काल जे कार्यकर्ते माझ्याबरोबर उत्पादनखर्च काढण्यासाठी झटले त्यानादेखील प्रथम हा आकडा जास्त वाटला; पण नंतर त्याची खात्री पटली की हा आकडा जास्त नसून उलट कमीच आहे !

'आम्ही महाराष्ट्रात जेव्हा उसासाठी तीनशे रुपये टन भाव मागायला सुरुवात केली तेव्हा अनेकजण म्हणू लागले की, आम्ही काही तरी भयंकर मागतो आहोत. वेगवेगळ्या पक्षांची जी मंडळी नंतर हातामध्ये झेंडे घेऊन उसाला तीनशे रुपये भाव मिळालाच पाहिजे, अशा घोषणा देत फिरू लागली तीच सुरुवातीला हा भाव जास्त आहे म्हणून ओरड करीत होती !

'हा अनुभव एकदा घेतला असल्यामुळं मी आज तुम्हाला सांगितलं की, तंबाखूचा उत्पादनखर्च किलोमागं अकरा रुपये चाळीस पैसे आहे तर प्रथम तुमचा विश्वास बसणार नाही, ह्याची मला पूर्ण कल्पना आहे. मी तुम्हाला एक प्रश्न विचारू इच्छितो–एक किलो तंबाखू पिकविण्यासाठी काय खर्च येतो ह्याची तुम्हाला कल्पना आहे का?

'१९७८ साली चाकणच्या बाजारात कांद्याचा भाव फक्त अठरा रुपये क्विंटल होता. म्हणजे अठरा पैसे किलो. माझ्या हिशेबानं त्या वर्षी कांद्याला कमीत कमी पंचेचाळीस पैसे किलो हा दर मिळणं

आवश्यक होतं. मी चाकणच्या एका शेतकऱ्याला तेव्हा विचारलं की इतका कमी दर तुला परवडतो तरी कसा ? तो म्हणाला, दर चांगला आहे, मी जो खर्च केलायं तो बराचसा भागतोय, पण यंदा माझा बैल मेल्यामुळे मला जरा अडचण येणार आहे !

'आता या शेतकऱ्याच्या हिशेबामध्ये कांदा पिकवायचा खर्च काय असेल ?– फक्त नगदी खर्च ! जिथं रोख पैसे मोजावे लागतात म्हणजे बियाणं, मजुरी वगैरे खर्चच तेव्हढा त्यानं ध्यानात घेतला पण बैलाचं काय ? बैल घरचाच आहे, घरचीच वैरण खातो, बांधावरचं गवत खातो–त्याचा कसला खर्च धरायचा ! कांदा पिकवला नाही तरी बैल गोठ्यात रहाणारच आहे, वैरण गवत-खाणारच आहे, तेव्हा त्याचा खर्च कांद्याच्या हिशेबात कशाला धरायचा !

'–पण यंदा बैल मेला. हा बैल काही कायमचा जगणार नव्हता-अमर पट्टाही घेऊन तो आला नव्हता. कधी तरी आठ-दहा वर्षांत तो मरणार होताच ! हा बैल विकत घ्यायचा खर्च सोळाशे रुपये असला आणि तो आठ वर्षे काम करणार असला तर दरवर्षी त्याचा कमीत कमी दोनशे रुपये खर्च हिशेबात धरायलाच हवा. एका वर्षाच्या पिकामध्ये त्याचे दोनशे रुपये भरुन निघायलाच पाहिजेत तरच शेतकरी अडचणीत येणार नाही. नाहीतर दरवर्षी वाटेल की आपल्या शेतमालाला बरी म्हणजे नगदी खर्च भरून निघणारी किंमत मिळाली, पण जेव्हा बैल मरेल तेव्हा जमीनीचा तुकडा गहाण ठेवून त्याला दुसरा विकत घेण्याची पाळी येईल.

'त्याचप्रमाणे घरच्या माणसाची मजुरी ! आपल्याला वाटतं ही तर घरचीच माणसं. त्याची मजुरी कशाला धरायची ? बायकोला, मुलीला, सुनेला, दोन वेळ भाकरी दिली, वर्षातून एखादं लुगडं दिलं की पुरे झालं. त्याची मजुरी हिशेबात कशाला धरायची ? –पण जेव्हा मुलीच्या लग्नाची वेळ येते, दोन-तीन हजार रुपये खर्च करण्यासाठी सावकाराचे पाय धरावे लागतात, ते कशासाठी? त्याचं कारण काय ?–ह्याचं कारण इतकचं की, ह्या खर्चाचा हिशेब आपण तंबाखूच्या पिकामध्ये धरला नाही. म्हणजेच घरची मजुरी धरली नाही.

'तुमच्या जमिनीची काही किंमत असते. एकरी दहा हजार रुपयाची जमीन आहे असं समजा. आज त्या जमिनीमध्ये तुम्ही पीक काढता. त्या जमिनीची धूप होतें. दर दोन-चार वर्षांनी बांधबंदस्ती करावी लागते, दगड-गोटे वेचून घ्यावे लागतात. पाण्यासाठी पाट किंवा चर काढावे लागतात. ह्या सगळ्याचा खर्च जो माल तुम्ही त्या जमिनीतून काढता त्यामधून भागला पाहिजे. त्यासाठी जमिनीच्या किंमतीवरील दहा टक्के व्याज तुम्ही उत्पादन-खर्चाच्या हिशेबात धरलं पाहिजे.

'शेतावरती एखादा गोठा असेल, झोपडीवजा घर असेल, औत-अवजारं असतील; हे सर्व कायम टिकणारं नाही. त्यांच्या दुरुस्तीचा-काही नव्यानं खरेदी कराव्या लागणाऱ्या अवजारांचा, ह्या सर्व गोष्टीचा खर्च शेतमालाच्या किंमतीत धरायला पाहिजे. तसा तो धरला नाही तर जरूर भासेल तेव्हा हे भांडवल आणायचं कुठून ?

'अशा शास्त्रीय पद्धतीनं काढलेल्या खर्चाइतकी किंमत तुमच्या शेतमालाला मिळाली नाही तर त्याचा अर्थ तुमचा शेतीचा धंदा तोट्यात चालू आहे–आणि नेमकं हेच पिढ्यानुपिढ्या चालू आहे. ह्याचा थोडक्यात अर्थ असा–शेतकऱ्याचं दारिद्र्य वाढत आहे ह्याला कारण त्याचा सर्व उत्पादनखर्च भरून निघेल अशी किंमत त्याला आजपर्यन्त मिळाली नाही.

'आता तुम्ही विचारणार की, हे असं का ? त्याची जी वेगवेगळी कारणं आहेत ती मी तुम्हाला समजावून सांगतो. पहिलं कारण म्हणजे शेतकरी ज्याला अस्मानी संकट म्हणतो ते ! पाऊस !! एखाद्या वर्षी पडला तर बदाबदा पडतच रहातो. एखाद्या वर्षी रुसला तर तोंडच दाखवत नाही. पाहिजे तेव्हा पडत नाही. नको तेव्हा पडतो अधूनमधून एखाद्याच वर्षी व्यवस्थित पडतो. पावसाच्या अनिश्चितपणामुळे आपलं बरचसं पीक नेहमी बुडतं. त्यामुळे आपला उत्पादनखर्च वाढतो, पण ह्या सर्वांपेक्षा दुसरी अतिशय गंभीर गोष्ट म्हणजे हा जो काही पाऊस पडतो तो सगळ्या देशात ठराविक तीन–चार महिन्यातच पडतो. त्यामुळं सगळ्या कोरडवाहू शेतकऱ्यांचा माल एकाच वेळी पिकतो आणि एकाच वेळी बाजारात येतो आणि त्यामुळं शेतमालाचे भाव घसरतात. अस्मानी संकटाचं स्वरूप हे असं आहे.

'–पण शेतकऱ्याना ज्या खऱ्या संकटाशी सामना करायचा आहे ते अस्मानी नसून सुलतानी आहे. हे सरकारनं निर्माण केलेलं संकट आहे. शेतकऱ्याच्या शेतमालाला त्याचा उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव मिळू नये, हे ह्या देशातील सर्व राजकीय पक्षांचं अधिकृत धोरण आहे. शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव मिळू नये अशी जाणून-बुजून व्यवस्था करण्यात आली आहे.

'सर्व राजकीय पक्षाचं हे अधिकृत धोरण गुप्त वगैरे ठेवलेलं नाही; हे धोरण सरकारी अहवालामध्ये, सरकारी पुस्तकामध्ये, पांढऱ्यावर काळ्या अक्षरात स्पष्टपणे छापलेलं आहे. त्यापैकी एकाच अहवालाचं उदाहरण मी देतो–

'–१९७१ सालचा, चौथी पंचवार्षिक योजना तयार होत असतानाचा एक अहवाल आहे. शेतमालाच्या किंमती कशा रीतीने ठरवाव्यात ह्याविषयी तज्ज्ञांची एक समिती सरकारनं तेव्हा नेमली होती. त्या समितीच्या अहवालातील वाक्याचा मराठीत थोडक्यात अर्थ असा–

'–शेतकऱ्याच्या शेतमालाचा सगळा उत्पादनखर्च भरून निघेल अशी किंमत त्याला देणे व्यवहार्य नाही. जर सगळा उत्पादनखर्च भरून द्यायचा झाला तर शेतकऱ्याच्या घरची मंडळी जी शेतावर काम करतात त्याचा निदान रोजच्या मजुरीच्या हिशेबात खर्च धरावा लागेल. हा खर्च जर धरला तर शेतमाल महाग होईल. कारखानदाराना त्यांच्या कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल महाग विकत घ्यावा लागेल. अन्नधान्याच्या किंमती वाढल्या तर कारखानदारांना त्यांच्या कामगारांचा पगार वाढवून द्यावा लागेल. ह्या सगळ्याचा परिणाम म्हणून कारखानदाराना आंतरराष्ट्रीय

## पिढ्यानुपिढ्या शेतीचा धंदा तोट्यातच चालू आहे !

बाजारपेठेत आपला तयार माल विकून स्पर्धा करता येणार नाही. पुरेसा नफा काढता येणार नाही.

'–थोडक्यात काय, तर कारखानदारांना कच्चा माल स्वस्त मिळावा, कामगारांचा पगार वाढवावा लागू नये आणि तयार माल विकून जास्तीत जास्त नफा काढता यावा म्हणून शेतकऱ्यांनी आणि त्याच्या सहा वर्षाच्या मुलापासून सत्तर वर्षाच्या म्हातारीपर्यंत सर्वांनी फुकट राबायचं आहे. ह्याचाच अर्थ, शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाचा सर्व उत्पादनखर्च भरून निघेल अशी किंमत देणं अव्यवहार्य आहे, असं सर्व पक्षांच्या सर्व सरकारांनी आतापर्यंत अमलात आणलेलं अधिकृत धोरण !

'आजपर्यंत आपली अशी समजूत करून देण्यात आली आहे की, आपल्या शेतमालाला भाव मिळत नाही, आपलं दारिद्र्य दूर होत नाही हा सर्वस्वी आपल्या नशिबाचा दोष आहे. ही कल्पना डोक्यातून साफ काढून टाका. इथं नशिबाचा काहीही संबंध नाही. आपल्या शेतमालाला भाव मिळू नये, आपण असंच दरिद्री असावं आणि सतत लाचारीनं शासनकर्त्यांच्या धर्मादायावर जगावं असा पद्धतशीर कट आपल्याविरुद्ध करण्यात आला आहे.'

शरद जोशींचा शब्दन्‌शब्द श्रोते मनात साठवत होते. असे विचार, अशा प्रकारचं भाषण ते प्रथमच अनुभवत असावेत. शरद जोशींनी जेव्हा लेव्ही म्हणजे लूट आणि मुबलकता म्हणजे लिलाव, हे सरकारी दुटप्पी धोरण स्पष्ट करून महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यात तयार होणाऱ्या 'पक्क्या' मालाबद्दल, म्हणजेच साखरेबद्दल, सरकारनं कायदा करून लादलेला '–गाईचं तोंड शेतकऱ्याकडं, कास मात्र सरकारकडं' हा प्रकार वर्णन करून सांगितला तेव्हा निपाणीच्या नेहरू चौकात जमलेल्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यांवर सखेद आश्चर्य आणि घृणा असे संमिश्र भाव उमटले. सरकार आपल्याला लुबाडतंय ह्याबद्दल फारशी चीड मात्र कुणाच्याच चेहऱ्यावर दिसत नव्हती. सरकार म्हणजे माय-बाप, त्याबद्दल चीड कशी काय व्यक्त करायची ? आपण तर माय-बाप सरकारचे गुलाम ! आपण स्वतंत्र आहोत हेच अजून शेतकऱ्याला कळलं नाही–म्हणूनच त्याच्या चेहऱ्यावर चीड किंवा क्रोध ह्या भावनांचं दर्शन घडत नसावं ! भान हरवून ऐकणाऱ्या श्रोत्यांना शरद जोशी सांगत होते–

'काही आठवड्यांपूर्वी ऊस आणि कांद्याच्या आंदोलनाबाबत वाटाघाटी करायला मी दिल्लीला गेलो होतो. तिथं आपल्या अन्नमंत्र्यांनी, राव वीरेंद्रसिंग ह्यांनी त्यांच्या सरकारी हिशेबातील एक चूक कबूल केली. उसाच्या वाहतुकीच्या खर्चापैकी टनामागं तेवीस रुपये धरायचे त्यांच्या हिशेबात अनेक वर्षे राहूनच गेले होते. अन्नमंत्री म्हणतात, नजरचूक झाली. आम्ही हा खर्च हिशेबात धरायचं विसरूनच गेलो ! ह्या चुकीचा जर हिशेब काढला तर फक्त महाराष्ट्रातील ऊसकरी शेतकऱ्याचं दरवर्षी किमान चाळीस कोटी रुपये बुडाले किंवा सरकारनं लाटले ! म्हणजे आजपर्यंत सरकारनं सहाशे कोटी रुपये बुडविले आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुलेसाहेब ह्या वर्षी शेतकऱ्यांची एकूणपन्नास कोटी रुपयांची कर्जे माफ केल्याबद्दल फुशारकी मारत हिंडतात !–ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे.

'शेतकऱ्याला त्याच्या शेतमालाला जर योग्य भाव मिळाला तर त्याला कुणाच्याही धर्मादायाची किंवा कर्जमाफीची गरज नाही.


'काल निपाणीजवळच्या एका खेड्यात गेलो होतो. तिकडचे शेतकरी सांगू लागले की, तलाठी आम्हाला फार त्रास देतोय. इथं जमलेल्या शेतकऱ्यांचा अनुभवदेखील तसाच असेल. काहीही काम असलं तरी तलाठ्याला त्याचा ठरलेला मलिदा चारल्याखेरीज ते होत नाही, ही गोष्ट काही फक्त तुमच्या परिसरातच आहे असं नाही. सर्वत्र असाच प्रकार आहे सबंध देशामध्ये एकही प्रामाणिक तलाठी अस्तित्वात नाही.

'ज्या तलाठ्यास तो प्रामाणिक असल्याबद्दल एखादं गाव प्रशस्तीपत्रक देईल त्यास एक हजारएक रुपयांचं इनाम महाराष्ट्रामधील एका कार्यकर्त्यानं जाहीर केलं होतं. हे इनाम जाहीर होऊन तीन वर्षं झाली तरी एकही तलाठी पुढं आला नाही. ह्यावरूनच काय ते समजून घ्यायचं !

'दीड दमडीचा कारकून असलेला हा तलाठी शेतकरीराजाला वाकवू शकतो ह्याचं कारण काय ? ह्याचं कारण शेतकरीराजा भिकारी झाला आहे. त्याच्या शेतमालाला, त्याच्या तंबाखूला जर भाव मिळाला, शेतकऱ्याच्या हाती पैसा आला, तर महसूल खात्याचा हा कारकून त्याला उठून उभं राहून रामराम घालील.

'–आपण जो लढा द्यायचा आहे तो एका महत्त्वाच्या मुद्द्यासाठी.


# तिसरी आवृत्ती



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

हे तलाठी, मामलेदार, तहसीलदार, प्रांत आणि कलेक्टर असल्या लहानसहान अधिकाऱ्यांशी भांडण्यात आपण वेळ घालवायचा नाही आपल्या शेतमालाला उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव मिळाला पाहिजे म्हणून आपण सत्याग्रह करायचा आहे. एकदा आपल्या शेतमालाला भाव मिळाला की, हे सर्व चित्र पालटणार आहे.

'हे चित्र खरोखरीच पालटावं अशी शेतकऱ्याची जर इच्छा असेल तर त्यानं आपल्या शेतमालाला भाव मिळवून घेण्यासाठी शेतकरी संघटनेच्या 'एक कलमी' कार्यक्रमाची अंमलबजावणी करणं आवश्यक आहे. त्यासाठी एकजूट करणं आवश्यक आहे.

'तुम्ही कुठल्याही पक्षाचे असा, तुमच्या पक्षाचा कार्यक्रम पाच कलमी, वीस कलमी किंवा चाळीस कलमी असो, तुमच्या पक्षासाठी तुम्ही अवश्य त्या कलमांची जाहिरातबाजी करा; पण शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव मिळावा ह्या शेतकरी संघटनेच्या लढयाच्या वेळी आपआपल्या पक्षाची कलमं कृपया बाजूला ठेवा आणि फक्त 'एक कलमी' कार्यक्रम हाती घ्या. लढा यशस्वी झाला की, पुन्हा तुम्ही आपआपल्या पक्षाचे अनेक कलमी कार्यक्रम राबविण्यास मोकळे !

'ह्या मुद्दा महत्त्वाचा आहे आणि तो कृपया नीट समजावून घ्या. कुठल्याही एका राजकीय पक्षाशी आमचं भांडण नाही. निवडणुकांशी शेतकरी संघटनेचा काहीही संबंध नाही. शेतकरी संघटनेची एकच मंगल महत्त्वाकांक्षा आहे—ह्या देशातील दारिद्र्य नाहीसं करावं ! आमदारकी, खासदारकी, मंत्रिपद असल्या गलिच्छ महत्त्वाकांक्षा शेतकरी संघटनेच्या विचारातसुद्धा बसत नाहीत

'ह्या देशातील दारिद्र्य म्हणजेच शेतकऱ्याचं दारिद्र्य आणि त्याच्या शेतमालाला भाव मिळत नाही म्हणून हे दारिद्र्य जन्मास आलं आणि दिवसागणिक वाढत आहे, हे मी तुम्हाला सुरुवातीलाच सांगितलं. त्याचबरोबर शेतमालाला भाव मिळू नये असंच सर्व राजकीय पक्षाचं धोरण आहे, हा दुसरा महत्त्वाचा मुद्दा मी तुम्हाला स्पष्ट करून सांगितला—मग हा प्रश्न सोडविण्यासाठी काय केलं पाहिजे ?

'ज्या पद्धतीचे अन्यायकारक रिवाज आणि मूठभर व्यापारी-दलालांची मक्तेदारी निपाणी परिसरातील हजारो शेतकरी गेल्या कित्येक पिढया सहन करीत आहेत त्याचं कारण हे सर्व शेतकरी ह्या मूठभर दलालांचे गुलाम आहेत. कुठल्याही स्वतंत्र देशात शेतकऱ्यांची दलालांकडून अशा प्रकारे पिळवणूक होऊ शकत नाही. आपल्या देशात हे शोषण चालू आहे ह्याचाच अर्थ हा देश अजून खऱ्या अर्थानं स्वतंत्र झाला नाही. जोपर्यंत ही गुलामगिरी झुगारून टाकण्यासाठी तुम्ही संघटितपणे उभे राहात नाही तोपर्यंत तुम्ही गुलामच राहणार. गुलाम म्हणूनच मरणार.

'—आजपासून मनातील सर्व भीती झुगारून द्या. गुलामगिरीत मरण्यापेक्षा स्वातंत्र्याच्या लढयात सहभागी होऊन मेलेलं बरं ! शेतकऱ्यांच्या तरुण मुलांना माझी विनंती आहे, ज्या व्यापारी दलालानी तुमच्या आई-बापांना, आजोबा-आजीला, बहीण-भावंडाना राबराब राबवून घेतलं, नागवलं, दारिद्र्यात पिचत ठेवलं त्या सर्वांचा आता सूड घ्या—'

(क्रमशः)

## मराठवाड्यातून एक ज्वारीउत्पादक लिहितो......

आदरणीय विजयराव,

बऱ्याच दिवसापासून आपणास पत्र लिहिण्याचा विचार करत होतो; पण योगायोग जमतच नव्हता.

पत्र वाचताना कदाचित ओळख लागणार नाही; पण आपण यापूर्वी म्हणजे जानेवारीत शरद जोशी याच्या मराठवाड्यातील दौऱ्यात भेटलो होतो. सुधाकर जाधव व मी त्या कार्यक्रमाच्या आयोजकात प्रमुख होतो. अनतराव भालेराव यांच्या घरी आपली सविस्तर चर्चा झाली होती.

परवाच्या 'माणूस' अंकातील चारही लेख वाचले. एकंदरीत निपाणी आंदोलनाची वस्तुस्थिती त्यामधून समजून घेता आली. कारण बाकीच्या कुठल्याच माध्यमाने समजू शकले नाही व आंदोलन-काळात जाण्याची तीव्र इच्छा असून देखील अडचणीमुळे जाऊ शकलो नाही.

निपाणीसारखीच मराठवाड्यातील बहुसंख्य शेतकऱ्याची परिस्थिती आहे. मी जिथे राहतो ती वस्ती कर्नाटक-महाराष्ट्र या सीमेवर आहे राजकीय स्वार्थापोटी गावागावात भाडणे कायम ठेवण्याचा इथल्या स्थानिक नेतृत्वाचा गुण कायम पकड ठेवून आहे. त्यामुळे आहे ती परिस्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहे.

इकडचे मुख्य पीक ज्वारीचे. त्याची खरेदीदेखील तंबाखूप्रमाणेच आतापर्यंत होत आली. ज्वारी शेतीतून निघाली की, शासनाची खरेदी नसते. त्यामुळे सांसारिक अडचणी अनंत असतात. दिपवाळीचे सावकार, दुकानदाराचे वायदे असतात. म्हणून अडत्यानी ज्या भावात मागितले तसे द्यावे लागते. नंतर तीच ज्वारी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये शासन व्यापाऱ्यांकडून ५०-१०० रु. जास्त भावाने खरेदी करते.

आमच्या लहानशा गावात वीस-बावीस हजार पोती ज्वारी याच पद्धतीने शासनाने खरेदी केली. व्यापाऱ्यांनी प्रचंड नफा मिळवला.

**आम्ही या संदर्भात, दसऱ्याच्या अगोदर, ज्वारी खरेदी व भाव घोषित करावा यासाठी काही भागात निपाणी धर्तीवर चळवळ उभी करण्याचा प्रयत्न करीत आहोत.**

आपण आम्हाला सहकार्य करावे ही आग्रहाची विनंती करीत आहोत.

आपल्या लेखमालेबाबत हार्दिक अभिनंदन !

भाभीस प्रणाम !

देवीदास पवार
औराद-शहाजानी
दि. ३०-५-८१ ता. निलंगा, जि. उस्मानाबाद.

## पुस्तके

# अपेक्षा वाढविणारा अनुवाद पएसि राजाची कथा

ऐतिहासिकदृष्टया जागतिक कथावाङ्‌मयात भारतीय कथासाहित्याचे स्थान अत्यंत श्रेष्ठ आहे. वैदिक आख्यानसूक्ते, ब्राह्मण-ग्रंथांतील जलप्रलय, जगदुत्पत्ती, पक्षधारी पर्वत, शुन:शेप इत्यादी विषयींच्या कथा, उपनिषदात पशु-पक्ष्यांवरून सांगितलेल्या नीतिकथा, पतंजलीने महाभाष्यात उल्लेखलेल्या 'वासवदत्ता', 'सुमनोत्तरा', 'भैमरथी' या कथा भारतीय कथासरस्वतीचा स्रोत किती प्राचीन आहे, हे दाखवतात. पण पतंजलीपूर्वी, उपनिषत्कालालगत होऊन गेलेले गौतम बुद्ध, महावीर व त्याला समकालीन असलेला पण पार्श्वनाथपरंपरेचा वारस केशी इत्यादी आचार्यांनी परंपरागत चालत आलेल्या नीतिपर, वैराग्यपर कथा स्वत:च्या मताच्या प्रसारार्थ सांगितल्या, असे प्राचीन पाली व अर्धमागधी आगमांवरून दिसते. पाली जातककथांमध्ये तर युरोपीय परिकथाप्रमाणे असलेल्या अद्‌भुत कथा, प्राण्यांच्या गोष्टी (Beast Fables), फारसे 'बौद्धत्व' नसलेल्या विनोदी कथा, प्रहसने, बोधिसत्वाभोवती गुफलेल्या (पण बौद्ध-वैशिष्टय नसलेल्या) कथोपकथा आपल्याला आढळतात. या सर्वच कथा आर. एन. मेहता 'प्री-बुद्धिस्ट इंडिया' मध्ये मानतात तशा बुद्धपूर्व नसल्या तरी त्यांपैकी कित्येक बुद्ध-पूर्व भारतीय समाजात परंपरेने चालत आल्या आहेत व जैन आगमामध्ये व आगमोत्तर साहित्यामध्ये त्या विचाराच्या प्रचारार्थ सांगितल्या गेल्या आहेत. जैन प्राकृत कथा-साहित्यालाही अशीच प्राचीन भारतीय पार्श्व-भूमी आहे.

या संस्कृत, पाली, प्राकृत साहित्यांतील कथा पश्चिम आशिया व युरोप यातील देशात वेषांतर करून (उदा. अरेबियन नाइट्स) कशा पसरल्या हाही एक स्वतंत्र चर्चेचा विषय आहे.

प्रस्तुत छोटेसे पुस्तक अर्धमागधी जैन आगमामधील 'राय-पसेणियं' (राजप्रश्नीय) या उपांगाच्या 'पएसिकहा' (प्रदेशी कथा) किंवा 'पएसिकहाणय' (प्रदेशी-कथानक) या उत्तरार्धाचा अनुवाद आहे. राजप्रश्नीयाच्या पूर्वार्धात ज्या 'सूर्याभदेवाचे' वर्णन आहे ते वैभव त्याला पूर्वजन्मातील कोणत्या पुण्याई-मुळे प्राप्त झाले त्याचा वृत्तांत या 'प्रदेशी कथानकात' सांगितला आहे. त्या पूर्वजन्मात सूर्याभाचा जीव 'प्रदेशी' नामक नास्तिक, आत्मतत्त्व न मानणारा राजा होता. त्याच्या 'चित्त' नामक वडीलभावासारख्या विश्वासू सारथ्याने पार्श्वनाथपरंपरेचा तत्कालीन प्रमुख आचार्य केसी (केशी) याची व प्रदेशी राजाची भेट घडवून आणली. तत्कालीन वादपद्धतीप्रमाणे राजाने केशीला आत्म्याचे अस्तित्व, स्वरूप इत्यादी विषयी आपल्या जडवादी मताप्रमाणे अनेक प्रश्न विचारले. केशीने त्या काळच्या वैज्ञानिक प्रगतीला साजेशी योग्य उत्तरे देऊन प्रदेशी राजाचे समाधान केले. केशीच्या उपदेशामुळे सम्यक् दृष्टी प्राप्त झालेल्या प्रदेशी राजाने आपल्या राज्याची नीट व्यवस्था लावून श्रमणोपासना सुरू केली, पण ते राणीला आवडले नाही. त्याचा काटा काढण्यासाठी तिने त्याच्यावर विषप्रयोग केला. असह्य आग आग झाली तरी हा राणीने विषप्रयोग केला आहे, हे कळूनही राजा प्रदेशीने तिचे मनानेसुद्धा वाईट चिंतले नाही व त्याने समाधि-अवस्थेत देहत्याग केला. तो सौधर्म स्वर्गात सूर्याभ नामक देव झाला. या कथानकाची पुढील वैशिष्टये आहेत :

१) 'पएसी कहाणय' ही जैनकथा नाही. बौद्धांच्या पाली आगमात दीर्घनिकायातील 'पायासि-सुत्ता'त याच तऱ्हेचा वाद असून त्यात गौतमशिष्य काश्यपाने पायासि राजाचे मतपरिवर्तन केले व तो बुद्ध, धर्म व संघ यांना शरण गेला असे वर्णन आहे.

२) अर्धमागधी 'पएसी' व पाली 'पायासी' यामधील उच्चारसाम्य लक्षणीय आहे, पण त्याहीपेक्षा या दोन्ही कथामध्ये उपमा, उदाहरणे इत्यादीमध्ये इतके साम्य आहे की, दोन्ही कथा बुद्धपूर्वकालात प्रचलित असलेल्या एखाद्या भारतीय कथेचे रूपांतर वा उसनवारी केल्याप्रमाणे वाटतात.

(३) बुद्ध-महावीरांच्या काळी न्याय-शास्त्राची प्रगती नीटशी झाली नसल्यामुळे उत्तरकालीन ब्राह्मण, बौद्ध, जैन आचार्य जसे न्यायघटित भाषेत वाद करीत तसे हे वाद नसून ते दोन व्यक्तींमधील मनमोकळे संवाद आहेत. जीव किंवा आत्म्याच्या अस्तित्वाचा शोध घेण्यासाठी मृत्युदंड झालेल्या गुन्हेगारांवर पएसी राजाने जे भयंकर प्रयोग केले ते कसे चुकीचे आहेत, हे दाखवून केशीने अशा क्रूरकर्म्या राजाचे हृदयपरिवर्तन कसे केले याची ही कथा शेवटपर्यंत मनाची पकड घेते.

(४) प्रदेशी राजाच्या 'दृढप्रतिज्ञ' (दढ पईन्न) नामक पुढील जन्माच्या वर्णनाचे निमित्ताने आपल्याला जैन-अर्धमागधी आगमकाळात प्रचलित असलेल्या ७२ कला, १८ देशी भाषा, राजपुत्राचे अभ्यासक्रम, सिंहली, अरबी, पारशी इत्यादी परदेशी दासी वगैरे तत्कालीन सामाजिक माहिती मिळते.

प्रस्तुत पुस्तक वाचल्यावर अर्धमागधी-आगम वाचण्याबद्दल उत्सुकता निर्माण करणारा हा अनुवाद मूळ अर्धमागधी संहितेशी तुलना करीत मी वाचला. मराठी भाषेच्या घडणीप्रमाणे प्राचीन ग्रंथाचे अनुवाद करावे लागतात. त्याप्रमाणे प्रा जोशींनी मूळ अर्धमागधी संहितेशी प्रामाण्य राखून सुबोध पण शैलीपूर्ण मराठीत हा अनुवाद केला आहे. त्यांनी मराठीमध्ये 'प्राकृत' शब्द (उदा. पएसी) न वापरता जर संस्कृत रूपांतरित शब्द वापरले असते तर सामान्य वाचकाला ही कथा न अडखळता वाचता आली असती असा एक आक्षेप घेता येईल; पण आगमाचे संस्कृत टीकाकार प्राकृत शब्दांची इतकी भिन्न संस्कृत रूपे देतात (उदा. मणपज्जव > मन.पर्याय, मन.पर्यव —एक ज्ञानप्रकार) की कोणता पर्याय स्वीकारावा याबद्दल अनुवादकाला संभ्रम पडणे शक्य आहे; पण प्रा. जोशी यांनी दुसऱ्या परिशिष्टात दिलेल्या टीपामुळे ही प्राकृत पारिभाषिक शब्दांची दुर्बोधता दूर होईल. अर्थात हा वैयक्तिक मतांचा प्रश्न आहे

एकंदरीत विचार करता प्राचीन वाद-पद्धतीचे स्वरूप व्यक्त करणाऱ्या या कथेचा सुबोध मराठी भाषेत अनुवाद करून प्रा. जोशी यांनी स्वत.बद्दल या क्षेत्रात अपेक्षा

निर्माण केल्या आहेत. अर्धमागधी—आगम अनेक दृष्टींनी सुसंपन्न व महत्त्वाचा आहे. त्यातील आणखी काही भागाचा त्यांनी मराठीत अनुवाद करावा अशी अपेक्षा आहे.

—ग. वा. तगारे

( पुणे विद्यापीठ—तत्त्वज्ञान विभाग जैन अध्यासन—फिरोदिया प्रकाशन )

---

रंगभूमी

# अभिमान

## प्रेक्षक गुंतून का पडत नाहीत ?

'निशात' निर्मित, श्री. यशवंत राजणकर-लिखित, श्री. कमलाकर सारंग दिग्दर्शित 'अभिमान' या नाटकाचा दुसरा प्रयोग दिनाक २५ मे या दिवशी रवीन्द्रनाटय-मंदिर येथे संध्याकाळी सात वाजता झाला.

रायभान देशमुख हा दिलदार मनाचा उमदा माणूस. गावातल्या शमा नावाच्या मुलीवर त्याचे प्रेम असते. त्यावरून त्याची बदनामी करून, धिंड काढून त्याला गावातून हाकलले जाते. भाऊबंद इस्टेट गिळतात. पण पुढे व्यसनाधीन होऊन, कर्जबाजारी होऊन हाताखालच्या कारभाऱ्याच्या कारस्थानामुळे अशा बऱ्याच कारणांनी त्या भाऊबंदावर इस्टेट विकण्याची पाळी येते. बरोबर बारा वर्षांनी रायभानच ती इस्टेट विकत घेऊन आपल्या वाड्यावर परत येतो. ज्या गावाने आपली धिंड काढून आपल्याला हाकलले त्या गावाशी तो सूडभावनेने वागू लागतो. मंदिराला कुलूप लावतो. गावच्या विहिरी बंद करतो. चिडलेल्या, निषेध करणाऱ्या लोकांशी उर्मटपणे वागतो. गावाचे आदरस्थान असलेल्या मंदिरातल्या संन्यासिनीला रात्री वाड्यावर बोलावतो. ती आली तरच मंदिराचे टाळे उघडीन, विहिरींचं पाणी मोकळे करीन असे सांगतो. आपला असा बळी गेला तर गाव सुखी होईल या भावनेने संन्यासिनी येते. देशमुख कोणताच गैरफायदा न घेता तिला परत पाठवतात. देशमुखाच्या वाड्याची रीत म्हणून साडी भेट देतात. संन्यासाच्या मार्गातून परत यावसं वाटलं तर रायभान वाट पहातो आहे असे तिला सांगतात नंतर देवळाच्या पुजाऱ्याला—चिदंबरला—त्याचा वहिवाटीचा हक्क देतात. दरम्यान शमामुळे कारभारी हणमंतराव व शमाचा वकील नवरा याच्या कृष्णकृत्याचे पुरावे मिळतात. शमाचे वकिलाशी जबरीने लग्न लागल्याचे कळते. नंतर झटापटीत हणमंतरावाकडून शमाचा खून होतो. रणवीर या सज्जन, निष्ठावंत माणसाला रायभान सपत्ती देऊ करतो. संन्यासिनीचे परिवर्तन होऊन ती रायभानकडे येते.

असे हे कथानक. हे कथानक एकेरी, ढोबळ, बालबोध आहे. रायभान, शेषाप्पा, संन्यासिनी, शमा, रणबीर हा सत्पक्ष. हणमंतराव, चिदंबर हा असत्पक्ष. अशी ही सरळसरळ विभागणी आहे शेवटी सत् पक्षाचा जय होतो. बाळबोध कथानकही कधी गुतवून ठेवते. श्री. यशवंत राजणकरांचे नाथमाधवांच्या कादबरीचे 'देशमुखवाडी' हे नाटक बऱ्यापैकी गुतवून ठेवणारे होते, तसे 'अभिमान' प्रेक्षकाना गुतवू शकल नाही. पहिल्या अंकानंतर प्रेक्षक कंटाळलेले आढळले. संन्यासिनीच्या शेवटच्या परिवर्तनाला तर अगदी टवाळखोरपणे हसले! प्रेक्षक गुतून का पडत नहीत ? कारण कथानकात वेगवान घटना नाहीत. पात्रांच्या किती तरी कृती कळतच नाही. हणमंतरावाची कृष्णकारस्थाने स्पष्ट होत नाहीत. रायभान आणि माताजी (संन्यासिनी) सोडून बाकीच्या व्यक्तिरेखा स्पष्ट होत नाहीत. रायभानला संन्यासिनी एकदम प्रिय का होते, तिला तो अरुंधती का म्हणतो ते कळत नाही. पहिल्या अंकानंतर नाटक कमालीचे संथ म्हणूनच कटाळवाणे आहे. नाटकाच्या एकंदर कथेचे श्री. शरदचंद्र चटर्जी यांच्या 'भैरवी' कादंबरीशी साम्य वाटते.

नाटकात आचरट, अश्लील विनोद नाहीत. एक बडा देशमुख नायक असताना वर्गविग्रह, पिळवणूक, पांढरपेशाचा भडकपणा या गोष्टीवर संवादबाजी नाही, ही या नाटकाची जमेची बाजू, पण यामुळेच आचरट फार्सच्या प्रेक्षकांना हे नाटक आवडणार नाही. अधिक सुजाण प्रेक्षकाची तहानही हे नाटक भागवू शकणार नाही.

नाटकाचा प्रयोग उत्तम होतो. देशमुखाच्या वाड्याची सजावट योग्य आहे श्री. कमलाकर सारंग याचे व्यक्तिमत्त्व रायभानच्या भूमिकेला अतिशय योग्य वाटते. त्यांनी भूमिकाही उचित भानाने केली आहे. किंबहुना त्यांच्या अभिनयामुळेच नाटकात प्राण येतो असे म्हणावेसे वाटते. लालन-सारंग (संन्यासिनी) यांची भूमिका एकंदर ठीक वाटली तरी बोलणे फारच एकसुरी वाटते. इतर, राजा नाईक (हणमंतराव) प्रमोद पवार (रणवीर), जयंत सावरकर (शेषाप्पा), मंदा देसाई (शमा), नितीन मंत्री (चिदंबर) यानी आपापल्या भूमिका व्यवस्थित केल्या आहेत.

श्री. कमलाकर सारंग यानी दिग्दर्शित केलेली नाटके वेगवेगळ्या प्रकारची आहेत. 'सखाराम बाइंडर', 'आगंतुक,' 'अशा या दोघी,' 'आरोप', 'रथचक्र' वगैरे आणि आता 'अभिमान' या नाटकाचे विषय, रूप एकमेकापेक्षा बरेच वेगळे आहे. श्री सारग यानी यशस्वीपणे त्यांचे दिग्दर्शन केले आहे. ते वेगवेगळ्या प्रकृतीची नाटके हाताळू इच्छितात असेही यावरून वाटते, पण नाट्य-सहितेतच फारसा जोर नाही.

सध्याच्या मराठी रंगभूमीकडे पहाताना वाटते, येथे उत्तम अभिनय करणारे कलावंत आहेत, दिग्दर्शक आहेत. रंगभूषा, केशभूषाकार, नेपथ्यकार, वेषभूषाकारही उत्तम आहेत, पण कसदार, सखोल लेखन करणारे नाटककारच फारफार कमी आहेत! म्हणून ही रंगभूमी चित्रपटाचे अनुकरण करीत, तात्रिक हिकमती दाखवीत डोळयांत भरू पहाते आहे.

—विनया खडपेकर


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य वहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आवृत्ती) | रु. ५५–०० |
| २. | मॅक्झिम गॉर्की | ,, ,, | १०–०० |
| ३. | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५–०० |
| ४. | महाडचा मुक्तिसंग्राम | प्रा. रा. म. बिवलकर, प्रा. झुंबरलाल कांबळे | २०–०० |
| ५. | लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २०–०० |
| ६. | एक होता कार्व्हर | सौ. वीणा गवाणकर | १५–०० |
| ७. | पश्चिमेचे पुत्र | रवींद्र पिंगे | १४–०० |
| ८. | देवाघरचा पाऊस | ,, ,, | १०–०० |
| ९. | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२–०० |
| १०. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आवृत्ती) | १२–०० |
| ११. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| १२. | आर् डॉक्युमेंट | अशोक जैन | १०–०० |
| १३. | टच् | अशोक प्रभाकर डांगे | १०–०० |
| १४. | गुजरायेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १५. | पूर्णिया | अनिल अवचट (दु. आवृत्ती) | ६–०० |
| १६. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| १७. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०**

# जिथे 'मधुमती' सारखं काव्य लिहिलं गेलं....

मुंबईला नव्यानेच भेट देणाऱ्या कोणत्याही थरातल्या माणसाची एकच मागणी असते—'कुठल्या तरी स्टुडिओत घेऊन चला, शूटिंग बघायचंय्...!' मुबईच्या माणसानेही रोजच्या रूटिनमध्ये हे स्टुडिओ पाहिलेले नसतात; पण तो भेट देणाऱ्याला 'काढू ओळख' म्हणून थापा ठोकत असतो. भेटीची तारीख संपते आणि 'स्टुडिओ' तेवढा बघायचा राहिला अशी रूखरूख मनाला लागून भेट देणारा गावाकडे निघून जातो.

'स्टुडिओ'बद्दलचं हे आकर्षण गावाकडच्या माणसाला 'ग्लॅमर्स' हिंदी चित्रपटामुळे जरी निर्माण झालं असलं तरी हे आकर्षण नाहीसं करणाऱ्या प्रक्रियेला आता मुबईत सुरुवात झाली आहे. सध्या मुंबईत चालू असलेल्या १४ स्टुडिओपैकी 'मोहन स्टुडिओ' बंद पडला आहे.

'मोहन स्टुडिओ' हे काय प्रकरण आहे, हे एकदम लक्षात येणार नाही; पण इथेच बिमल रॉयने आपल्या सर्वांगसुदर चित्रपटांची निर्मिती केली. हृषीकेश मुखर्जी, गुलजार, बाशू भट्टाचार्य व असे अनेक विद्यार्थी बिमल रॉयच्या या 'मोहन स्टुडिओ' नामक शाळेतून बाहेर पडले आहेत. हिंदी चित्रपटाला वाङ्मयीन व कलात्मक मूल्य प्रदान करण्याचा यशस्वी-अयशस्वी प्रयत्न इथेच झाला आहे. या स्टुडिओला 'आर. के. स्टुडिओ'—सारखं ग्लॅमर नसलं तरी चित्रपट इतिहासात 'आर. के.'पेक्षा क्वचितच या स्टुडिओला जास्त महत्त्व आहे.

हृषिकेश मुखर्जीच्या 'गुड्डी' या चित्रपटात चित्रपटाने वेडावलेल्या जया भादुरीला धर्मेंद्र एका स्टुडिओची अवस्था दाखवताना तो म्हणतो, 'हाच तो स्टुडिओ. बिमल रॉय, सलील चौधरी, पॉल मुनी, ऋत्विक घटक यासारख्या कलाकारांची जन्मभूमी, कर्मभूमी, येथील त्या लाईटने दिलीपकुमार, मोतीलाल, मधुबाला, बलराज सहानी, प्राण, मीनाकुमारी इत्यादी समर्थ कलाकारांना प्रकाशात आणलं. इथेच 'मधुमती'सारखं काव्य लिहिलं गेलं, काबुलीवाल्याचं स्वप्न रंगवलं गेलं आणि देवदासचं दु.ख व्यक्त केलं गेलं!'

धर्मेंद्रचे हे शब्द हृषिकेश मुखर्जी आज व्यक्त करत असतील. कारण त्यांचा लाडका 'मोहन स्टुडिओ' आज बंद झाला आहे! कायमचाच!

स्टुडिओ बंद होण्याची ही काही पहिली वेळ नाही. चित्रपट—इतिहासात स्टुडिओ बंद करण्याचे प्रसंग अनेक वेळा आले आहेत. पहिल्या महायुद्धात स्टुडिओ उद्ध्वस्त झाले. दिग्दर्शक आपल्या कॅमेऱ्यासह रस्त्यावर आले आणि त्यातूनच 'नव-वास्तववादी' परंपरेचा झेंडा इटलीमधील रोसोलिनी, व्हिक्टोरिया डिसिक्का या दिग्दर्शकांनी रोवला. जागतिक चित्रपटाने हयाची दखल घेतली व अनुकरण केलं. भारताचे सत्यजित राय व जपानचा अकीरा कुरोसोवा या दोन दिग्दर्शकांनी हीच पताका अमर केली.

स्टुडिओच्या साचेबंद चौकटीतून चित्रपटाने 'वास्तव' जीवनात प्रवेश केला. चित्रपट माध्यमाला नवा आकार प्राप्त झाला; पण बोलपटाने पुन्हा एकदा स्टुडिओकडे धाव घेतली. भारतातील १९४० ते १९६० या काळात स्टुडिओला, बॅनरला महत्त्व प्राप्त झाले. दिग्दर्शकाच्या सहीपेक्षाही या 'बॅनर'चं महत्त्व वाढलं.

प्रभात, बॉम्बे टॉकी, न्यू थिएटर्स जेमिनी. वाहिनी, आर. के., राजकमल, मेहबूब, रणजित ही स्टुडिओंची फक्त नावं नव्हती, त्यामागे अनेक गाजलेल्या लोकप्रिय चित्रपटांची निर्मिती दडलेली होती.

चित्रपट हा धंदाच होता; पण खुली, मनमोकळी स्पर्धा अपेक्षित ठेवून हा धंदा केला जात होता. त्यानंतर चित्रपट माध्यमाच्या प्रगतीच्या वेगात या धंद्याची 'इंडस्ट्री' बनली आणि स्टुडिओचं महत्त्व संपुष्टात यायला सुरुवात झाली.

हिंदीवाल्या मंडळीना 'लोकेशन' चं वेड लागलं. कॅमेरा पुन्हा एकदा रस्त्यावर आला, पण वास्तववादासाठी नव्हे, तर पलायनवादाच्या हुकमी क्लृप्त्यांचा वापर करण्यासाठी. भारतापेक्षा परदेशातील शूटिंगला जास्त महत्त्व आलं.

'इन् डोअर' शूटिंगसाठी स्टुडिओत सेट उभारण्यापेक्षा कोणत्याही बंगल्यात, फ्लॅटमध्ये शूटिंग करणं सोयीचं व स्वस्तात पडू लागलं. अर्थात याला चित्रपट-तंत्रातील प्रगती आणि चित्रपटांच्या निर्मितीची संख्या हेही कारणीभूत होतं.

नट-नट्यांचा अनियमितपणा, अनेक शिफ्टस्‌मध्ये काम करण्याची त्यांची सवय आणि खर्चिक सेट्स यामुळं हे घडलं, घडवलं गेलं. 'बॅनर'ची प्रतिष्ठा गेली.

हे सारं झालं ते ओघात झालं तरी त्याचा परिणाम मात्र दोषमूलकच ठरला आणि आजची अवस्था प्राप्त झाली.

मोहन स्टुडिओ बंद पडल्यामुळे सध्या मुबईत फक्त तेरा स्टुडिओ चालू आहेत. मात्र शूटिंगसाठी तीस बंगले फिल्मवाल्यांनी कायमचे भाड्याने घेतले आहेत. 'रुखरुख' लावून गेलेला पाहुणा पुन्हा मुबईस गेला तर कदाचित् त्याच्याच 'माणसा'च्या घरी शूटिंग चालू असलं तरी त्यात नवल नाही!

## बाशुदा डबा ऐस पैस

'Film is still in cans' या वाक्प्रचाराचे चित्रपट दुनियेत भलभलते अर्थ काढले जातात. मराठीत मात्र याचा सरळ अर्थ आहे, 'चित्रपट अजून डब्यात आहे.' खरं तर डब्यात राहू द्यावेत असे डफ्फड हिंदी चित्रपट नव्वद टक्के निघत असतात; पण या डबेवाल्या निर्मात्यांना पुरेसा पैसा मिळतो, वितरक भेटतो आणि मग जाहिरातीची पुंगाणी वाजवून नागोबासारखा डब्यातून हा चित्रपट बाहेर पडतो. टाळ्या पिटणारे टाळ्या पिटतात, बाकीचे पैसे टाकून हात चोळत जातात आणि उरलेले न बघताच सारं काही विसरून जातात.

डब्यातून बाहेर पडून प्रदर्शित झालेले चित्रपट चालले नाहीत तरी 'चित्रपट डब्यात गेला' असं म्हटलं जातं; पण काहींच्या बाबतीत प्रदर्शित होण्याआधीच अर्धवट अव-

स्थेतील चित्रपट डब्यातच पडून असतात.

काही वेळा निर्माता मरतो व चित्रपट अपुरा राहतो. मग दुसरा निर्माता 'कुंकू' लावेस्तोवर या चित्रपटाचा दिग्दर्शक (बहुधा होतकरू) विधवेसारखा ठोकरा खात हिंडतो. दिग्दर्शक मेला तर तेवढी पर्वा न करण्या-इतका निर्लज्जपणा या दुनियेत असल्यामुळं निर्माता दुसरा एखादा दिग्दर्शक गाठून चित्रपट पूर्ण करतो. कारण इथं प्रश्न दिग्दर्शकाच्या शैलीचा नसून निर्मात्याने ओतलेल्या पैशाचा असतो. क्वचित प्रसंगी हा निर्माता मृत दिग्दर्शकाला चित्रपट 'डेडीकेट 'सुद्धा करतो.

परंतु अर्धअधिक चित्रिकरण झाल्यानंतर अभिनेता–अभिनेत्री मेली अथवा पळून गेली किंवा चित्रपटाशी संबंधित माणसांशी त्यांचं फाटलं तर मात्र निर्मात्याची चांगलीच फाटते. गयावया करून तो त्रेधा-तिरपीट उडालेला निर्माता प्रयत्न करत असतो. गेल्या चार-पाच वर्षांत अभिनेता-अभिनेत्र्यांच्या परस्पर संबंधांतून, त्यांच्या 'इगो-प्रॉब्लेम'-मधून अशी अनेक उदाहरणं घडली आहेत. त्यामुळं कित्येक चित्रपट अर्धवट अवस्थेत डब्यात पडून आहेत. काहींचं चित्रिकरण लांबलं आहे, रेंगाळलं आहे.

पण अशा परिस्थितीतही काही चतुर निर्माते विविध क्लृप्त्यांचा वापर करून तग धरतात. नुकत्याच लागलेल्या 'क्रांती' चित्रपटाचं चित्रिकरण चालू असताना मनोजकुमारचं सारिका या नटीशी बिनसलं, तर परवीन बाबी चित्रिकरण अर्धवट टाकून हॉलंडला पळून गेली. 'राष्ट्रीयता' ह्या मूल्याचाही बाजार मांडणाऱ्या हिशेबी मनोजकुमारने या दोन्ही घटना पचवल्या आणि त्याचं पर्यवसान चित्रपटाच्या पटकथेत या दोन्ही नट्यांना लवकर मारण्यात झालं.

'क्रांती 'च्या आधी अशीच एक नमुनेदार घटना घडली आहे. 'नाँच उठे संसार' या चित्रपटात काम करणारी व्ही. शांताराम यांची कन्या राजश्री आठ रिळांच्या चित्रिकरणानंतर परदेशी गेली, ती आलीच नाही. ओतलेल्या पैशामुळं निर्माण झालेला परिस्थितीचा रेटा लक्षात घेऊन दिग्दर्शकाला वेसण घालून चित्रपटाच्या निर्मात्याने राजश्रीला आठव्या रिळात डमीच्या साहृयानं मारलं आणि मौशमी चटर्जी या नटीला घेऊन पुढचं कथानक रचलं. चित्रपट पूर्ण करून तो प्रदर्शितही केला. आता तो चाललाच नाही ही गोष्ट वेगळी !

अशी उदाहरणं चित्रपट दुनियेत शेकड्यांनी आहेत. असे अर्धवट अवस्थेत ('still in cans') हे चित्रपट विविध प्रयोगशाळांमध्ये कोनाडयात, गुदामात हजारोंनी पडलेले आहेत ! यातील काही चित्रपटांच्या रिळांमागं चांगल्या दिग्दर्शकांचे मृत्यूही लपलेले आहेत. त्यात बिमल रॉय आहे, गुरुदत्तचा 'गौरी' चित्रपट आहे, तर 'मुगले आझम 'वाले के. असिफचा 'लव्ह अ‍ॅण्ड गॉड' आहे.

पण या सर्व प्रकारांवरही ताण करणारा एक चित्रपट–दिग्दर्शक आहे. तो म्हणजे बाशू भट्टाचार्य. 'तिसरी कसम', 'अनुभव', 'आविष्कार' यांसारखे जरा बरे चित्रपट देणाऱ्या या दिग्दर्शकाचे एक-दोन नव्हे, तर तब्बल सहा चित्रपट सध्या डब्यात पडून आहेत !

'तुम्हारा कल्लू', 'आनंदमहल', 'असमाप्त कविता', 'मधुमालती', 'डाकू' आणि 'गृहप्रवेश' हे सहाही चित्रपट बाशूदांनी पूर्ण केले असून त्यापैकी एकही चित्रपट प्रदर्शित झाला नसल्यानं बाशूदांनी याबाबतीतही 'रेकॉर्ड ब्रेक 'च केलं आहे. खरं तर बाशूदा अनेक निर्मात्यांना या 'डब्यां'-वर उभे राहून 'डबा ऐसपैस...' करण्याचा प्रयत्नही करत असतील; पण कोणीच भिडू बाद न झाल्यामुळं गेली अनेक वर्षं या डब्यांवर बाशूदाचंच राज्य चालू आहे. निदान मागील अनुभवावरून कोणी तरी निर्माता डबा ऐसपैस ऽऽ व्हावा असं आम्हालाही वाटतं !

—बिलंदर

---

## मुंबई वार्ता : पृष्ठ ४.वरून

व्यवहारात मी एक माणूसच आहे. म्हणजे माझी मते इतर कोणाहीसारखी सदोष असू शकतील.

कुराण अशा रानटी शिक्षांना परवानगी देते की ज्या आता मुसलमान राष्ट्रातही अमलात आणल्या जात नाहीत. व्यभिचार करणाऱ्या स्त्रीस किंवा पुरुषास साक्षीदारासमोर शंभर फटक्यांची शिक्षा कुराणाने फर्मावली आहे; पण कितीही कडवेपणा असला तरी आज ही शिक्षा रूढ नाही.

### परंपरेची पुनर्मांडणी

शिक्षित मुसलमान ह्युमॅनिझमच्या बाबतीत विरोध का करतात किंवा ह्युमॅनिझमच्या आवश्यकतेसंबंधी मौन का पाळतात ? काही लोक हेतुपुरस्सर, ढोंगीपणाने दुटप्पीपणाने वागतात. परदेशात आधुनिकतेची भाषा बोलतात आणि घरात मात्र पारंपारिक धर्माचे भक्त! त्याच्याविषयी आपण विचार करण्याचे कारण नाही. इतर लोकांच्या संदर्भात विचार करायला पाहिजे. या समाजाला ह्युमॅनिझम स्वीकारण्याच्या बाबतीत स्वत.च्या समाजाच्या रोषाची भीती वाटते. ही भीती अतिशयोक्तीची आहे आणि ती थोडे धैर्य दाखविल्याने जाईल. दलवाई किंवा बेग स्वतःला जे सत्य वाटेल ते बोलले म्हणून काही दुःखाच्या खाईत पडले नाहीत. सुधारणेच्या संबंधात दुसरी एक भीती अशी असते. आधुनिकतेमुळे आपली वैशिष्टये गमावली जातील. या संदर्भात एक लक्षात ठेवले, की,काळाच्या गरजेप्रमाणे प्रत्येक समाजाला आपल्या परंपरेची नवी मूल्ये शोधावी लागतात. ख्रिस्ती समाजात प्रबोधनकाली आणि हिंदूसमाजात एकोणीसाव्या शतकापासून हे घडले. मुस्लिम समाजाने मात्र ज्या नव्या जगात ते रहातात त्या नव्या जगाची आव्हाने स्वीकारण्याचे नाकारले आहे; परंतु मुसलमानांना जर अभिमानाने,सन्मानाने जगायचे असेल तर त्यांनाही आपल्या परंपरेकडे चिकित्सक मूल्यमापनाने पहावे लागेल. अशा प्रकारच्या चिकित्सक मूल्यमापनाची सुरुवात म्हणजे इस्लाम जगातील ह्युमॅनिस्ट प्रबोधनाची सुरुवात असे म्हणता येईल. भोवतालच्या मुस्लिमेतर वातावरणाच्या प्रभावामुळे हिंदुस्थानात अशा चिकित्सक मूल्यमापनाची तुरळक चिन्हे दिसू लागली आहेत. प्रश्न इतकाच आहे, भिन्न परंपरेमुळे, हिंदू-मुसलमानात होणाऱ्या वाढत्या झगडयाचा कल उलटा फिरवण्याइतपत मुसलमानाचे प्रबोधन लवकर होईल किंवा नाही ?

डॉ. शहा यांचे भाषण विचारांना चालना देते आणि Islam and Humansism हा वरील उतारा त्यांच्या आगामी पुस्तकाबद्दल कुतूहल निर्माण करतो.

—प्रतिनिधी